म्हणींविषयीं चार शब्द

विद्याधर वामन भिडे

"मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी इ०," "निबंधलेखन आणि अनुवाद," इ० पुस्तकांचे कर्ते,
यांनीं हा निबंध रचिला.

आवृत्ति दुसरी

इ० स० १९२७

किंमत ४ आणे

विद्याधर वामन भिडे यांचीं कांहीं पुस्तकें

१ राघवीयपरीवाह, पूर्वार्ध, सर्ग १ ते १०. ह्या पूर्वार्धांत रामज न्मापासुन तों पंचवटींत सीतेला चोरून न्यावयाला रावण आला येथपर्यं तचा कथाभाग ग्रथित केला आहे. संस्कृतांतील महाकाव्यांच्या पद्धतीव हें काव्य रचिलेलें आहे. वर्णनाचा ओघ, अलंकार, भाषा, रचना, शुद्धता, वगैरे संबंधानें हें काव्य उत्कृष्ट आहे. विष्णु मोरेश्वर महाजनी, गणेश जना र्दन आगाशे, प्रो० वैजनाथ काशीनाथ राजवाडे, वगैरे पंडितांनीं हें का प्रशंसिलेलें आहे. किंमत बारा आणे.

२ काव्यकुसुमावली—ह्या पुस्तकांत लहान मोठीं दहा काव्यें आहेत यांपैकीं "सौमतेयसमुद्धार" ह्या काव्यांत भगीरथानें स्वर्गाहून गंगा पाताळीं नेली आणि साठ हजार सगरपुत्रांचा उद्धार केला, हा मजकूर असून त्यां निसर्गाच्या भव्य देखाव्यांचीं वर्णनें विपुल आहेत. बाकीचीं नऊ का लहान लहान असून चटकदार आहेत. किंमत आठ आणे.

३ जीवजागृति—यांत सुमारें शंभर विषयांवर बोधप्रद चुटके अस ते विविध वृत्तांत रचिलेले आहेत. किंमत आठ आणे.

४ दण्डदण्डना—ह्या काव्यांत दंडकारण्याची भीषणमनोहर कथा ग्रथित केली आहे. यांत १२० श्लोक असून ते अक्षरसंख्येच्या चढत्या क्रमानें योजिले आहेत. हें एक प्रकारचें वृत्तदर्पण म्हणून वाचावयाच्या ही उपयोगाचें आहे. किंमत चार आणे.

५ मंदारमंजरी इ०—हा अठ्ठावीस काव्यांचा संग्रह असून यांवर विद्वानांचे प्रशंसापर अभिप्राय आहेत. किंमत बारा आणे.

६ अर्थालंकारांचें निरूपण—ह्या पुस्तकाची पृष्ठसंख्या सुमारें २५ असून अर्थालंकार ह्या विषयावर ह्याच्या इतकें मोठें पुस्तक आजपर्यंत मरा ठींत झालेलें नाहीं. ह्या पुस्तकाच्या उपोद्घातांत लक्षणा, रस, काव्य, रीति गुण, अनुप्रास, अलंकार, वगैरे पारिभाषिक शब्दांचीं सरळ आणि सोप्या शब्दांत लक्षणें दिलेलीं असून त्यांच्या स्पष्टीकरणार्थ पुष्कळ उदाहरणें दिलीं आहेत. नंतर मुख्य ग्रंथांत ६१ अर्थालंकारांचें निरूपण केलें आहे. प्रत्येक अलंकाराचें लक्षण, लक्षणाच्या स्पष्टीकरणार्थ भरपूर उदाहरणें, प्रत्येक उदा हरणाचा अनुवाद आणि समन्वय, ह्या गोष्टी दिल्या आहेत. प्रत्येक अलं काराचें निरूपण संपल्यावर विद्यार्थ्याला स्वताच्या बुद्धीनें अलंकार ठर विण्यासाठीं कांहीं पद्यें दिलीं आहेत. ह्या ६१ अलंकारांचें निरूपण अस

म्हणींविषयीं चार शब्द

रचणार

विद्याधर वामन भिडे

" मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी इ०, " " निबंधलेखन आणि अनुवाद" इ० पुस्तकांचे कर्ते

हा निबंध
रा. रा. शंकर नरहर जोशी, यांनीं मालकी हक्कासह विकत घेऊन चित्रशाळा प्रेस, पुणें, येथें छापला

किंमत. ४ आणे

मुद्रक व प्रकाशक—रा. रा. शंकर नरहर जोशी,
चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ,
घ. नं. १०२६, पुणें शहर.

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

म्हणी हा विषय अतिशय महत्त्वाचा व मनोरंजक असून ह्यावर कोणी आपल्या मराठी भाषेंत विवेचन केलेलें नाहीं. कै. वा. विष्णुशास्त्री चिपळुणकर ह्यांनीं आपल्या निबंधमालेंत दोन चार म्हणी घेऊन त्यांचा मूळचा अर्थ नष्ट होऊन त्यांस अगदीं भिन्न अर्थ कसा प्राप्त झाला हें दाखविलें आहे; व एक दोन म्हणींचा उगम कसा झाला हें दाखविलें आहे; परंतु म्हणी म्हणजे काय, त्यांचे आवश्यक व अनावश्यक गुण कोणते, त्या उत्पन्न कशा होतात, त्यांचा भाषेस काय उपयोग होतो, व त्यांच्यापासून किती अमोलिक ज्ञान प्राप्त होण्याजोगें असतें, वगैरे गोष्टींचें विवेचन आपल्या भाषेंत आजपर्यंत कोणीही केलेलें नाहीं. ही उणीव भरून काढावी ह्या उद्देशानें पुढील निबंध लिहिला आहे. हें ह्या जातीचें पहिलेंच विवेचन असल्या-कारणानें त्यांत अनेक स्थळीं कमतरता राहिली असेल हें संभवनीय आहे. तथापि आमचे सुज्ञ वाचक आह्मांला प्राथमिकत्वाच्या हक्काचा फायदा देण्यास कबूल होतील अशी आम्हांला उमेद आहे.

रत्नागिरी.
ता. १ ज्युलाई १८९१.

ग्रंथकर्ता.

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

हा निबंध आम्ही इ०स० १८८४ मध्यें लिहिला तो पुढें १८९१ मध्यें रत्नागिरीस शिळाप्रेसमध्यें छापविला. त्याच्या सर्व प्रती दोन वर्षांतच खपल्या. नंतर १९११ सालीं दुसऱ्या आवृत्तीचा खर्डा आम्ही तयार केला. तो छापण्याचा योग आज चित्रशाळेच्या औदार्यानें येत आहे. दोन आवृत्तींत ३६ वर्षांचें अंतर!

इ० स० १९२३ सालीं आमचें लक्ष्य सांप्रदायिक वाक्यांकडे खेचलें गेलें, आणि म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें, ह्यांच्यांत भेद केला पाहिजे असें आम्हांला वाटूं लागलें, आणि आम्ही आपले विचार एका मासिकांत १९२६ सालीं नमूद केले. आणि त्याच मासिकासाठीं म्हणींची उन्नति आणि अवनति ह्यावर कांहीं लेख लिहिले. ह्याच वेळीं आमचें लक्ष्य म्हणींतील अलंकारांकडे ओढलें गेलें आणि आम्ही दुसऱ्या एका मासिकांत ह्या अलंकारांवर सात आठ लेख लिहिले. सांप्रदायिक वाक्यांवरलि आमचे विचार आणि म्हणींतील अलंकार आणि म्हणींची उन्नति, अवनति, वगैरे विषयांची जोड आमच्या पहिल्या निबंधाला देऊन ह्या निबंधाची ही दुसरी आवृत्ति आम्ही वाचकांना सादर करीत आहों. भिन्न भिन्न वेळीं आणि म्हणींच्या प्रांतांतलि भिन्न भिन्न विषयांवर आणि भिन्न भिन्न मासिकांत आमचे विचार प्रथित झालेले असल्याकारणानें ह्या निबंधांत कांहीं ठिकाणीं पुनरुक्ति झाली आहे, तिच्याबद्दल वाचकांनीं आम्हांला क्षमा करावी. कारण, ऊनोक्तीपेक्षां आधिकोक्तीचा दोष क्षम्यतर असतो.

तसेंच बालदशेंतलि भाषाशैली, प्रौढदशेंतील भाषाशैली, आणि स्थविरदशेंतलि भाषाशैली, ह्याचें विचित्र मिश्रण ह्या निबंधांत वाचकांना आढळून येईल. तथापि विचारांच्या एकसूत्रीपणाला कोठें बाध आला आहे असें आम्हांला वाटत नाहीं. ह्या दुसऱ्या आवृत्तींत महत्त्वाची भर पडलेली असल्याकारणानें ह्या आवृत्तीचे वेळीं आमच्या निबंधाला दुसरें कांहीं नांव देणें योग्य झालें असतें. परंतु पहिलेंच नांव लोकांच्या माहितीचें असल्याकारणानें तेंच नांव आम्ही ह्या निबंधाला कायम ठेविलें आहे.

१ एप्रिल १९२७.
७३५ सदाशिव पेठ, पुणें सिटी.

विद्याधर वामन भिडे.

म्हणींविषयीं चार शब्द.

उपोद्घात.

"म्हण" हा शब्द मराठी भाषेंत अनेक अर्थांनीं योजण्यांत येतो, आणि हे सारे अर्थ जरी परस्परांशीं निकटसंलग्न आहेत, तरी त्याच्यांत भेद-भावही आहे. त्यामुळें असें होतें कीं, " म्हण " हा शब्द एका अर्थानें घेतला असतां म्हणींसंबंधानें जें निरूपण, तें " म्हण " हा शब्द दुसऱ्या कोणत्याही अर्थानें घेतला असतां त्याला लागूं पडावयाचें नाहीं.

ह्यासाठीं काणच्या अर्थानें आम्ही "म्हण" हा शब्द या निबंधांत योजला आहे हें सांगतों.

(क) पांचा मुखीं परमेश्वर.

(ख) अंगाचें कातडें काढून जोडा शिवणें.

(ग) हा सूर्य आणि हा जयद्रथ.

(घ) भगीरथप्रयत्न.

(ङ) कोळशासारखा काळा.

वरील पांचही वाक्यांस किंवा शब्दसमूहांस व्यवहारांत " म्हण " हा शब्द लावला जातो. परंतु शास्त्रीय दृष्ट्या त्यांचें विवेचन करावयाचें असतां त्याच्यांतील फरक लक्ष्यांत घेतला पाहिजे. हल्लीं म्हणींच्या संग्रहांचीं जीं पुस्तकें पाहाण्यांत येतात, त्यांत पहिल्या पांचही प्रकारांचा समावेश निर्विवेक रीतीनें केलेला पाहाण्यांत येतो. एका संग्रहांत तर " पांचांमुखीं परमेश्वर " वगैरे जातींच्या म्हणींची व्याख्या उपोद्घातांत स्पष्ट शब्दांनीं दिलेली असून पुढें जो संग्रह दिलेला आहे त्यांत ख, ग, घ आणि ङ, ह्या जातींच्या म्हणी निर्विवेक रीतीनें समाविष्ट करून दिलेल्या आहेत. ह्या संग्रहाचा उपोद्घात वाचून नंतर पुढील संग्रह वाचला असतां साळ्याची गाय आणि माळ्याचें वासरू अशा सारखाच प्रकार दिसून येतो !

" म्हण " ह्या शब्दाचा उपयोग आणखींही एका अर्थानें करण्यांत येतो. "अठ्याहत्तर सालच्या दुःष्काळाचे प्रसंगीं महाराष्ट्रांत एक लक्ष माणूस

मेलें अशी म्हण आहे, " ह्या वाक्यांत " म्हण " हा शब्द दंतकथा ह्या अर्थानें योजला आहे.

येणेंप्रमाणें " म्हण " हा शब्द व्यवहारांत सहा अर्थांनीं योजण्यांत येतो. त्या सहा अर्थांपैकीं पहिल्या अर्थाच्या ज्या म्हणी, त्यांनाच आम्ही " म्हण " हा शब्द ह्या निबंधांत लाविला आहे. इतर अर्थांच्या ज्या म्हणी, त्यांचाही आम्ही प्रसंगोपात्त विचार केला आहे. परंतु त्यांच्या संबंधानें आम्ही " म्हण " हा शब्द योजलेला नाहीं हें वाचकांनीं लक्ष्यांत बाळगावें.

ह्या निबंधाचीं आम्ही आठ प्रकरणें केलीं आहेत. पहिल्या प्रकरणांत आम्ही म्हणींची व्याख्या ठरविली आहे. दुसऱ्या प्रकरणांत म्हणींच्या रूपांविषयीं आम्ही विचार केला आहे. तिसऱ्या प्रकरणांत म्हणींच्या अनावश्यक गुणांविषयीं विचार केला आहे, आणि प्रसंगोपात्त म्हणींतील अलंकारांविषयीं थोडीशी चर्चा केली आहे. चवथ्या प्रकरणांत म्हणींची उत्पत्ति कशी होते आणि म्हणींच्या अभ्यासापासून आपणाला ह्या म्हणी वापरणाऱ्या जनसमूहासंबंधीं कशी माहिती मिळते, हें सांगितलें आहे. पांचव्या प्रकरणांत म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें ह्यांच्यांत फरक कसा असतो ह्याचें विवरण केलें आहे. सहाव्या प्रकरणांत म्हणींची उन्नति आणि अवनति कशी होते हें सांगितलें आहे. सातव्या प्रकरणांत कांहीं चमत्कारिक म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें ह्यांचीं उदाहरणें दिलीं आहेत. आणि शेवटच्या म्हणजे आठव्या प्रकरणांत विषयाची समाप्ति करून वाचकांची रजा घेतली आहे.

येणेंप्रमाणें आमच्या ह्या निबंधाची मांडणी आम्ही केली आहे इतकें सांगून आतां आम्ही आमच्या विषयाकडे वळतों.

प्रकरण १ लें.

म्हण म्हणजे काय ?

हा म्हणींचा विषय मोठा गहन आहे, आणि त्याची मनोरंजकता प्रायः प्रतिपादन करणारावर अवलंबून असते; म्हणजे प्रतिपादन करणारा जितका विद्वान व बहुश्रुत, तितका हा विषय अधिक मनोरंजक होतो; परंतु सक-

इतर्शनीं कोणी असें म्हणतील कीं, म्हणी हा विषय गहन कसचा आणि यांत मनोरंजक तरी काय असणार ? परंतु पुढें जे विचार आम्ही सादर करणार आहों, त्यांचें पर्यालोचन केलें असतां हा विषय किती गहन आहे, हें वाचकांस कळून येईल. पण तसें न झाल्यास ती म्हणींच्या अंगची कमतरता न समजतां वाचकांनीं आमच्याकडून यथोचित विवेचन झालें नाहीं इतकेंच समजावें.

प्रथम " म्हण " म्हणजे काय याचा विचार करूं. आपण मनास वाटतील त्या पांच पन्नास म्हणी गोळा करूं. उदाहरणार्थ 'करील तो भरील,' 'दिव्याखालीं अंधेर,' 'थोडी तों गोडी, फार तों लबाडी,' 'घर फिरलें म्हणजे घराचे वांसेही फिरतात,' 'गांव करी तें राव न करी,' 'चोराचीं पावलें चोरास ठाऊक,' 'झाकली मूठ सव्वा लाखाची,' 'तुरुतदान महा पुण्य,' इत्यादि; किंवा दुसऱ्या कोणत्याही, आणि त्या साऱ्यांत साधारण असें काय आहे हें पाहूं गेलों, तर आपणांस कळून येईल कीं, म्हण हें कांहीं अनुभव, माहिती, सार्वकालिक सत्य सांगणारें किंवा कांहीं बोध करणारें वाक्य असतें. म्हणजे ज्या ज्ञानाचा किंवा बोधाचा आपणास हरएक प्रसंगीं उपयोग होईल, आणि म्हणून जें लक्ष्यांत टेवण्यास योग्य, असें जें वाक्य तें म्हण होय. आपण कोणतीही म्हण जरी घेतली, तरी तिच्यांत कांहींना कांहीं तरी ज्ञान सांटवलेलें आपणास आढळेलच. संसारांतील कोणतीही घडामोड घ्या, त्या घडामोडीशीं संबंध असलल्या लोकांस उपयोगीं पडणाऱ्या निदान दहा पांच म्हणीं सांपडावयाच्या नाहींत असें बहुशः व्हावयाचें नाहीं. व्यापार, शेतकी, चाकरी, या विषयीं; हरएक धंदा, रोजगार, याविषयीं; आईबाप व मुलें, बहिण भावंडें, नवराबायको, सासवासुना, गुरुशिष्य, इत्यादिकांनीं एकमेकांशीं कसें वागावें या विषयीं, व तसें न वागलें असतां होणारे जे दुष्परिणाम त्या विषयीं; तसेंच न्याय, दया, प्रीति, विवेक, इत्यादिकांपासून होणाऱ्या सुखांविषयीं; तसेंच काम, क्रोध, लोभ, मोह, मद, आणि मत्सर, ह्या षड्रिपूंच्या स्वैराचारापासून होणाऱ्या दुःखाविषयीं; उद्योग, दिर्घप्रयत्न, टापटीप, व्यवस्थेशीरपणा, वक्तशीरपणा, इत्यादिकांपासून संसारांत होणाऱ्या असंख्य लाभांविषयीं; वैभव प्राप्त झालें असतां कसें वागावें, आपत्कालीं कसें वागावें, ह्या विषयीं; तसेंच दुसऱ्या हजारों बारिक सारिक गोष्टींविषयीं ज्ञान, माहिती व अनुभव किंवा उपदेश म्हणींत हीं दृष्टीस पडतात.

फार काय सांगावें ? ह्या संसारांत असें कोणतेंही संकट नाहीं, कीं जें एकाद्या म्हणीप्रमाणें आपण वर्तन केलें असतां आपणांस टाळतां येणार नाहीं !

येथवर आह्मी जे विचार नमूद केले आहेत, त्यांवरून म्हणीचें स्वरूप कसें असतें हें वाचकांना कळून येईल. कांहीं ज्ञान देणारें, किंवा कांहीं बोध करणारें जें वाक्य तें म्हण असें आह्मी म्हटलें आहे. ह्यावरून म्हण हें एक-वाक्यात्मक वचन असा वाचकांचा समज होईल. तो जरी बहुतांशीं खरा असला, तरी कांहीं म्हणी द्विवाक्यात्मक असतात, कांहीं त्रिवाक्यात्मक असतात, आणि कांहींमध्यें तिहींहून अधिक वाक्यें सुद्धां असतात. परंतु अशा म्हणींची संख्या फार कमी आहे, आणि अशा म्हणी असल्यानें म्हणींचें स्वरूप जें आम्ही वर सांगितलें आहे, त्याला शास्त्रीय दृष्ट्या कांहीं बाध येत नाहीं.

परंतु एकाद्या वचनामध्यें कांहीं ज्ञान किंवा बोध साठविलेला असला तर एवढ्याच एका गुणावरून तें वचन म्हण ह्या संज्ञेस पात्र होतें असें नव्हे, तर त्या वचनांत आणखीही एक गुण असावा लागतो. तो गुण हा कीं, त्यांत अर्थाच्या मानानें शब्द थोडे असावेत, म्हणजे पुष्कळ अर्थाचा समावेश अगदीं थोड्या शब्दांत केलेला असावा.

उदाहरणार्थ " हातच्या कांकणास आरसा कशाला ? " ही म्हण आपण घेऊं. ह्या म्हणीमध्यें चारच शब्द असून त्यांत अर्थ ठासून भरलेला आहे "ज्या वस्तूचें स्वरूप आपल्यापाशीं असलेल्या साधनांनींच सहज रीतीनें पण पूर्णपणें समजण्याजोगें आहे, त्या वस्तूचें स्वरूप समजून घेण्यासाठीं अन्य साधनांचा किंवा बाहेरच्या साधनाचा अवलंब करण्याचें कारण नाहीं." ह्या वाक्यांत पंचवीस शब्द योजून जो अर्थ आणिलेला आहे, तोच अर्थ "हातच्या कांकणास आरसा कशाला ? " ह्या चारच शब्दांच्या वाक्यांत संकलित होऊन राहिला आहे. दोन्ही वाक्यांचा अर्थ जरी एकच आहे, तरी पहिलें वाक्य लांबलचक असल्यामुळें त्याला "म्हण" ही संज्ञा लावितां येत नाहीं, आणि दुसरें वाक्य म्हणीच्या योग्यतेस पोंचलेलें आहे.

आपण दुसरें एक उदाहरण घेऊं. " पळसाला पानें तीन, " ह्या म्हणींत तीनच शब्द आहेत. परंतु त्या तीन शब्दांत किती विस्तीर्ण अर्थ भरला आहे तो पहा. "कोणी मनुष्य आपल्या परिस्थितींत बदल करून सुखाचें प्रमाण वाढविण्याचा व दुःखाचें प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करूं लागल्यास त्याला असें आढळून येईल कीं, परिस्थितींत बदल झाला तरी

सुखदुःखांचें प्रमाण कायमच राहातें ! ह्या वाक्यांत तीस शब्द आहेत आणि " पळसाला पानें तीन, " ह्या वाक्यांत तीन शब्द आहेत. दोन्ही वाक्यांत अर्थ तोंच आहे, परंतु पाहिल्यांत पाल्हाळ आहे म्हणून त्याला "म्हण" ही संज्ञा लावतां येत नाहीं, आणि दुसऱ्यांत अत्यंत संकोच आहे म्हणून त्याला म्हणीची योग्यता प्राप्त झालेली आहे.

" जनीं जनार्दन " ह्या म्हणींत तर दोनच शब्द आहेत ! आणि त्या मानानें अर्थ किती विस्तीर्ण आणि किती बोधप्रद आहे बरें !

" डोळे पापी, " ह्या चिमुकल्या म्हणींतही दोनच शब्द आहेत, परंतु त्यांत किती मूल्यवान् ज्ञान भरलेलें आहे पहा ! म्हण आपणास असें सांगते कीं, सारें पाप, सारा खोडमाळपणा, काय तो डोळ्यांचा असतो. आपणाला न कळतां पुष्कळ भलभलत्या गोष्टी होत असतात, त्या आपणास चालतात, परंतु एखादी क्षुल्लक गोष्टही जर आपल्या डोळ्यांदेखत घडली, तर ती आपणास खपत नाहीं !

येथें हें सांगावयास नको कीं, म्हणीमध्यें अर्थ अतिशय संकोचित झालेला असतो खरा, परंतु तो अर्थ अगदीं स्पष्ट असून अशिक्षित लोकांस देखील समजण्याजोगा असतो, आणि म्हणूनच सर्व लोकांस,—पुरुषांस व बायकांस, गरिबांस व श्रीमंतांस, सुशिक्षितांस व अशिक्षितास, सर्व लोकांस म्हणी आवडतात, व हरएक प्रसंगीं त्यांचा उपयोग केला जातो. उदाहरणार्थ " परदुःख शीतल," "बळी तो कान पिळी," "पिंडीं तें ब्रम्हांडीं," "पायींची वहाण पायींच बरी," "कर नाहीं त्यास डर नाहीं," "करील तो भरील," " पडलें शेण माती घेऊन उठतें, " "दिव्याखालीं अंधेर," " तुरुतदान महापुण्य, " वगैरे म्हणी अल्पशब्दात्मक म्हणींची उदाहरणें असून त्यांत अत्यंत खोल, गंभीर, व विस्तृत अर्थ आहे. तो प्रमाणांनीं सिद्ध करूं म्हटलें तर एका एका म्हणीवर केवढा ग्रंथ होईल !

एथवर जें विवेचन झालें त्यावरून वाचकांस हें कळलेंच असेल कीं कोणत्याही वचनास म्हण ही संज्ञा लावावयाची असल्यास त्याच्या ठायीं ज्ञान किंवा बोध भरलेला असून शिवाय तो अगदीं थोडक्या शब्दांत समाविष्ट झालेला असला पाहिजे. परंतु हे दोन गुण म्हणजे ज्ञान किंवा बोध आणि संकोच असल्यानेंच कोणतेंही वचन म्हणीच्या योग्यतेस पावतें असें नव्हे. म्हणींमध्यें तिसराही एक गुण असावा लागतो. तो कोणचा तर चट-

कदारपणा; म्हणजे जें ज्ञान दिलेलें असतें तें चटकदार रीतीनें दिलेलें असलें पाहिजे. नाहींतर त्या वचनास "म्हण" असें म्हणतां यावयाचें नाहीं. उदाहरणार्थ आपण ही म्हण घेऊं. "चोराला चावला विंचु, चोर करीना हूं कीं चूं," ह्या म्हणींत निंद्य कर्मकरणारांवर एकादें संकट आलें असतां त्यांस तें बाहेर सांगतां येत नाहीं. हा अर्थ आहे; पण तोच पहा किती खुबीनें, किती मजेदार रीतीनें आणला आहे बरें ! समजा कीं, ह्या म्हणीच्या ऐवजीं आपण असें म्हटलें, "वाईट कर्म करीत असतां मनुष्यास कांहीं संकटें प्राप्त झालीं, तर तीं त्याला निमूटपणें सोसावीं लागतात," तर वरील म्हणींत जो अर्थ आहे, तोच अर्थ या वाक्यांत येईल. पण ह्या म्हणींत जी खुमारी आहे, ती या वाक्यांत नाहीं. ह्या म्हणीच्या पुढें हें वाक्य फिकें दिसतें आणि जरी ह्या लांबलचक वाक्याचा खरेपणा शंकाबाह्य आहे, तरी तें ह्या म्हणीइतकें आपल्या अंतःकरणांस संतुष्ट करीत नाहीं, किंवा तें लक्ष्यांत ठेवण्याविषयीं स्फूर्तीहि आपणास होत नाहीं. अत एव त्या वाक्यास " म्हण " ही संज्ञा प्राप्त होणार नाहीं.

आतां आपण दुसरी एक म्हण घेऊं. " अति शहाणा त्याचा बैल रिकामा, " ह्या म्हणींत तरी किती मनोहरपणा आहे! जो मनुष्य आपल्या शहाणपणानें लोकांस दिपवून सोडण्याचा प्रयत्न मूर्ख तऱ्हेनें करतो, तो अंतीं स्वतःचें हसें करून घेतो असा अर्थ आहे. पण त्यांत किती विनोद भरला आहे पहा !

आणखीं एक म्हण घ्या. " कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ. " येथें देशद्रोही मनुष्याचें वर्णन किती मर्मभेदक शब्दांनीं केलें आहे ! कुऱ्हाडीचा फाळ पोलादी असून तीक्ष्ण असतो, पण त्या फाळाला लाकडाचा दांडा बसविल्याशिवाय झाडें तोडण्याचें कार्य होऊं शकत नाहीं. लाकडाचा दांडा जसा आपल्या जातभाईचा (म्हणजे वृक्षांचा) संहार करतो, त्याप्रमाणें देशद्रोही मनुष्य आपल्या देशाची हानि करावयाला कारणीभूत होतो ! ह्या म्हणींत देशद्रोही मनुष्याचें चित्र किती चटकदार रीतीनें रेखाटलें आहे तरी !

असो. एथवर म्हणींच्या तीन गुणांचें विवेचन झालें. म्हणजे म्हणींत कांहीं तरी बोध किंवा ज्ञान भरलेलें असलें पाहिजे. त्यांत अल्पशब्दात्मकता पाहिजे, आणि त्यांत कांहीं तरी खुबी किंवा चटकदारपणा पाहिजे. परंतु एवढ्या तीन

गुणांनींच म्हण होते असें नाहीं. चवथाही एक गुण म्हणींमध्यें असला पाहिजे. तो कोणचा तर जनसंमति. वरील तीन्ही गुणांनीं युक्त अशा वचनाचा लोकांनीं अंगीकार केलेला असला पाहिजे. ही लोकांची संमति व हा अंगीकार जर नसेल, तर कोणतेंही वचन,—मग तें कितीही शहाणपणाचें असो, व कितीही संकुचित व चटकदार असो,—त्यास 'म्हण' ही संज्ञा प्राप्त व्हावयाची नाहीं. हा गुण म्हणजे जनसंमति, म्हणींत अवश्य असला पाहिजे; एखाद्या वचनांत फारसें ज्ञान नसलें, किंवा तींत फारशी खुबी नसली. किंवा फारसा अर्थसंकोच नसला तरी कदाचित् चालेल; पण ही जनसंमति जर नसली, तर त्या वचनास "म्हण" असें कदापि म्हणतां यावयाचें नाहीं. ह्या जनसंमतीस म्हणीचा प्राण म्हटलें असतां चालेल.

ह्या वरील विवेचनावरून वाचकांचे लक्ष्यांत आलेंच असेल कीं, खरें ह्मटलें असतां जनसंमति हाच काय तो ह्मणीचा आवश्यक व प्रधान गुण होय, आणि बाकीचे गुण अनावश्यक म्हटलें असतां चालेल; आणि "ह्मण" ह्या नांवावरून सुद्धां ह्मणीची व्याख्या स्पष्ट होते. जें वचन लोक वारवार म्हणतात, तीच "ह्मण" होय.*म्हणजे लोक ज्या वचनाचा नेहमीं उपयोग करितात तें वचन; आणि डॉक्टर जॉन्सननें जी ह्मणीची व्याख्या दिली आहे, तीही ह्याच अर्थाची आहे. "Short sentences frequently repeated by people" म्हणजे लोकांनीं वारंवार ह्मटलेलीं लहान वाक्यें. आतां लोकांनीं कोणत्याही वचनाचा वारंवार उपयोग करणें हेंच त्या वचनाच्या खरेपणाचें निदर्शक होय. म्हणींतील अर्थ लोकांस कबूल आहे, म्हणूनच हरएक प्रसंगीं बोलण्या चालण्यांत व व्यवहारांत ते तिचा उपयोग करितात; संसारांतील हरएक बाबतींत ह्मणीचा खरेपणा कसास लागून तो निर्विवाद होऊन ठरून गेलेला असतो, आणि ज्या अर्थीं हा खरेपणा आधींच ठरून गेलेला असतो, त्या अर्थीं लोकांचें मन वळविण्याच्या किंवा लोकांची खात्री करण्याच्या कामीं ह्मणीचा वारंवार उपयोग होतो. तसा ज्ञान,

---

*ह्मणींचा वाचक स्पानिश भाषेंत "Refrans" हा शब्द आहे.ह्याची उपपत्ति पुढील उताऱ्यावरून कळून येईल:—"Refrans or proverbs, a term derived a Referendo because it is often repeated."

J. D. Israeli.

चमत्कृति आणि संकोच ह्या तीन गुणांनीं विशिष्ट अशा एकाद्या नवीन वचनाचा होणार नाहीं. म्हणीला ही जी जनसंमति प्राप्त झालेली असते, तिच्या योगानें जें सर्वांनीं कबूल केलें तें आपणांस करावयास कांहीं हरकत नाहीं किंवा केलें पाहिजे असें आपणांस वाटतें.

म्हणींत ही जी जनसंमति असते, तिला नाण्यावरील शिक्क्याची उपमा देतां येईल. एकादा साधा बिनशिक्क्याचा रुप्याचा तुकडा व शिक्का असलेलें रुप्याचें नाणें, ह्या दोहोंत जो भेद, तोच म्हणींत आणि जनसंमति ज्यास प्राप्त झाली नाहीं अशा एकाद्या ज्ञानचारुतासंकोच ह्याच तीन गुणांनीं विशिष्ट अशा वचनांत भेद, असें आपणास म्हणतां येईल. बिनशिक्क्याच्या रुप्याच्या तुकड्याची किंमत शिक्क्याच्या तुकड्याइतकी असेल किंवा नसेल, परंतु आहे अशी जरी कल्पना केली, तरी ती सहज रीतीनें सिद्ध करून दाखवितां येणार नाहीं, आणि म्हणून लोक त्याचा स्वीकार करणार नाहींत, किंवा करावयास मागें पुढें पाहातील; परंतु ज्याच्यावर शिक्का आहे असें नाणं लोकांच्या हातांत खेळलेलें असतें, व त्याची किंमत लोकांनीं कबूल केलेली असते, म्हणून त्याचा स्वीकार करण्यांत लोकांना कांहीं जोखीम वाटत नाहीं. हीच गोष्ट म्हणींसंबंधानेंही लागू आहे. एकादें म्हणीच्या धर्तीवर तयार केलेलें नवें वचन जरी खरें असलें, तरी त्याचा खरेपणा सिद्ध केल्याशिवाय लोकांचा त्याचेवर भरंवसा बसणार नाहीं; परंतु म्हण आधींच रूढ झाली असल्याकारणानें सत्यासत्यतेचा निर्णय होऊन गेलेला असतो, व म्हणूनच ती लोकांनीं कबूल करणें साहाजिक असतें.

सतराव्या शतकांत इग्लंडांत जेम्स हॉवेल म्हणून एक ग्रंथकार होऊन गेला. त्यानें इंग्रजी म्हणी गोळा केल्या होत्या. त्यांच्या आरंभीं त्यानें जी प्रस्तावना केली आहे, तींत ह्याच अर्थाच्या चार मार्मिक कविता आहेत, त्या येणें प्रमाणें:—

*The people's voice the voice of God we call,
And what are proverbs but the people's voice?
Coined first and current made by common choice,
Then sure they must have weight and truth withall.

---

*ह्या चुटक्याती ५ पहिली ओळ वाचून " पांचां मुखीं परमेश्वर " ही म्हण वाचकांस आठवेलच.

असो. म्हणीमध्यें हे चार गुण ज्ञान, चटकदारपणा, अर्थसंकोच व जनसंमति हे असतात. ह्या गुणचतुष्टयांत जनसंमतीस प्राधान्य आहे हेंही मागें सांगण्यांत आलेंच आहे. आतां हे चार गुण म्हणींमध्यें कोणच्या प्रमाणांत असतात, हें जर पाहूं गेलों, तर आपणास आढळेल कीं, ज्या म्हणींत चटकदारपणा नाहीं अशा कांहीं आहेत; ज्यामध्यें ज्ञान नाहीं अशा म्हणी त्याहून थोड्या; ज्या म्हणींत अर्थसंकोच नाहीं अशा म्हणी त्यांहूनही थोड्या किंवा मुळींच नाहींत असें म्हटलें तरी चालेल. परंतु जिला जनसंमति नाहीं, अशी म्हण अर्थात् एकही असावयाची नाहीं.

प्रकरण २ रें.

म्हणींचीं रूपें.

येथवर आम्ही म्हणींची व्याख्या ठरविली. आतां म्हणींच्या रूपांविषयीं किंवा व्याकरण दृष्ट्या म्हणींची घटना कशी असते ह्या विषयीं विचार करूं.

म्हणींची घटना अनेक प्रकारची असते. बहुतेक म्हणी जरी एकवाक्यात्मक असतात, तरी बऱ्याच म्हणी अनेकवाक्यात्मक असतात आणि कित्येकांत वाक्याची सांगता करण्यासाठीं अध्याहृत शब्द घेऊन वाक्य बनवावें लागतें.

कांहीं म्हणी वर्तमानकाळच्या, कांहीं भूतकाळच्या, आणि कांहीं भविष्यकाळच्या क्रियापदांनीं घटित असतात. कांहीं म्हणी प्रश्नरूप असतात, कांहीं प्रश्नोत्तररूप असतात. कांहीं म्हणींत कार्यकारणभावाचा अवलंब केलेला असतो. कांहीं म्हणी विध्यर्थाच्या रूपांत असतात, कांहीं म्हणी आज्ञार्थरूप असतात.

ऊन्ह पाण्यानें घरें जळत नसतात, आपली पाठ आपल्याला दिसत नाहीं, आडला नारायण गाढवाचे पाय धरी, अंधळा मागतो एकच डोळा, आकारे रंगती चेष्टा, आधणांतले रडतात आणि सुपांतले हसतात, आधीं बुद्धि जाते मग लक्ष्मी जाते, कर नाहीं त्याला

डर नाहीं, खाई त्याला खवखवे, इत्यादि म्हणींतील क्रियापदें वर्तमान-काळीं आहेत.

गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीं तर मोडून खाल्ली, फार झालें हसूं आलें, ह्या म्हणींतील क्रियापदें भूतकाळचीं आहेत.

असतील शितें तर मिळतील भुतें. गर्जेल तो पडेल काय? चढेल तो पडेल, पोहेल तो बुडेल, ह्या म्हणींतील क्रियापदें भविष्यकाळचीं आहेत.

करीस कां आणि कुथस कां?, आडांत नाहीं तर पोहोऱ्यांत कोठून येणार?, जळत घर भाड्यानें कोण घेतो ? ताकाला जावें आणि भांडें कां लपवावें ? नखानें काम होतें तें कुऱ्हाड कशाला ?, गाढवाला दिवाळी काय माहीत ?, हातच्या कांकणाला आरसा कशाला?, इत्यादि म्हणी प्रश्नरूप आहेत.

उंटा उंटा, तुझी मान कां रे वांकडी ? माझें काय सरळ आहे ? ह्या व दुसऱ्या पुष्कळ म्हणी प्रश्नोत्तररूप आहेत.

अचाट खाणें आणि मसणांत जाणें, असंगाशीं संग आणि प्राणांशीं गांठ, ह्या म्हणींत कार्यकारणभाव आहे.

'अंथरूण पाहून पाय पसरावे', 'अर्धी टाकून सगळीला धावूं नये,' 'करावें तसें भरावें,' 'एका कानानें ऐकावें आणि दुसऱ्यानें सोडून द्यावें.' 'ऐकावें जनाचें आणि करावें मनाचें,' 'गूळ नाहीं तरी गुळासारखी वाचा असावी,' 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी,' इत्यादि म्हणींतील क्रियापदें विध्यर्थी आहेत.

' उंस गोड पण मुळ्या सोड, ' ' कुडा कान ठेवी ध्यान, ' ह्या म्हणी आज्ञार्थरूप आहेत.

' ऐकावें जनाचें करावें मनाचें, ' ' खर्चणाराचें खर्चतें आणि कोठा-वळ्याचें पोट दुखतें,' 'गरज सरो आणि वैद्य मरो,' 'गांवठ्यापुढें वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता, ' ' घर बांधून पहावें आणि लग्न करून पहावें, ' इत्यादि म्हणी द्विवाक्यात्मक आहेत. तसेंच ' कडू कारलें तुपांत तळलें, साखरेंत घोळलें तरी कडू तें कडूच ! ' ' खिळ्यासाठीं नाल गेला, नालासाठीं घोडा गेला, घोड्यासाठीं स्वार गेला, एवढा अनर्थ खिळ्यानें केला,' 'राजा बोले दळ हाले, काजी बोले दाढी हाले,' वगैरे म्हणी अनेकवाक्यात्मक आहेत.

पुष्कळ म्हणी अशा आहेत कीं त्यांतील वाक्यांची सांगता करावयासाठीं

क्रियापदें, उभयान्वयी अव्ययें, वगैरे कांहीं वाक्यांगें घालावीं लागतात. 'मूर्ति तितक्या प्रकृति,' 'विंचवाचें बिऱ्हाड पाठीवर,' 'दिशीं विद्या तिशीं धन,' 'व्याप तितका संताप,' 'हजीर तो वजीर,' इत्यादि म्हणींत वाक्याची सांगता करण्यासाठीं, कांहीं ठिकाणीं विशेषण, कांहीं ठिकाणीं क्रियाविशेषण, वगैरे कांहीं वाक्यांगें घालावीं लागतात. असो.

येथवर जें विवेचन केलें आहे त्यावरून वाचकांना म्हणींमध्यें काय मजकूर असतो आणि म्हणींचीं घटना कशी असते हें कळून येईल.

प्रकरण ३ रें.

म्हणींतील चारुतेचीं कारणें.

१

व्यावहारिक निरूपण.

पहिल्या प्रकरणांत आम्ही म्हणींची व्याख्या केली आणि म्हणींमध्यें कोणचे चार गुण अवश्य असावे लागतात हें सांगितलें. नंतर दुसऱ्या प्रकरणांत म्हणींचीं रूपें कशीं असतात हें सांगितलें. आतां ह्या तिसऱ्या प्रकरणांत म्हणींची चारुता, चमत्कृति, किंवा चटकदारी, कशावर अवलंबून असते हें पाहाण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहों, आणि नंतर म्हणींच्या अंगच्या चारुतेंत अलंकारांनीं कशी भर पडते हें सांगणार आहों.

म्हणींतील चारुता कशी उत्पन्न होते हें सांगणें कठिण आहे. मानसशास्त्रांत आम्ही अजाण असल्याकारणानें आम्हाला खात्रीनें कांहीं सांगतां येणार नाहीं. व्यावहारिक दृष्टीनें विचार करतां आम्हाला असें वाटतें कीं, म्हणींचे ठायीं जी चारुता अवश्य असावयाला पाहिजे, ती म्हणींतील सत्याच्या बहुमूल्यत्वावर, किंवा अनुभवाच्या क्षेत्राच्या विस्तृतत्वावर, किंवा विनोदावर, किंवा विचाराला दिलेल्या छांदिष्टपणाच्या वळणावर, किंवा दुसऱ्यांचीं रहस्यें किंवा गोप्य गोष्टी किंवा निंद्य प्रवृत्ति उघडकीस आणल्यापासून होणाऱ्या राक्षसी आनंदावर अवलंबून असते. ह्यापेक्षां अधिक खोलांत शिरावयाला सध्यां आम्ही असमर्थ आहों. परंतु म्हणींच्या

ठायीं दिसणारी जी कृत्रिम चारुता तिचीं कांहीं कारणें आम्ही येथें नमूद करतों.

कांहीं म्हणींतील चमत्कृति अतिशयोक्तिमूलक असते. याचें उदाहरण, " उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग, " किंवा " दुधानें भाजला तो ताक देखील फुंकून पितो." ह्या दोहोंपैकीं पहिल्या म्हणींत उतावळेपणाचें आणि दुसऱ्या म्हणींत सावधपणाचें अतिशयोक्तीनें वर्णन केलेलें आहे. कारण, कोणीही पुरुष लग्नासाठीं कितीही उतावळा झालेला असला, तरी आपल्याच गुडघ्याला बाशिंग बांधून घेऊन हीच माझी नवरी, इच्याशीं माझें लग्न लावून द्या, असें म्हणावयाचा नाहीं. तसेंच जेवणारा मनुष्य,–ज्याचें तोंड एकदा दुधानें भाजलें आहे,–तो कितीही सावधगीर झाला, तरी तो ताक फुंकून पीईल हें संभवनीय नाहीं. "आठ पुरभय्ये आणि नऊ चौके," हीही म्हण अशाच प्रकारची होय. ह्या म्हणींत पुरभय्ये लोकांच्या अतिसोवळेपणामुळें त्यांच्यांत जो पराकाष्ठेचा एकलकोंडेपणा आलेला असतो, त्याचें अतिशयोक्ति करून चटकदार वर्णन केलेलें आहे.

कांहीं म्हणींतील चमत्कृतींच्या मूळाशीं अकल्पित साम्य असतें. "शिकविलेली बुद्धि आणि टांगलेली शिदोरी (फार वेळ पुरत नाहीं)." ह्या म्हणींत बुद्धि आणि खावयाचें अन्न ह्या दोन असंबद्ध वस्तूंचें "फार वेळ न पुरणें" ह्या बाबतींत साम्य वर्णिलेलें आहे.

कांहीं म्हणींत लक्षणा केलेली असते म्हणून त्यांचे ठायीं चमत्कृति उत्पन्न झालेली असतें. " फजीतीच्या पायीं घुंगुरूं, " ह्या म्हणींत फजीती ह्या अचेतन पदार्थावर सचेतनत्वाचा आरोप करण्यांत आला आहे. म्हणून येथें चमत्कृति उत्पन्न झाली आहे. कोणताही अर्थालंकार असला तरी त्याला 'लक्षणा', हा मोघम शब्द आम्ही योजीत आहों, हें अलंकारशास्त्रज्ञांच्या लक्ष्यांत येईलच. " भीड भिकेची बहीण, " " कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ," वगैरेंमध्यें लक्षणा समाविष्ट झालेली आहे.

कांहीं म्हणींत तुल्ययोग असल्यामुळें चमत्कृति उत्पन्न झालेली असते. हा शब्द आम्ही नवीन तयार केला आहे, म्हणून तो आम्हीं कोणत्या अर्थानें योजीत आहों हें येथें सांगितलें पाहिजे. जेव्हां भिन्न भिन्न वस्तु परस्परविरूद्ध अशा परिस्थितींत असून कांहीं विवक्षित उपाधींनीं तुल्यता पावतात, आणि म्हणून त्या वस्तूंविषयीं एकच विधान करतां येतें, तेव्हां तुल्ययोग होतो.

म्हणजे भिन्न भिन्न वस्तू एका विशिष्ट बाबतींत तुल्य ठरवून त्यांचा एकाच विधानांत जो योग अथवा संबंध घडवून आणणें, तो तुल्ययोग. "हसता पुरुष आणि रडती बायको (भयंकर)," ह्या म्हणींत तुल्ययोग आहे. "पुरुष" आणि "बायको" ह्या दोन भिन्न भिन्न वस्तु असून आणि त्या "हसणें" आणि "रडणें" ह्या परस्परविरुद्ध परिस्थितींत असून कार्यसाधुत्वाच्या दृष्टीनें साम्य पावल्या आहेत. "गवत गोंडाळ, बायको तोंडाळ, आणि शेत धोंडाळ, (हीं त्याज्य होत)," "सोयऱ्यांत साडू, जेवणांत लाडू, आणि हत्यारांत माडू," "चढणीस घोडा आणि उतरणीस रेडा (म्होयीचा)," "उभें कुसळ आडवें मुसळ (उपद्रवकारक असतें)," वगैरे म्हणी तुल्ययोगाचींच उदाहरणें होत.

कांहीं म्हणींतील चमत्कृति श्लेषमूलक असते. वाक्यामध्यें एकाच शब्दाचे अनेक अर्थ विवक्षित असतात तेथें "श्लेष" नामक अलंकार होतो. "तूं मलिन कुटिल नीरस इ०" ही मोरोपंताची आर्या किंवा "नलगे औषध मजला इ०" ही रघुनाथपंडितांची आर्या, हीं श्लेषाचीं उत्कृष्ट आणि सर्वांस ठाऊक असलेलीं उदाहरणें होत. श्लेषामुळें मनोहर झालेल्या म्हणींचें उत्तम उदाहरण "काळ आला होता पण वेळ आली नव्हती" हें होय. येथें 'काळ' ह्या शब्दाचे 'मृत्यु' आणि 'समय,' असे दोन अर्थ घ्यावयाचे.

कांहीं म्हणी विरोधामुळें मनोहर झालेल्या असतात. याचें उदाहरण "होणार सोडील पण शोणार (सोनार) सोडणार नाहीं." ह्या म्हणीचा अर्थ असा कीं, दैव कदाचित् आपला भाग घ्यावयास चुकेल, पण सोनार आपला भाग घ्यावयास कधींही चुकणार नाहीं. "आपला तो बाबल्या आणि दुसऱ्याचें तें कारटें," हेंही अशाच प्रकारचें उदाहरण होय.

मनुष्यमात्राचे ठायीं आप्पलपोटेपणा, मत्सर, दुष्टपणा, विश्वासघातकीपणा, घरबुडवेपणा, निमकहरामी, बढाईखोरपणा, इत्यादि दुर्गुणांकडे कमी जास्ती प्रमाणांत प्रवृत्ति असते, आणि त्या प्रवृत्तीचा परिणाम त्याच्या वर्तनावर स्पष्ट किंवा अस्पष्ट रीतीनें सदैव घडतच असतो. ही प्रवृत्ति आपल्या ठायीं आहे, किंवा ह्या प्रेरणेमुळेंच एकाद्या विशिष्ट प्रसंगीं आपलें अमुक प्रकारचें वर्तन घडलें, असें कोणीही मनुष्य कबूल करावयास सिद्ध नसतो. तेव्हां अशा प्रकारची एकाद्या माणसाची दुष्ट प्रवृत्ति किंवा त्या प्रवृत्तीमुळें घडलेलें त्याचें वर्तन कोणी चवाठ्यावर आणून त्याचा उपहास केला असतां, किंवा त्याची गर्ह्यता

लोकांच्या निदर्शनास आणून दिली असतां, ह्या गौप्यस्फोटामुळें भोंवतालच्या माणसांस आनंद होतो. मानवी हृदयांतलि पापी गौप्यं बाहेर काढण्याच्या योगानें पुष्कळ म्हणींचे ठायीं चमत्कृति उत्पन्न झालेली असते असें आपणास आढळून येतें. "आपलें वासरूं दुसऱ्याच्या गायीस प्यालें तर प्यालें," "गोडबोल्या सालसोल्या," "कुऱ्हाडीचा दांडा गोताम काळ," वगैरे म्हणींच्या ठायीं जी चमत्कृति आहे, तिचें निदान हुडकूं गेल्यास तें मानवी स्वभावांतील दुष्ट प्रवृत्तीच्या प्रकटीकरणामध्यें आहे असें आपणास कबूल करावें लागेल.

पुष्कळ म्हणींचे ठायीं चारुता उत्पन्न होते, तिचें एक कारण असें दिसतें कीं त्यांत मोठ्या समूहाविषयीं बोलावयाचें असतां लहान समूहाविषयीं विधान केलेलें असते, किंवा एकाद्या समूहाविषयीं बोलावयाचें त्या समूहांतील एकाच विशिष्ट व्यक्तीसंबंधानें विधान केलेलें असतें; म्हणजे असें कीं जाति बद्दल उपजाति घातलेली असते, किंवा जातीबद्दल व्यक्ति योजिलेली असते. मोठ्या समूहांतून एकच विशिष्ट भाग निवडून काढणें, किंवा एकाद्या समूहांतून एकच विशिष्ट व्यक्ति निवडून काढणें, ह्या प्रकाराला आपण "विशेषणा" हा शब्द लावूं. अशा प्रकारच्या विशेषणेच्या योगानें पुष्कळ म्हणींचे ठायीं चारुता आलेली असते.

उदाहरणार्थ "असतील शितें तर मिळतील भुतें." येथें द्रव्य ही जाति व शितें ही उपजाति. हलकट इसम ही जाति व भुतें ही उपजाति. 'मुंगीला मुताचा पूर,' 'नावडतीचें मीठ आळणी,' 'शेळीचे कान गोसाव्याच्या हातीं,' ह्या म्हणींतही जातीबद्दल उपजाति घातली आहे. म्हणींच्या संग्रहांचीं पानें चाळलीं असतां अशा प्रकारच्या शेंकडों म्हणी सांपडतील.

म्हणींतील चारुतेचें दुसरें कारण हें कीं, जातीच्याबद्दल कधीं कधीं व्यक्तिवाचक शब्द घातलेला असतो. उदाहरण 'अडला नारायण गरुडाचे पाय धरी,' येथें 'मोठे लोक' ह्या जातिवाचक शब्दाबद्दल 'नारायण' हा व्यक्तिवाचक शब्द घातला आहे, 'हलके लोक' ह्याबद्दल 'गरुड' हा शब्द घातला आहे. अशाच प्रकारचीं 'कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी!' वगैरे उदाहरणें समजावीं.

जातीबद्दल उपजातीचा व जातीबद्दल व्यक्तीचा उपयोग केल्यानें म्हण अधिक मनोरम कां होते, याचें कारण पाहूं गेल्यास आम्हांस असें वाटतें

कीं, जाति ही उपजातीपेक्षां किंवा व्यक्तीपेक्षां विशाल असल्याकारणानें तिचें आकलन करण्यास बुद्धीस कठिण पडतें; परंतु उपजाति व व्यक्ति लहान असल्यामुळें सोपें पडतें. म्हणींत उपजातिवाचक किंवा व्यक्तिवाचक जे शब्द असतात, ते प्रतिनिधीभूत असतात, आणि म्हणून "शितावरून भाताची परिक्षा," ह्या न्यायानें सर्व जातीचें ज्ञान आपणांस एकदम प्राप्त होतें, आणि अशा रीतीनें मनाला स्वल्प व्यापार केल्यानें बहुत ज्ञान प्राप्त होतें; तर अल्प श्रमानें बहुत ज्ञान मिळण्याची ही सुलभता, तीच उपजातीचा किंवा व्यक्तीचा जातीबद्दल प्रयोग केल्यानें जो आनंद होतो त्याचें कारण होय, असें आम्हांस वाटतें. इष्ट स्थळीं जाण्यास दोन मार्ग असले, तर जवळच्या मार्गानें जाणें कोणाला सुखावह होणार नाहीं ? ह्याचें दुसरें कारण पाहूं गेलों तर आम्हास असें वाटतें कीं, उपजातीवर अथवा व्यक्तीवर चित्ताची एकाग्रता जातीपेक्षां अधिक पूर्णतेनें करितां येते. त्यामुळें उपजातिविषयक किंवा व्यक्तिविषयक विधान आपणांस जितकें स्पष्टपणें कळतें, तितकें जातिविषयक विधान कळत नाही. ज्ञेय पदार्थांचा जों जों विस्तार अधिक, तों तों ज्ञानाची पूर्णता कमी, हा सिद्धांत सर्वसंमत आहे. जातिविषयक विधान केवळ बुद्धिगोचर असतें; परंतु उपजातिविषयक विधान बुद्धिगोचर असून शिवाय प्रत्यक्षगोचरही असतें.

म्हणींच्या ठायीं जी चारुता येतें, ती ज्या कारणांवरून येतें त्यांपैकीं मुख्य मुख्य अशा कांहीं कारणांचें आम्ही येथवर निरूपण केलें. परंतु चारुतेचीं आणखी जीं एक दोन कारणें आहेत तीं वेगळ्या जातीचीं आहेत, तथापि त्यांचाही येथें निर्देश करणें जरूर आहे. तीं कोणची तर यमक आणि अनुप्रास. या दोहोंच्या योगानें म्हण चटकदार होते, परंतु पहिल्या वर्गांतील कारणांनीं म्हणींतील मजकूर चटकदार होतो, आणि ह्या शेवटच्या दोन कारणांनीं "म्हण" कर्णमधुर झाल्यामुळें चटकदार होते, आणि तिच्याठायीं सुलभस्मर्तव्यता येते. यमकानुप्रासमय रचनेचें वास्तव्य जरी शेकडों म्हणींत दृष्टीस पडतें, तरी कोणाही मनुष्याच्या लक्ष्यांत हें सहज येण्याजोगें आहे कीं त्याच्या अस्तित्वाची म्हणीस बिलकूल आवश्यकता नसते. ज्यांस यमक अथवा अनुप्रास नाहीं अशा उत्कृष्ट म्हणी शेकडो आहेत. उदाहरणार्थ 'पंचामुखीं परमेश्वर,' 'चोराचे मनांत चांदणं,' 'भित्याचे पाठीं ब्रम्हराक्षस,' 'थेंबे थेंबे तळें सांचे,' 'दोहों घरचा पाहुणा उपाशीं,' इत्यादि. यमक व

अनुप्रास ह्या गुणांची म्हणीस आवश्यकता नसते, व त्यांच्या योगानें म्हणीच्या अंतःस्वरूपांत देखील तिळमात्र विपर्यास होत नाहीं. पहा कीं, एकाद्या स्त्रीनें भकपेदार अलंकार घातल्यानें तिची शरीरकांति वाढून ती पहिल्यापेक्षां अधिक चित्ताकर्षक होते; परंतु त्या अलंकारांनीं तिच्या मनोविकारादिकांत पालट होत नाहीं. त्याचप्रमाणें पूर्वोक्त यमकानुप्रासघटनेनें म्हण रूचिरतर होऊन चित्तवेधक होते खरी; परंतु तेणेंकरून म्हणींत पिंडीभूत होऊन राहिलेलें जें ज्ञान तें अधिक होतें असें नाहीं.

मराठी कवितेंत यमक कशाला म्हणतात हें कोणासही सांगावयास पाहिजे असें नाहीं. सर्वांस माहीतच आहे कीं, यमक म्हणजे दोन चरणांच्या अंतीं एका किंवा अधिक अक्षरांची जी पुनरावृत्ति, तीस यमक असें म्हणतात. परंतु म्हणीच्या संबंधानें यमक ह्या शब्दाचा उपयोग केला म्हणजे तो वाक्याच्या मुख्य दोन किंवा अधिक भागांच्या शेवटीं पुनरावृत्ति इतकाच घ्यावयाचा. उदाहरण " जें न देखे रवि, तें देखे कवि, " ह्या द्विवाक्यात्मक म्हणीच्या दोन्ही वाक्यांच्या शेवटीं " वि " ह्या अक्षराची पुनरावृत्ति आहे.

अनुप्रास म्हणजे एका किंवा अधिक अक्षरांची दोन किंवा तीन वेळां वाक्यांत कोठें तरी पुनरावृत्ति. उदाहरण 'नकटें व्हावें पण धाकटें होऊं नये' येथें ' कटें ' ह्या अक्षरांची द्विरुक्ति झाली आहे. ह्या जातीचीं दुसरीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. " मेमटा घेतो चिमटा आणि भडभड्याचा होतो बोभाटा, " " ढवळ्या शेजारीं पोवळा बांधला, वाण नाहीं पण गुण लागला, " इ.

म्हणींचे ठायीं जी चमत्कृति असते ती यमक, अनुप्रास, वगैरे शब्दालंकारांनीं कशी उत्पन्न होते हें आम्ही येथवर सांगितलें. तसेंच लक्षणा, तुल्ययोग, अतिशयोक्ति, वगैरेंनीं कशी उत्पन्न होते हें व्यावहारिक रीत्या सांगितलें. परंतु साहित्यशास्त्रकारांनीं वेगवेगळ्या अर्थालंकारांचीं जीं लक्षणें दिलीं आहेत, तीं लक्षणें पूर्णपणें आणि अगदीं तंतोतंत रीतीनें ज्या म्हणींना लागू पडतील, अशाही शेकडों म्हणी मराठी भाषेमध्यें आढळतात. अशा म्हणीचें विवरण आम्ही आतां करतों. तें विवरण साहित्यशास्त्रज्ञांना मनोरंजक वाटेल तसें सामान्य वाचकांनांही वाटेल अशी आम्हाला उमेद आहे. ह्यापुढें जो

मजकूर येईल, त्यांत मागल्या कांहीं मजकुराची पुनरुक्ति झाली आहे असें वाचकांना वाटेल. परंतु पूर्वींचा मजकूर व्यावहारिक निरूपणाच्या रूपांत होता, आणि पुढील मजकूर शास्त्रीय निरूपणाच्या रूपांत येणार आहे. कांहीं मजकूर पुनरुक्त झाल्यास वाचकांनीं आम्हाला क्षमा करावी.

२

शास्त्रीय निरूपण.

कोणत्याही भाषेतील म्हणींचा संग्रह आपण तपासूं लागलों म्हणजे आपलाणा शेंकडो म्हणींमध्यें अलंकार समाविष्ट झालेले आढळतात. हे अलंकार अर्थात् त्या त्या भाषेच्या स्वभावाला साजेसे असतात.

मराठी भाषेतील म्हणींचा संग्रह आपण तपासूं लागलों असतां आपलाणा शेंकडों म्हणींमध्यें नानाप्रकारचे अलंकार समाविष्ट झालेले पाहून गम्मत वाटते.

साहित्यशास्त्रकारांनीं अलंकारांचीं जीं लक्षणें ठरविलीं आहेत, तीं लक्षणें जरी पूर्णपणें म्हणींतील अलंकारांना लागूं पडलीं नाहींत, तरी त्या अलंकारांचा आत्मा त्या म्हणींमध्यें आहे असें आपणाला दिसून येतें. एकाद्या हिंदू मनुष्यानें बूट, पाटलोण, कोट, नेकटाय, कॉलर, भांग पाडलेले केश, कडक उभी टोपी, ह्या पोषाखाच्या चीजा धारण केल्या आणि अशा रीतीनें तो जरी युरोपियनाप्रमाणें बाह्यात्कारें दिसूं लागला, तरी तो वस्तुतः असतो हिंदूच. त्याप्रमाणें एकाद्या विशिष्ट म्हणीमध्यें एकाद्या विशिष्ट अलंकाराचें रूप कितीही पालटलेलें असलें, तरी त्या अलंकाराचें स्वरूप किंवा आत्मा त्या म्हणीमध्यें असतोच असतो; म्हणजे असें कीं तो अलंकाररूपानें जरी साहित्यशास्त्रकारांच्या लक्षणांबरहुकूम नसला, तरी स्वरूपानें तो तसा असतो.

आमच्या ह्या विधानाच्या समर्थनार्थ कांहीं उदाहरणें देतों:—

जेव्हां कांहीं प्रकृत आणि आणि कांहीं अप्रकृत वस्तु ह्यांचा एक समान धर्म एकाच वाक्यांत सांगितलेला असतो तेव्हां 'दीपक' ह्या नांवाचा अलंकार होतो.

> दानानें शोभतो हस्ती, न्यायित्वानें क्षितीश्वर ।
> वेदाभ्यासादि कर्मानें विप्र, सत्कृतिनें नर ॥

गंडस्थळांतून स्रवणाऱ्या पाण्यानें हत्ती, न्यायीपणानें राजा, वेदाचें अध्ययन इत्यादींनीं ब्राह्मण, आणि सत्कृत्यांनीं मनुष्य शोभतो.

ह्या वाक्यामध्यें ‘ क्षितीश्वर ’ प्रकृत असून “ हस्ती ” आणि “ विप्र ” हीं दोन अप्रकृतें आहेत. ह्या तीन्ही वस्तूंचा “शोभतो” हा क्रियारूप धर्म एक वेळ उक्त आहे, म्हणून येथें दीपक नांवाचा अलंकार झाला आहे. हा साहित्यशास्त्रकारांच्या लक्षणाबरहुकूम दीपक अलंकार होय. आतां म्हणींचे ठायीं हा अलंकार कसा दिसतो हें पाहूं.

शिकविलेली बुद्धि आणि टांगलेली शिधोरी (ह्या एका वेळा पुरत्याच उपयोगीं पडणाऱ्या असतात). ह्या म्हणीमध्यें ‘शिकविलेली बुद्धि’ हें प्रकृत आहे व ‘ टांगलेली शिदोरी ’ हें अप्रकृत आहे. ह्या दोहोंचा समान धर्म ‘ एका वेळेपुरतें उपयोगीं पडणें ’ हा आहे. हा धर्म ह्या म्हणीमध्यें अनुक्त आहे. ह्या म्हणीला दीपक अलंकाराला आवश्यक जीं अंगें त्यांपैकीं एक अंग उपस्थित नाहीं तरी त्या म्हणींत दीपक अलंकाराचा आत्मा आहे असें म्हणणें प्राप्त आहे.

आतां दुसरी एक म्हण आपण घेऊं ‘ सोयऱ्यांत साडू, हत्यारांत माडू, आणि भोजनांत लाडू” ह्या म्हणीमध्यें साडू, माडू आणि लाडू, अशा तीन वस्तु आहेत. ज्या विशिष्ट प्रसंगीं ह्या तीहींपैकीं एका वस्तूचें वर्णन करावयाचें असतें, त्या विशिष्ट प्रसंगीं ती वस्तु प्रकृत असते, आणि बाकीच्या दोन वस्तु अप्रकृत असतात, आणि ह्या तीन्हीं वस्तूंचा ‘ सोयीस्करपणा ’ हा सामान्य धर्म आहे. तो जरी म्हणींत अनुक्त असला तरी त्यांत दीपक अलंकाराचा आत्मा विद्यमान आहे यांत शंका नाहीं.

आतां आणखी एकच म्हण उदाहरणादाखल घेतों. ‘ चिंबचळें शेतचें आणि थोटें पांगुळ पोटचें, ’ ह्या म्हणींत विशिष्ट प्रसंगाप्रमाणें चिंबचळें प्रकृत असतील किंवा थोटें पांगूळ प्रकृत असेल. त्या दोन वस्तूंचा अत्याज्यपणा हा सामान्य धर्म अनुक्त आहे, तरीही ह्या म्हणींत दीपक अलंकार निगूढ रूपानें आहे. “खपेल त्याचें शेत, मारील त्याची तरवार,” “गातां गळा, शिंपतां मळा आणि लिहितां हातवळा, ” वगैरे शेंकडों म्हणींमध्यें दीपक अलंकार निगूढ रूपानें आहे हें सहज दिसून येण्याजोगें आहे.

म्हणींमध्यें दीपक अलंकार कोणच्या प्रकारें समाविष्ट झालेला असतो हें आम्हीं वाचकांना विशद करून दाखविलें. आतां म्हणींमध्यें इतर

अलंकारही कसे मनोहर रीतीनें सन्निविष्ट झालेले असतात हें आम्हीं उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखविणार आहों.

एकादी वस्तु स्वतःचा गुण टाकून जवळच्या दुसऱ्या वस्तूचा उज्वलतम गुण स्वीकारीत आहे असें वर्णन असतें, तेथें "तद्गुण" ह्या नांवाचा अलंकार होतो. ह्याचे उदाहरण

वृत्त अनुष्टुभ्.

मालतीसुम नाकाशीं घ्याया वास करीं धरी--।
ती, तों बंधूकभावा तें ओष्ठरागें तिच्या वरी ॥

"ती स्त्री मालतीचें फूल वास घ्यावयासाठीं नाकाशीं हातानें घेत होती तों तिच्या ओंठाच्या तांबड्या रंगानें तें फूल बंधूकाचें फूल झालें !"

मालतीचें फूल पांढरें असतें आणि बंधूकाचें फूल तांबडें असतें आणि आकारानें तीं दोन्हीं फुलें अगदीं सारखीं असतात; ही माहिती लक्ष्यांत घेऊन ह्या पद्याचा अर्थ करावयाचा आहे. त्या स्त्रीचे ओंठ तांबडे असल्याकारणानें त्यांची तांबडी छाया मालतीच्या फुलावर पडतांच तें फूल तांबडें दिसूं लागलें, म्हणून मालतीचें फूल असून तें बंधूकाचें फूल झालें. येथें मालतीच्या फुलानें आपला पांढरेपणा टाकून ओंठांच्या तांबडेपणाचा स्वीकार केला, असें वर्णन आहे, म्हणून येथें "तद्गुण" हा अलंकार झाला आहे. ह्या अलंकाराला जाब देणाऱ्या पुष्कळ म्हणी मराठी भाषेंत आढळतात.

"कुंभारणीच्या घरांत जातो तो किडा कुंभारीण होतो." ही म्हण मराठी भाषेंतील अत्यंत मूल्यवान् अशा म्हणींपैकीं एक आहे. ह्या म्हणींतील विधान मानसशास्त्रकोविदांनीं सप्रमाण ठरवून त्याला सिद्धांताचें रूप दिलें आहे. मानवी हृदयाच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान, आणि समाजांत उत्पन्न होणाऱ्या विविध पक्षांचें आदिकारण, ह्यांचें ह्या म्हणीमध्यें स्पष्टपणानें प्रतिबिंबन झालेलें आहे आणि पुनः तें मनोहर रीतीनें प्रतिबिंबन झालेलें आहे.

ज्या गोष्टींकडे सहृदयतेनें पाहावयाचें असते, त्या गोष्टींना गणिताचा किंवा शास्त्राचा निकष लावणें हा मूर्खपणा समजला जातो. हत्तीच्या गंडस्थळांत मोतीं असतात किंवा नसतात, सापाच्या डोक्यांत मणि असतो किंवा नसतो, राजहंस मोतीं खातात किंवा खात नाहींत, ह्या गोष्टीची विचि

किस्सा न करतां त्या गोष्टींच्या पायावर उभारलेलीं विधानें सहृदयतेनें पहावयाचीं असतात. त्याप्रमाणें कुंभारणीच्या घरांत जातो तो किडा कुंभारीण होतो किंवा होत नाहीं, हें आपण न पाहतां त्या समजुतीच्या आधारावर स्पष्ट करून सांगितलेला अनुभव सहृदयतेनें पाहिला पाहिजे. तशा दृष्टीनें ह्या म्हणींतील विधान पाहिलें असतां तें अति मूल्यवान आहे हें आपणांस कबूल करणें प्राप्त आहे. आम्ही हें जें विवरण करित आहों तें विषयान्तर नसून " कुंभारणीच्या घरांत जातो तो किडा कुंभारीण होतो, " ह्या म्हणीमध्यें ' तद्गुण ' हा अलंकार सन्निविष्ट झालेला आहे हें आम्हांला सिद्ध करावयाचें आहे.

ह्या म्हणीचें निरूपण समाप्त करावयाच्या अगोदर " मराठी भाषेचे वाक्प्रचार, म्हणी इ० " ह्या नांवाच्या आमच्या पुस्तकांतील एक उतारा येथें दिल्यानें ह्या म्हणीच्या समन्वयावर जास्त प्रकाश पडेल म्हणून तो उतारा येथें देतों. तो आमच्या वाचकांना कंटाळवाणा होणार नाहीं अशी उमेद आहे.

" कुंभारीण " ह्या नांवाचा एक किडा आहे. तिच्या घरांत कोणत्याही दुसऱ्या जातीचा किडा गेला तरी त्याचें रूपांतर होतें आणि तोही कुंभारीणच बनतो, अशी समजूत पूर्वीपासूनच चालत आलेली आहे. उलट मतांच्या मंडळीशीं मी सहवास करीन, त्यांचीं मतें मी खोडून टाकीन, माझीं मतें मी त्यांना स्वीकारावयास लावीन, अशी बढाई मारून जर कोणी मनुष्य उलट मतांच्या मंडळींत गेला, तर तो त्यांच्या आदरसत्कारानें, गोड भाषणानें, हळूं हळूं नरम पडत जातो, स्वताचीं मतें हळूं हळूं सोडून देऊं लागतो, प्रतिपक्ष्याचीं मतें त्याला खरींशीं वाटूं लागतात, आणि शेवटीं तो पूर्णपणें त्यांच्या पक्षांत सामील होतो.

जेव्हां एक वस्तु उत्कृष्ट गुणांनीं युक्त अशा दुसऱ्या एकाद्या वस्तूच्या सान्निध्याला असून सुद्धां तिच्या त्या उत्कृष्ट गुणाचें ग्रहण करीत नाहीं असें वर्णन असतें, तेव्हां "अतद्गुण" हा अलंकार होतो. याचें उदाहरण देतों.

आर्या

हंसा ! गंगेचें सित, कालिंदीचें असे असित तोय ।
उभयत्र संचरासि, परि तव धवलत्व न उणें अधिक होय ॥

" हे हंसा, गंगेचें पाणी पांढरें शुभ्र असतें, आणि यमुनेचें पाणी काळें असतें. तूं दोन्ही नद्यांत संचार करतोस; परंतु तुझा पांढरेपणा गंगेच्या पांढऱ्या पाण्यामुळें अधिक होत नाहीं, किंवा यमुनेच्या काळ्या पाण्यामुळें कमीही होत नाहीं. तुझा पांढरेपणा कमी अधिक न होतां आहे तसाच राहतो ! "

येथें हंसानें गंगेचा किंवा यमुनेचा गुण घेतला नाहीं असें वर्णन आहे म्हणून येथें " अतद्गुण " हा अलंकर झाला आहे.

वरील विवेचनावरून वाचकांना अतद्गुण ह्या अलंकाराचे स्वरूप कसें असतें हें कळेल. ह्या अतद्गुण अलंकाराचे मासले आपणास अनेक म्हणी-मध्यें दृष्टीस पडतात.

" कडू कारलें तुपांत तळलें, साखरेंत घोळलें तरी कडू तें कडूच, " ही म्हण आपण घेऊं. तुपाच्या योगानें कारल्याचे ठायीं घ्राणेंद्रियाला सुख देणारा खमंगपणा येत नाहीं, किंवा साखरेच्या योगानें त्याचे ठायीं रसनें-द्रियाला सुख देणारा गोडपणाही येत नाहीं, असें विधान ह्या म्हणीमध्यें केलेलें आहे. तुपाच्या किंवा साखरेच्या सान्निध्यांत असतां देखील कार-ल्याला त्यांचे गुण प्राप्त होत नाहींत असें वर्णन असल्यामुळें ह्या म्हणींत अतद्गुण अलंकार झाला आहे. ह्या म्हणीचा व्यवहारांत कोणच्या प्रसंगीं उपयोग केला जातो, हें वाचकांना सांगण्याची आवश्यकता नाहीं.

अतद्गुण अलंकाराचें आणखीं एक उदाहरण घेऊं. " कुत्र्याचें शेपूट नळींत घातलें तरी वाकडेंच ! " नळी सरळ असते आणि नळीमध्यें कुत्र्याचे शेंपूट,—जें स्वभावतः अर्धवर्तुळाकार असतें तें,—खुपसून ठेविलें तरी तें सरळ होत नाहीं. नळींतून तें शेपूट बाहेर निघाल्यावर पुन्हां पाहिल्या-सारखें अर्धवर्तुळाकार होतें.

येथें सरळ नळीच्या साहचर्यांत कुत्र्याचें शेंपूट राहिलें, तरी तें नळीचा सरळपणा स्वीकारींत नाहीं, असें विधान केलेलें आहे. सरळपणाचा अस्वीकार येथें विवक्षित असल्याकारणानें ह्या म्हणीमध्यें अतद्गुण अलंकार झाला आहे.

म्हणींमध्यें तद्गुण हा अलंकार कसा सन्निविष्ट असतो ह्याचीं कांहीं

उदाहरणें आम्ही येथपर्यंत दिलीं आहेत. तसेंच अतद्गुण हा अलंकारही कांहीं म्हणींमध्यें कसा सन्निविष्ट असतो ह्याचींही कांहीं उदाहरणें वर सादर केलीं आहेत. कांहीं म्हणी अशा आहेत कीं त्यांत तद्गुण आणि अतद्गुण हे दोन्हीही अलंकार मोठ्या मजेदार रीतीनें समाविष्ट झालेले आढळतात. अशा म्हणींचीं कांहीं उदाहरणें आतां देतों.

" ढवळ्या शेजारीं पोंवळा बांधला, वाण नाहीं पण गुण लागला, " ह्या म्हणीचा उपयोग आपण शेकडों प्रसंगीं करतों. तिचा अर्थ असा. पांढऱ्या बैलाच्या जवळ पिवळा बैल बांधला, परंतु ढवळ्याचा पांढरा वर्ण पिवळ्या बैलाला न मिळतां, ढवळ्याचा गुण (खोडकरपणा हा) मात्र पिवळ्या बैलांत आला. ह्या म्हणींमध्यें ढवळ्याच्या वर्णाचा पोंवळ्याकडून अस्वीकार आणि गुणाचा स्वीकार वर्णिलेला आहे. ह्या एका म्हणीचे ठायीं तद्गुण आणि अतद्गुण हे दोन्हीं अलंकार एकसमयावच्छेदें करून संनिविष्ट झालेले आहेत.

दुसरी एक ह्याच जातीची म्हण आपण घेऊं. " घरासारखा पाहुणा होतो, पाहुण्यासारखें घर होत नाहीं." परक्या ठिकाणीं मनुष्य गेला असतां त्याला त्या ठिकाणच्या चालीरीति, पोशाख, भाषा, वगैरेंचा स्वीकार करावा लागतो. त्या ठिकाणचे लोक पाहुण्याच्या चालीरीति, पोशाख, भाषा, वगैरेंचा स्वीकार करीत नाहींत. ह्या म्हणीमध्यें एक मूल्यवान् समाजतत्त्व गोंविलेलें आहे. एका एका सुट्या व्यक्तीवर बहुजनसमाजाचें दडपण कसें पडतें, हें अल्प शब्दांत सांगितलें आहे. ह्या एका म्हणीमध्यें तद्गुण अलंकार आणि अतद्गुण अलंकार हे दोन्ही मोठ्या मजेदार रीतीनें आलेले असून शिवाय त्या म्हणीमध्यें एक मूल्यवान् तत्त्व सांठविलेलें आहे.

आणखी एक म्हण आपण घेऊं. " फुलाचा वास मातींत, आणि मातीचा वास मातींत, " या म्हणीचा अर्थ असा कीं फुलाच्या संसर्गानें फुलाचा वास मातीला लागतो, पण मातीचा वास फुलांत प्रविष्ट होऊं शकत नाहीं. तो मातींतल्या मातींतच राहतो. ह्या म्हणीचा उपयोग व्यवहारांत कसा होतो, हें वाचकांना ठाऊकच आहे. फुलाच्या गुणाचा मातीकडून स्वीकार ह्या भागांत तद्गुण अलंकार आहे, आणि मातीच्या गुणाचा फुलाकडून अस्वीकार ह्या भागांत अतद्गुण अलंकार आहे.

जेव्हां कोणी वक्ता एखादी सर्वविश्रुत अशी गोष्ट मुद्दाम सांगतो, तेव्हां त्याचा उद्देश असा असतो कीं, तीच गोष्ट घ्यावयाची आणि तिच्यासारख्या अन्य गोष्टी त्याज्य करावयाच्या. मनुष्याला पैशानें, अधिकारानें, उच्च कुळीं जन्म आल्यानें, किंवा दुसऱ्या कांहीं गोष्टींमुळें श्रेष्ठत्व येतें; परंतु मनुष्याला खरें श्रेष्ठत्व प्राप्त होतें तें विद्येनें प्राप्त होतें. पैसा, अधिकार, उच्च जन्म, वगैरेनें प्राप्त झालेलें श्रेष्ठत्व हें खरें नव्हे, असें सांगण्याचा जेव्हां वक्त्याचा उद्देश असतो, तेव्हां त्याचें तें विधान परिसंख्यात्मक असतें. त्याच्या विधानांत "परिसंख्या" हा अलंकार झालेला असतो. अमुक एका वस्तूचाच स्वीकार करावयाचा, इतर वस्तूंचा स्वीकार करावयाचा नाहीं, असें श्रोत्यांना सांगण्याच्या उद्देशानें जेव्हां कोणी वक्ता कांहीं विधान करतो, तेव्हां "परिसंख्या" हा अलंकार होतो. ह्या अलंकाराचे अनेक प्रकार आहेत, त्यांपैकीं एका प्रकाराचें उदाहरण देतों.

वृत्त उपजाति.

श्रुतेंच कीं श्रोत्र, न कुण्डलानें,
दानेंच कीं पाणि, न कंकणानें—।
साजे, तसा देहहि हा न आनें,
परोकारेंचि, न चंदनानें ॥ १ ॥

वामनपंडित.

वेदांनीं कान शोभतात, कुण्डलांनीं शोभत नाहींत. दान केल्यानें हात शोभतो, सलकडीं घालून शोभत नाहीं. परोकारानें देह शोभतो, चंदनाच्या उटीनें शोभत नाहीं. येथें कुंडल, कंकण आणि चंदन, हे शोभादायक पदार्थ त्याज्य होत; आणि श्रुत, दान, आणि परोपकार, हेच शोभादायक पदार्थ ह्या नात्यानें ग्राह्य होत, असें विधान केलेलें आहे. हें "परिसंख्या" अलंकाराचें एक उदाहरण.

आतां दुसरें एक उदाहरण घेऊं.

वृत्त चामर.

आर्यसंस्कृती जपेल तो मनुष्य पावन,
जो करूं बघे समाजभंग तो नराशन ।
स्वर्ग तो लहे स्वदेश जो स्मरेल मानव,
विस्मरेल जो स्वदेश तो लहेल रौरव ॥

जो कोणी माणूस आर्यसंस्कृति उत्कृष्ट समजून अनुसरेल तोच पवित्र समजावयाचा, (दुसरा कोणी माणूस कितीही पवित्र दिसला तरी तो पवित्र समजला जाण्याला लायक नाहीं), इत्यादि. ह्या उदाहरणांत त्याज्य वस्तूंचा निर्देश केलेला नाहीं. पहिल्या उदाहरणांत तसा केलेला आहे; हा ह्या दोन उदाहरणांतील फरक.ह्या दोन्हीं उदाहरणांत "परिसंख्या" हा अलंकार झालेला आहे. हा अलंकार अनेक म्हणींमध्यें दृष्टीस पडतो. "सोय पाहील तो सोयरा," ह्या ह्मणींत "परिसंख्या" हा अलंकार संनिविष्ट झालेला आहे. वधू-पक्षाचे आणि वरपक्षाचे लोक हे एकमेकांचे सोयरे. ते एकमेकांच्या सोयी गैरसोयी पाहून वागले, तर ते सोयरे प्रेमाला पात्र होऊं शकतात; इतर प्रकारच्या सोयऱ्यांचा त्रास वाटतो. हें विधान चटकदार रीतीनें वरील ह्मणींत केलेलें आहे. ह्या ह्मणींत "परिसंख्या" हा अलंकार सन्निविष्ट झालेला आहे. वर परिसंख्येचीं जीं दोन पद्यें दिलीं आहेत, त्यांपैकीं दुसऱ्या पद्याच्या प्रकारांत ही म्हण पडते; कारण, ह्या ह्मणींत सोयरा कोणाला म्हणावें येवढेंच सांगितलेलें आहे, सोयरा कोणाला म्हणूं नये हें सांगितलेलें नाहीं.

आतां परिसंख्यालंकारात्मक आणखी एकच म्हण घेतों. "ज्याच्या हातीं ससा तो पारधी," ह्या सुंदर ह्मणीमध्यें शुष्क बढाया मारणाऱ्या लोकांना सडेतोड उत्तर दिलेलें आहे. मी अमूक खुबीनें सशाची जाळी हुडकून काढली, त्याला अमुक युक्तीनें लपावयाच्या जागेंतून हुसकून दिलें, अमुक रीतीनें त्याचा पाठलाग केला, त्यानें मला फसविण्यासाठीं अमुक युक्त्या केल्या, त्याच्या युक्त्या मी अमुक रीतीनें निष्फळ केल्या, इत्यादि वल्गना करून जर कोणी माणूस आपली फुशारकी मारूं लागला, तर त्याच्या भाषणाला कोणी कवडीचीही किंमत देत नाहीं. त्यानें ससा दाखविला तरच त्याची स्तुति केली जाते. "ज्याच्या हातीं ससा तो पारधी." ससेवाल्या पारध्यानें जरी आपली प्रौढी गायिली नाहीं, तरी लोक त्याला पारधीपणाचें श्रेय देतातच.

" ज्याच्या हातांत ससा तो पारधी " ह्या ह्मणीचा व्यवहारामध्यें अनेक प्रसंगीं उपयोग करण्यांत येतो. 'मी अमुक सभेंत गेलों, डेमॉस्थनीस आणि सिसिरो यांच्याप्रमाणें वक्तृत्व केलें,प्रतिपक्ष्याशीं अमुक तऱ्हेचा कोटिक्रम करून त्याला निरुत्तर केलें, आणि त्याचा पराभव करून माझें मत त्याला कबूल करावयाला भाग पाडलें, अशी कोणी पंडितम्रुव बढाई मारूं लागला, तर लोक

त्याला म्हणतील, " तुमचें व्याख्यान ऐकून तुमच्या प्रतिपक्ष्यानें आपली वर्तनसरणी जर सोडली नाहीं, तर तुमची बढाई कुचकामाची होय! ज्याच्या हातांत ससा तो पारधी ! " म्हणजे आपल्या पराक्रमाचें फळ लोकांच्या निदर्शनास आणून देईल तोच पराक्रमी म्हणावयाचा !

" जेथें भरे दरा तोच गांव बरा, " "हाकेला ओ देईल तो शेजारी," " गरजेला येईल तो मित्र," ह्याही ह्मणींचे ठायीं परिसंख्या अलंकार आहे, हें येथवर केलेल्या विवरणावरून वाचकांना कळून येण्याजोगें आहे.

ज्या वस्तूविषयीं आपणांस कांहीं बोलावयाचें आहे, तिला " प्रस्तुत " असें म्हणतात; आणि जी वस्तु आपल्या बोलण्याचा विषय नव्हे, तिला " अप्रस्तुत " असें म्हणतात.

ज्या वस्तूसंबंधानें आपणांस कांहीं बोलावयाचें आहे, तिच्या संबंधानें न बोलतां आपण कधीं कधीं तिच्या व्यतिरिक्त दुसऱ्याच एका वस्तूसंबंधानें बोलतों, आणि अशा रीतीनें आपला आशय आपण श्रोत्याला जाणवितों; अशा प्रकारच्या भाषणसरणीला साहित्यशास्त्रकारांनीं " अप्रस्तुतप्रशंसा " असें नांव दिलेलें आहे. अप्रस्तुत अशा वस्तूची प्रशंसा म्हणजे कथन ह्या भाषणसरणींत असतें म्हणून 'अप्रस्तुतप्रशंसा' हें नांव अन्वर्थकच आहे.

अशा प्रकारची भाषणसरणी अवलंबिण्याचे अनेक हेतु असतात. अप्रस्तुताविषयीं बोलून अप्रत्यक्ष रीतीनें प्रस्तुताविषयीं आपले विचार सांगितल्यानें एक तर आपल्या भाषणाला विशेष चटकदारी प्राप्त होते; दुसरें असें कीं, ह्या प्रकारच्या सरणीनें आपले विचार जोरदार रीतीनें श्रोत्यांच्या मनावर ठसतात; ह्याचें कारण असें कीं, आपणास जें कांहीं सांगावयाचें असतें तें आणि त्याच्या समर्थनासाठीं द्यावयाचें जें प्रमाण तें, हीं दोन्हीं एकत्रच असल्याकारणानें आपल्या भाषणांत दोन्हीं प्रकारचें सामर्थ्य एकवटलेलें असतें; तिसरें असें कीं, अशा प्रकारच्या भाषणसरणीनें एकाद्या मनुष्याची निंदा किंवा स्तुति मोठ्या खुबीनें करतां येऊन प्रतिपक्षी आपणांवर तुटून पडण्याचा संभव कमी असतो. तसेंच पुष्कळ शब्द बोलण्याचे कष्ट आपणास ह्या प्रकारच्या भाषणसरणीनें बऱ्याच अंशांनीं वाचवितां येतात. ह्या आणि दुसऱ्या अशाच कारणांमुळें अप्रस्तुतप्रशंसेनें मानवी व्यवहारांमध्यें फार मोठें स्थान

मिळविलेलें आहे. एरवींच्या सामान्य संभाषणांत, गद्य आणि पद्य वाङ्मयांत, म्हणींत, वगैरे ह्या अप्रस्तुतप्रशंसेचें फार महत्त्व आहे.

अप्रस्तुतप्रशंसेला मराठींत ‘ अन्योक्ति ’ असें म्हणतात. हें नांव कै. कृष्णशास्त्री चिपळूणकर ह्यांनीं प्रथम रूढ केलें.

अप्रस्तुतप्रशंसेच्या स्वरूपाचें दिग्दर्शन करावयासाठीं आम्ही त्याच महापंडिताचा एक श्लोक येथें देतों.

वृत्त वसंततिलका.

येथें समस्त बहिरे वसतात लोक,
कां भाषणें मधुर तूं करिसी अनेक ? ।
हे मूर्ख; यांस किमपीहि नसे विवेक,
वर्णावरून तुज ते गणितील काक ॥

या श्लोकावर त्याच महापंडिताचें पुढीलप्रमाणें व्याख्यान आहे:—

“ या श्लोकांत बाहेरून कोकिळाशीं संभाषण केलें आहे, परंतु कवीच्या मनांतून तो अर्थ गुणी मनुष्यांचे गुण न ओळखणारे व गुणी आणि मूर्ख यांस बाहेरील चिन्हांवरून सारखे समजणारे जे अरसिक मूर्ख लोक, त्यांस लागू आहे. ”

अप्रस्तुतप्रशंसेचें आणखी एक उदाहरण देतों.

वृत्त रथोद्धता.

थोर मीच जगीं ही सरित्पते,
गर्जना तुज मुळीं न शोभते ।
पांथ तीरिंहि तुझ्या असोनियां,
कूप शोधि शमना तृषेचिया ॥

“ ह्या जगामध्यें विस्तारानें मीच मोठा अशी, हे समुद्रा, तुझी गर्जना करून मारलेली बढाई व्यर्थ होय ! कारण, तुझ्या कांठावर उभा असलेला तान्हेला प्रवासी तहान शमविण्यासाठीं विहिरीचा शोध करतो ! ”

मोठ्या माणसाचा उपयोग जर कोणाला होत नसला तर त्याचा मोठेपणा व्यर्थ होय, असें ह्या पद्यांत सांगितलें आहे. प्रस्तुत असलेल्या एक मोठ्या माणसाची निंदा ह्या श्लोकांत मोठ्या चटकदार रीतीनें केली आहे.

वर दिलेल्या दोन पद्यांवरून अप्रस्तुतप्रशंसेचें स्वरूप कसें असतें हें वाचकांना कळून येईल. आतां हा अलंकार म्हणींचे ठायीं कसा संनिविष्ट झालेला असतो हें सांगतों; आपण म्हणींचा संग्रह शोधूं लागलों असतां आपणांला शेंकडो म्हणींत हा अलंकार अनेक रूपांनीं आलेला पाहून आश्चर्य वाटतें.

" पळसाला पानें तीन, " किंवा "तेरड्याचा रंग तीन दिवस," ह्या ह्मणी योजणाऱ्या मनुष्याच्या मनांत श्रोत्याला वनस्पतिशास्त्राचा पाठ द्यावयाचा उद्देश नसतो. " घरोघर मातीच्या चुली, " ही ह्मण योजणारा मनुष्य सूपशास्त्रावर पाठ द्यावयाला उद्युक्त झालेला नसतो. " ह्मशीची शिंगें ह्मशीला जड नाहींत, " ही ह्मण योजणारा मनुष्य ह्मशीची सहनशिलता किती असते हें सांगावयाला निघालेला नसतो; तसेंच " सरड्याची धाव कुंपणापर्यंत, " ही ह्मण योजणाऱ्या मनुष्याच्या मनांत सरड्याचा धावण्याचा पल्ला किती मोठा असतो हें सांगण्याची इच्छा असतें असें नव्हे.

वर घेतलेल्या म्हणींत पळसाचें झाड, तेरड्याचें झुडूप, चुलीचें घटक द्रव्य, म्हशींच्या शिंगांचा जडपणा, किंवा सरडा, ह्यांच्याविषयीं कांहीं माहिती सांगावयाचा वक्त्याचा उद्देश नसतो. ह्या सर्व वस्तु त्या प्रसंगाला अप्रस्तुत होत. प्रस्तुत ज्या वस्तु त्या वेगळ्याच असतात. अमुक ठिकाणीं गेल्यानें आपला लाभ होईल अशी आशा करणाऱ्या मूर्ख मनुष्याची कानउघाडणी "पळसाला पानें तीन," ह्या म्हणीनें केली जाते. ज्याच्या अंगीं स्वतःचें कांहीं सामर्थ्य किंवा गुण नाहीं त्यानें कितीही आव आणून भपका केला तरी तो भपका टिकाऊ नसतो असें त्या प्रस्तुत माणसाला सांगून त्याच्या डोळ्यांत अंजन घालण्याचें काम " तेरड्याचा रंग तीन दिवस " ह्या म्हणीनें केलें जातें. आपला मुलगा दुर्दैवानें आळशी आणि निरुद्योगी निघाला असला तरी आईबाप त्याला घरांतून हाकलून देत नाहींत, हें सांगावयाचें असतां " म्हशीचीं शिंगें म्हशीला जड नाहींत, " ही म्हण योजली जाते. असमर्थ माणसानें समर्थांची बरोबरी करण्याचे कितीही प्रयत्न केले, तरी त्याला कांहीं विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे जातां येत नाहीं, हा सिद्धांत प्रसंगानें सांगण्याचें कारण पडलें असतां " सरड्याची धाव कुंपणापर्यंत, "ह्या म्हणीनें तो अर्थ दर्शविला जातो.

" वाळूंत मुतून फेस ना पाणी, " " कोणाच्या म्हशी आणि कोणाला उठाबशी !", " आधणांतले रडतात आणि सुपांतले हसतात, " "एकादशीच्या घरीं शिवरात्र," वगैरे शेंकडो म्हणींमध्यें अप्रस्तुतप्रशंसा हा अलंकार मुख्यत्वानें किंवा गौणत्वानें म्हणजे दुसऱ्या एकाद्या अलंकाराला अंगभूत ह्या नात्यानें संनिविष्ट झालेला आपणांला आढळून येतो.

ज्या वस्तूचें आपणांस वर्णन करावयाचें असतें, तिला वर्ण्य म्हणतात, आणि ही वर्ण्य वस्तु खेरीज करून ज्या इतर वस्तु, त्या अर्थात् अवर्ण्य होत. अशा एकाद्या अवर्ण्य वस्तूशीं वर्ण्य वस्तूचें जर उत्कट साम्य असलें, आणि त्या दोन वस्तूंत जर अभेद किंवा एकत्व वर्णिलेलें असलें, तर तेथें रूपक अलंकार होतो; अर्थात् रूपक अलंकारामध्यें वर्ण्य आणि अवर्ण्य अशा दोन्ही वस्तूंचा निर्देश केलेला असतो. अमुक एक वस्तु (वर्ण्य) ही तमुक एक वस्तु (अवर्ण्य) आहे, असें गृहीत घेऊन केलेलें जें विधान, त्यांत रूपक अलंकार झालेला असतो. मात्र, ह्या विधानांत दोन्ही वस्तूंचा, (म्हणजे वर्ण्य आणि अवर्ण्य अशा दोन्ही वस्तूंचा), निर्देश केलेला असला पाहिजे; आणि जर दोन्ही वस्तूंचा निर्देश केलेला नसला, (म्हणजे फक्त अवर्ण्य वस्तूचाच निर्देश केलेला असला), तर तेथें अतिशयोक्ति हा अलंकार होतो. रूपक आणि अतिशयोक्ति हे अलंकार जसे आपल्या एऱ्हव्हींच्या संभाषणांत, गद्य वाङ्मयांत आणि पद्य वाङ्मयांत, वैपुल्यानें येतात, तसेच ते ह्मणींमध्येंही येतात.

हे अलंकार एऱ्हव्हींच्या संभाषणांत येतात, त्यांचीं उदाहरणें देतों; मग वाङ्मयांतील उदाहरणें देतों; नंतर ह्मणींत हे अलंकार कसे येतात तें उदाहरणें देऊन सांगतों.

तो गोविंदराव मला अपशब्द बोलला, तेणेंकरून माझा क्रोधाग्नि भडकला, मी भवसागरांत गटांगळ्या खात आहें, इत्यादि वाक्यांत क्रोधाग्नि, भवसागर, वगैरे रूपकें संभाषणांत विपुल येतात.

" आले मोठे उंटावरचे शाहाणे आम्हांला शिकवायला ! " येथें ज्या माणसाचा तिरस्कार करावयाचा आहे, त्याच्या नांवाचा निर्देश केलेला नाहीं. येथें अतिशयोक्ति झाली आहे. "तो बारा पिंपळावरचा मुंजा मला या वेळीं

कोठें भेटणार ? " या वाक्यांत देखील अतिशयोक्ति हा अलंकार झाला आहे. (तो आणि मुंजा एकच व्यक्ति समजून आम्ही चालत आहों).

आग्यावेताळ, जमदग्नि, जांबुवंत, वगैरे शब्द माणसासंबंधानें योजले जातात तेव्हां त्यांच्यांत अतिशयोक्ति हा अलंकार आलेला असतो.

आतां वाङ्मयांत रूपक आणि अतिशयोक्ति हे अलंकार कसे येतात तें उदाहरणांनीं दाखवितों.

पुढील मोरोपंती आर्या पहाः—

ऐसें पार्थ वदे तों भिउनि कटकबागुलास पोर पळे ।
शत्रुप्रतापदावज्वालांनीं तो कुरंग होरपळे ॥

ह्या आर्येंत "कटक म्हणजे सैन्य हाच कोणी बागुलबोवा" हें एक रूपक आहे. "शत्रुप्रताप हाच कोणी दाव म्हणजे वणवा", हें दुसरें रूपक आहे. "तो म्हणजे उत्तर हाच कोणी कुरंग ह्मणजे हरिण", हें तिसरें रूपक आहे. या आर्येंत वर्ण्य आणि अवर्ण्य अशा दोन्ही प्रकारच्या वस्तूंचा निर्देश झालेला आहे. कटक आणि बागुल ही एक जोडी, प्रताप आणि दाव ही दुसरी जोडी, तो (उत्तर) आणि कुरंग ही तिसरी जोडी.

तसेंच क्रोधाग्नि ह्या सामासिक शब्दांत क्रोध आणि अग्नि ह्या दोन्ही वस्तु उक्त आहेत. भवसागर ह्यांत भव आणि सागर ह्या दोन्ही वस्तु उक्त आहेत. हीं सर्व रूपकांचीं उदाहरणें होत. परंतु जेथें दोन्ही वस्तु उक्त नसतात, म्हणजे फक्त अवर्ण्य वस्तूच उक्त असते, तेथें अतिशयोक्ति हा अलंकार होतो.

पुढील मोरोपंती आर्या पहाः—

हरिच्या पुन्हा पुन्हा कां काड्या नाकांत घालिशी शशका ? ।
यश काय पक्षिपतिचें येइल हे चार करुनि तुज मशका ? ॥

" ह्या सिंहाच्या (धर्मराजाच्या) नाकांत वारंवार, अरे सशा (दुर्योधना), तूं काड्या कां घालीत आहेस ? असल्या मूर्खपणाच्या चेष्टा करून तुला चिलटाला गरुडाचा मोठेपणा प्राप्त होईल काय ? "

येथें धर्मराज, दुर्योधन, हे शब्द उक्त नाहींत. सिंह, गरुड, शशक, चिलट, हे शब्द त्यांच्या ऐवजीं योजले आहेत. हीं सर्व अतिशयोक्तीचीं उदाहरणें होत.

एन्हर्व्हींच्या संभाषणांत आणि वाङ्मयांत रूपकाची आणि अतिशयोक्तीचीं उदाहरणें कशीं येतात, हें आम्हीं दाखविलें. आतां म्हणींचे ठायीं रूपक आणि अतिशयोक्ति हे अलंकार कसे येतात तें सांगतों.

प्रथम म्हणींत रूपकाचीं उदाहरणें कशीं सांपडतात हें पाहूं.

" भीड भिकेची बहीण " ह्या म्हणीचा अर्थ असा कीं, भलत्याच ठिकाणीं आपण भिडस्तपणा दाखविल्यास आपलें नुकसान होतें. संकोचानें जर आपण मूकवृत्ति स्वीकारली, आपल्या सोयी गैरसोयी वगैरे स्पष्टपणें बोलून दाखविल्या नाहींत, तर परिणामीं आपणाला त्रास सोसावा लागतो.

" भीड भिकेची बहीण, " ह्या म्हणीमध्यें भीड ही स्त्री, ही एक वस्तु असून तिच्यावर " भिकेच्या बहीणी " चा आरोप करण्यांत आलेला आहे. क्रोध आणि अग्नि ह्या दोन वस्तूंत उत्कट साम्य असल्याकारणानें क्रोधावर जसा अग्नित्वाचा आरोप केलेला आहे, तसा भीड ह्या स्त्रीचें भिकेच्या बहिणीशीं उत्कट साम्य असल्याकारणानें पहिल्या स्त्री वस्तूवर दुसऱ्या स्त्री वस्तूचा आरोप केलेला आहे. भावाभावांत साम्य असतें तसें बहिणीबहिणींत साम्य असतें, ही गोष्ट जगत्प्रसिद्ध आहे. ह्या वस्तुस्थितीवर आधारलेल्या ह्या मनोहर म्हणींत एक सुंदर रूपक आपणास पाहावयाला सांपडतें.

" उंबरघाट ओलांडून जाणें कठिण असतें, " ही म्हण वारंवार योजली जाते. प्रवासाला निघतांना किंवा अन्य कांहीं कारणांनीं घर सोडण्याचा प्रसंग आला असतां आपली भारी तारांबळ होते, हें आपणाला सांगावयाचें असतें. घरांतील सामानासुमानाची आवराआवर करणें, किंवा झाकपाक करणें, किंवा चालू व्यवहारांतील कामाची व्यवस्था लावणें, लोकांना निरोप सांगणें, लोकांचें निरोप घेणें, वगैरे अनेक कारणांनीं आपलें मन व्यग्र होतें, आपण भांबावून जातों, आणि तेणेंकरून घरांतून बाहेर पडणें हें अति दुष्कर काम होतें; तेव्हां "उंबरघाट ओलांडून जाणें कठिण असतें", ही उद्गाररूपी म्हण आपण योजतों. घराचा उंबरा हाच कोणी घाट (डोंगराचा) ओलांडून जाणें हें महाकर्म कठिण होय, असा ह्या म्हणीचा अर्थ आहे. येथें उंबरा आणि घाट हे दोन्ही शब्द उक्त आहेत म्हणून ह्या म्हणींत रूपक हा अलंकार सन्निविष्ट झालेला आहे.

शास्त्रामध्यें ग्राम्यपणाला स्थान नाहीं असें आम्हीं वाचकांना बजावून आणखी एक म्हण उदाहरणादाखल येथें घेतों. "हागाचा भाऊ पाद," ही म्हण भारी जोरदार रीतीनें विशिष्ट प्रसंगीं आपल्या मुद्याचें समर्थन करूं शकते. जेव्हां दोन वस्तूंपैकीं एकही वस्तु घेण्याजोगी नसते, म्हणून त्या दोन्हीं त्याज्य असतात, तेव्हां ह्या म्हणीचा उपयोग केला जातो. ह्या म्हणीमध्यें देखील रूपक हा अलंकार आहे.

आतां म्हणीमध्यें अतिशयोक्ति हा अलंकार कसा असतो हें आपण पाहूं.

" कुडा कान, ठेवीं ध्यान, " ह्या म्हणीमध्यें " कूड " हा शब्द आजूबाजूचीं जीं माणसें त्यांच्यासंबंधानें योजला आहे. ह्या माणसांचा वाचक शब्द त्या म्हणींत नाहीं. म्हणून येथें अतिशयोक्ति झाली आहे.

" फजीतीच्या पायीं घुंगरूं, " " भांडणाचें तोंड काळें, " " गर्वाचें घर खालीं, " वगैरे अनेक म्हणींमध्यें अतिशयोक्ति सन्निविष्ट झालेली आहे, असें आपणांला दिसून येईल.

जेव्हां दोन भिन्न भिन्न वस्तूंमध्यें कांहीं आल्हादजनक सादृश्य वर्णिलेलें असतें, किंवा कांहीं सादृश्य आल्हादजनक रीतीनें वर्णिलेलें असतें, तेव्हां उपमा हा अलंकार होतो.

उपमेचें ठराविक उदाहरण ' चंद्राप्रमाणें तें मुख आहे ' हें साहित्यशास्त्रांत वारंवार येतें. ' दहांत मरण लग्नासमान, ' ह्या म्हणींत उपमा हा अलंकार आहे. लग्नाचा समारंभ जसा आनंददायक असतो, तसें पुष्कळ लोकांबरोबर आलेलें मरण आनंददायक असतें. येथें 'मरण' ह्या शब्दाचा अर्थ कोणतेंही संकट किंवा अडचणीचा प्रसंग असा घ्यावयाचा हें आम्ही न सांगतां वाचकांना समजेलच.

वाक्यांत एका शब्दाचे दोन अर्थ घेऊन त्या वाक्याचा अर्थ विवक्षित असल्यास त्या शब्दावर श्लेष असतो. ज्या शब्दाचे दोन अर्थ विवक्षित असतात, तो शब्द ' श्लिष्ट ' आहे असें म्हणतात. श्लेषाचे दोन प्रकार आहेत, शब्दश्लेष आणि अर्थश्लेष. श्लिष्ट शब्दाचे जागीं पर्याय शब्द योजल्यानें श्लेषाला क्षति होत असेल तर तो 'शब्दश्लेष' आणि क्षति होत नसेल तर तो ' अर्थश्लेष. '

शब्दश्लेषाचें जें विनोदी वाक्य व्यवहारांत योजलें जातें, तें हें. कोणी बाहेरचा माणूस आपणाला भेटावयाला आला असतां तो जर जमिनीवरच बसूं लागला असला, तर यजमान त्याला म्हणतो, " जमिनीवर कां बसतां? तो घ्या पाट. " तेव्हां तो बाहेरचा आलेला माणूस संकोचवृत्तीनें म्हणतो, "अहो, पाट कशाला पाहिजे ? जमीनच सपाट आहे." या वाक्यांत 'सपाट' ह्या शब्दावर श्लेष आहे. 'सपाट' ह्या शब्दाचा एक अर्थ "पाटानें युक्त" म्हणजे जिच्या वर पाट मांडला आहे अशी. दुसरा अर्थ साफ, सारखी किंवा समरेख. वक्त्याचा अर्थ जमिनीवर पाट मांडलेलाच आहे, तर आतां आणखी पाट कशाला ?

ह्या उदाहरणांत "सपाट" या शब्दांत श्लेष आहे, आणि तो श्लेष शब्दनिष्ठ आहे, म्हणजे त्या शब्दाबद्दल दुसरा कोणताही शब्द योजला तरी त्या वाक्याच्या चारुतेचा भंग होईल.

आतां म्हणींमध्यें देखील श्लेषालंकाराचीं उदाहरणें अढळतात. " काळ येईल पण वेळ यावी लागते, " ह्या ह्मणींत ' काळ ' ह्या शब्दावर श्लेष आहे. ' काळ ' याचा एक अर्थ यमराज आणि दुसरा अर्थ वेळ म्हणजे समय.

कोणी माणूस अत्यवस्थ आजारी असून त्यांतून तो बचावला आणि बरें होण्याच्या पंथाला लागला, ह्मणजे वरील म्हण योजतात. ती योजणाऱ्याचा आशय हा असतो कीं, तो आजारी माणूस यमराजाच्या तावडींत सांपडलाच होता; परंतु त्याची मरणाची वेळ आली नव्हती म्हणून तो निभावला, ह्मणजे तो अगदीं मरतां मरतां वांचला. या ह्मणींत ' काळ ' ह्या शब्दाच्या ऐवजीं ' यमराज ' हा शब्द योजल्यास श्लेष नष्ट होऊन त्या ह्मणींतील विरोधमूलक चारुतेला क्षति होईल.

ही म्हण प्रसंग असेल त्याच्या अनुरोधानें भिन्न भिन्न रूपांत योजिली जाते; परंतु ती कोणत्याही रूपांत योजिलेली असली तरी, वक्त्याचा आशय एकच असतो, आणि ' काळ ' आणि. ' वेळ ' हे शब्द तींत असावेच लागतात.

जेव्हां एक वस्तु दुसऱ्या एका वस्तूचें कारण असते, ही दुसरी वस्तु तिसऱ्या एका वस्तूचें कारण असते, ही तिसरी वस्तु चवथ्या एका वस्तूचें

कारण असते, अशा रीतीनें कारणकार्यांची एक परंपरा केलेली असते, तेथें कारणमाला किंवा हेतुमाला हा अलंकार होतो.

श्रीमद्भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील श्लोक ६२ आणि ६३ ह्यांचे ठायीं कारणमालेचें एक सुंदर उदाहरण आहे. त्यांचें कै० लोकमान्यांनीं केलेलें भाषान्तर आम्हीं येथें उद्धृत करतों:—

" विषयांचें चिंतन करणाऱ्या पुरुषाचा सदर विषयांचे ठिकाणीं संग म्हणजे सलगी वाढत जाते. ह्या संगापासून पुढें काम म्हणजे सदर विषय आपल्याला पाहिजेत ही वासना उत्पन्न होते, आणि (हा काम तृप्त होण्याला आडथळा आला म्हणजे) त्या कामापासूनच क्रोधाचा उद्भव होतो. क्रोधापासून संमोह म्हणजे अविवेक होतो. संमोहापासून स्मृतिभ्रम, स्मृतिभ्रमापासून बुद्धिनाश, आणि बुद्धिनाशापासून (पुरुषाचा) सर्वस्वी घात होतो."

येथें विषयांचें चिंतन, संग, काम, क्रोध, संमोह, स्मृतिभ्रम, बुद्धिनाश, आणि सर्वस्वी घात, अशी आठ वस्तूंची एक मालिका आहे; आणि प्रत्येक मागील वस्तु प्रत्येक पुढील वस्तूचें कारण म्हटलेलें आहे, ह्मणून ही कारणमाला होय.

आतां कारणमालेचें आणखी एक उदाहरण देतों. आर्याः—

स्पृश्य गणा अंत्यज, ह्या स्पृश्यत्वांतुनि निघेल सहवास ।
प्रेमहि सहवासांतुनि, त्यांतून निघेल गाढ विश्वास ॥
विश्वासांतुनि ऐक्य स्थिर, साहाय्यस्पृहा तयांतून ।
तींतूनि देशकार्यप्रगति विभवमार्गीं होइल अनून ॥

अंत्यजांना आपण स्पृश्य समजूं लागलों, तर त्यांच्याशीं आपला सहवास घडेल, सहवासापासून प्रेम उत्पन्न होईल, प्रेमापासून एकमेकांविषयीं विश्वास उत्पन्न होईल, विश्वासापासून ऐक्याचा उद्भव होईल, ऐक्यापासून परस्परांना मदत करण्याची बुद्धि उत्पन्न होईल, आणि अशी बुद्धि उत्पन्न झाली असतां वैभवाच्या मार्गांत देशकार्याचें पाऊल पुढें पडेल !

या ठिकाणीं स्पृश्यत्व, सहवास, प्रेम, विश्वास, ऐक्य, साहाय्य करण्याची बुद्धि, देशकार्याची प्रगति, अशी सात वस्तूंची एक मालिका आहे, आणि ह्या मालिकेंतील पहिली वस्तु दुसरीचें कारण आहे, दुसरी वस्तु तिसरीचें कारण आहे,

तिसरी वस्तु चवथीचें कारण आहे, अशी परंपरा शेवटपर्यंत सांगितली आहे. ईही कारणमालेचेंच उदाहरण होय.

ह्मणींमध्येंही हा अलंकार दृष्टीस पडतो. " खिळ्यासाठीं नाल गेला, नालासाठीं घोडा गेला, घोड्यासाठीं स्वार गेला," ह्या ह्मणीमध्यें कारणमाला हा अलंकार आहे.

खिळा गळून पडला, तो बसविला नाहीं ह्मणून नाल लटपटूं लागून गळून पडला; नाल गळून पडल्यामुळें घोड्याचा एक पाय टेंगणा झाला, तो आडखळूं लागून पडला, तो पडल्यामुळें स्वाराला अपघात झाला. येथें खिळा, नाल, घोडा, स्वार, ह्यांची एक मालिका आहे. पहिलीचें जाणें हें दुसरीच्या जाण्याचें कारण, दुसरीचें जाणें हें तिसरीच्या जाण्याचें कारण, तिसरीचें जाणें हें चवथीच्या जाण्याचें कारण ह्मटलेलें आहे.

ह्या ह्मणींत आपणाला सुंदर कारणमालेचें उदाहरण आढळतें. योग्य वेळीं एकाद्या क्षुल्लक चुकीची दुरस्ती करणें जर आपण आळसावर ढकललें, तर मोठे अनर्थ ओढवतात, हें आपणास सांगावयाचें असतां आपण ही ह्मण योजतों.

उपमानापेक्षां उपमेयाच्या ठायीं कांहीं एका विशिष्ट गुणाचा अधिकपणा आहे, असें सांगावयासाठीं केलेलें जें विधान त्याला "व्यतिरेक" असें ह्मणतात. तसेंच उपमेयापेक्षां उपमानाचे ठायीं कांहीं एका गुणाचा कमीपणा आहे, असें सांगावयासाठीं केलेलें जें विधान, तोही " व्यतिरेक"च होय.

उदाहरण; आर्या--

गेला वसंत येइल पुनरपि तूं पाहशील तो बाळा ।
ज्ञानार्जन करिं आतां, नच बघशिल तूं गताध्ययनकाळा ॥

यंदाचा वसंतऋतु निघून गेला तरी पुढच्या वर्षी, हे मुला, पुनः वसंतऋतु येईल, तो तुला दिसेल; परंतु अभ्यास करण्याचें हें तुझें वय एकदा निघून गेलें म्हणजे तें पुनः येणार नाहीं, असें येथें वर्णन आहे.

येथें वसंतऋतु हें उपमान आहे. अध्ययनकाळ हें उपमेय आहे. वसंत ऋतूपेक्षां अध्यनकाळाची क्षणभंगुरता अधिक असल्याचें येथें वर्णन आहे, म्हणून येथें "व्यतिरेक" हा अलंकार झाला.

आतां म्हणींमध्यें देखील हा व्यतिरेक अलंकार सन्निविष्ट झालेला आढळतो.

" सगळीं सोंगें येतात, पण पैशाचें सोंग येत नाहीं, " ह्या सुंदर म्हणींत व्यवहारांतलि एक अनुभव कथित आहे.

आपली स्थिति जी खरोखरी नाहीं ती आहे हें मनुष्य दाखवूं शकेल. मनुष्य ह्याव्या त्या दर्जाच्या माणसाप्रमाणें आपण आहों असें भासवूं शकेल; परंतु जवळ पैसा नसतां श्रीमंती थाटानें तो राहूं शकणार नाहीं, असा जगांतील एक मूल्यवान अनुभव वरील म्हणींत गोंविलेला आहे. ह्या म्हणींत व्यतिरेक अलंकार आहे.

जेव्हां दोन वस्तु अत्यंत भिन्नधर्मीय असतात, आणि ह्या भिन्नधर्मीयत्वामुळें त्यांचें साहचर्य किंवा सहवास किंवा संयोग घडणें अशक्य आहे किंवा घडवून आणणें हास्यास्पद आहे असें वर्णन असतें, तेथें " विषम " ह्या नांवाचा अलंकार होतो.

तसेंच भिन्नधर्मीय वस्तूंमध्यें साम्य दाखवावयाला प्रवृत्त होणें हें मूर्खपणाचें आहे असें वक्ता म्हणतो, तेथेंही "विषम" हाच अलंकार असतो.

ह्या अलंकाराचें वाङ्मयांतील एक उदाहरण पुढें देतों.

वृत्त आर्या.

कोठें पविसा शर तव ? कोठें नवनीतमृदु हरिणकाया ? ।
करिं योजना शराची पीडितजनदुःखराशि वाराया ॥

शाकुंतल, अंक १ ला.

कण्वाच्या आश्रमांतील एका हरिणावर दुष्यन्त शर सोडावयाला प्रवृत्त झाला असतां एक मुनि त्या राजाला म्हणतो, "वज्राप्रमाणें कठिण असा तुझा शर कोणीकडे आणि लोण्यासारख्या मृदु देहाचा हा हरिण कोणीकडे?" म्हणजे असें कीं, तुझ्या शराला हा हरिण योग्य लक्ष्य नव्हे. तूं आपला शर सोडूं नको.

ह्या अलंकाराचीं उदाहरणें अनेक म्हणींमध्यें दृष्टीस पडतात. " कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी ?" ह्या म्हणींत विषम हा अलंकार आहे.

इंद्राचा ऐरावत आणि शामभटाची तट्टाणी, ह्या भिन्न दर्जाच्या दोन

वस्तूंत साम्य कसचें ? ह्या दोन वस्तूंत तुलना कशी होऊं शकेल ? ह्या दोन वस्तूंचें एकच वर्णन कसें होऊं शकेल ? असा ह्या म्हणींतील अभिप्रेत अर्थ आहे.

वरील म्हणींत "अप्रस्तुतप्रशंसा" हा अलंकार तर आहेच, पण शिवाय "विषम" हा अलंकारही आहे.

"कोठें राजा भोज आणि कोठें गंगा तेलीण?" ह्या इतिहासगर्भ म्हणींतही "विषम" अलंकार सन्निविष्ट झालेला आहे.

कारण उपस्थित असून कार्य घडून येत नाहीं अशा अर्थाचें जें विधान, त्याला "विशेषोक्ति" असें म्हणतात. उदाहरणः—आर्या.

बघतों प्रतिक्षणीं मीं एकामागून एक जन मरती ।
तरि संसारापासुनि पावतसे चित्त हें न मम विरती ॥

क्षणाक्षणाला माणसें मरत आहेत हें मी पहात आहें; तरी देखील संसारापासून माझें चित्त निवृत्त होत नाहीं !

माणसांच्या मरणाचा देखावा पाहिल्यानें संसाराचा वीट यावा हें उघड आहे; पण मला तसा वीट येत नाहीं !

येथें कारण उपस्थित असून कार्य घडून यावें तें येत नाहीं असें वर्णन आहे. हें "विशेषोक्तीचें" उदाहरण होय. म्हणींतही हा अलंकार आढळतो.

" दोरी जळे पण पीळ न जळे " ह्या म्हणींत दोरी जळली तरी पीळ शाबूत राहतो असें म्हटलें आहे, हा "विशेषोक्ति" अलंकार. द्वाड माणसाचीं द्वाडपणा करण्याचीं साधनें जरी त्याच्याजवळ शिल्लक राहिलेलीं नसलीं, तरी त्याची द्वाडपणा करण्याची इच्छा नाहींशी होत नाहीं, हें तावून सुलाखून खरें ठरलेलें सत्य मोठ्या सुंदर रीतीनें ह्या म्हणींत सांगितलेलें आहे.

" खुंटा चाले चार हात तरी जागच्या जागीं " ही सुंदर आणि विनोदी म्हण व्यवहारांत वारंवार योजलेली आपण ऐकतों. जेव्हां एकादा माणूस लांब लांब बेत करतो, मोठ्या मोठ्या बढाया मारतो, पुष्कळ खटपटी करतो आणि पुढें सर्वाचें ओम् फस् होतें, तेव्हां त्याच्या स्थितीचें वर्णन करतांना ही म्हण योजली जाते.

जात्याच्या खुंट्यानें चार हात लांबीचा प्रवास केला असतां तो दूर जात नाहीं, आणि फिरून पहिल्या जागींच असतो, हें दृश्य सर्वांच्या परिचयाचें आहे.

या म्हणींत कारण विद्यमान असून कार्य घडत नाहीं असें म्हटलेलें आहे म्हणून येथें "विशेषोक्ति" हा अलंकार झाला आहे.

जेव्हां आपणाला एकादें विधान ठासून करावयाचें असतें, तेव्हां एका विशिष्ट सरणीनें तें विधान करण्याचा एक प्रकार आहे. आपणाला जें विधान करावयाचें असतें तें करणरूपी असल्यास आपण अकरणरूपी प्रश्न विचारतों, आणि तें विधान अकरणरूपी असल्यास करणरूपी प्रश्न आपण विचारतों. आपला अपेक्षित अर्थ आपण भाषणाच्या स्वरावरून व्यक्त करतों. अशा सरणीला "प्रश्नालंकार" म्हणतात.

उदाहरण, संवाद.

प्रश्न — चार आणि तीन अकरा होतात ?
उत्तर — नाहीं होत.
प्रश्न — चार आणि तीन सात नाहींत ?
उत्तर — होय, आहेत.

प्रश्नालंकाराचीं उदाहरणें म्हणींत आढळतात. प्रश्न—"उंटा उंटा, तुझी मान कां रे वांकडी?" उंटाचें उत्तर—"माझें सरळ काय आहे?"[फलित उत्तर—माझें सरळ कांहींच नाहीं, मग मान तरी सरळ कोठून असणार ?].

जेव्हां एकादी गोष्ट सर्वथैव दोषमय असते तेव्हां ही म्हण योजण्यांत येतें. उंटाचें जसें सरळ असें कांहींच नाहीं, तशी ती वस्तु कोणत्याही बाजूंनीं पाहिली तरी सदोषच, असा वक्त्याचा अभिप्राय असतो.

जेव्हां कांहीं पदांची एक श्रेणी असते, आणि ह्या श्रेणींतील प्रत्येक मागल्या पदाचें कांहीं एका विशिष्ट सरणीनें वर्णन श्रेणींतील पुढच्या पदानें केलेलें असतें, आणि अशा रीतीनें हें वर्णन श्रेणींतील शेवटच्या पदापर्यंत पोंचविलेलें असतें, तेव्हां 'एकावली' हा अलंकार होतो. हीं वर्णनें कधीं करणरूपी असतात आणि कधीं अकरणरूपी असतात; परंतु तीं कोणत्याही रूपीं असलीं तरी वर्णनाची सरणी शेवटपर्यंत तीच कायम असावी लागते; म्हणजे कांहीं वर्णनें करणरूपी आणि कांहीं अकरणरूपी असतां कामा नयेत.

उदाहरण, आर्या.

राज्यांत समृद्ध पुरें, उंच पुरांतिल गृहें, गृहांत जन- ।
उद्योगशील सारे, उद्योग स्तुत्य देति विपुल धन ॥

ह्या आर्येंत एका संपन्न राज्याचें वर्णन आहे. त्या राज्यांतील सर्व शहरें संपन्न होतीं. प्रत्येक शहरांत उंच उंच वाडे होते. प्रत्येक वाड्यांत सर्व लोक उद्योगी होते, आणि प्रत्येक उद्योग स्तुत्य असून विपुल धन देणारा होता.

येथें राज्य, पुरें, गृहें, जन, उद्योग, आणि धन, अशी सहा पदांची एक श्रेणी आहे. ह्या श्रेणींतील मागल्या पदाचें वर्णन पुढच्या पदानें केलेलें आहे. वर्णनाची सरणी शेवटपर्यंत तीच असून सगळीं वाक्यें करणरूपी आहेत.

अकरणरूपी एकावलीचें पुढील उदाहरण पहा.

ह्या परराज्यांत न पुर, न कुटुंबें बाटगीं विपुल ज्यांत ! ।
त्यांत न एकहि, ज्यांतिल नरनारी पापकृति न करितात ॥
पापकृतींत न एकहि जी खचवि न देश अधिक दास्यांत ।
परदेशी परधर्मी प्रभु देशाचा करी महाघात ॥

ही शिवाजीची उक्ति आहे. "ह्या मुसलमानी राज्यांत असा एकही गांव नाहीं, कीं ज्यांत बाटलेलीं कुटुंबें नाहींत. ह्या बाटलेल्या कुटुंबांत असें एकही कुटुंब नाहीं, कीं ज्यांतील स्त्रीपुरुष पापें करीत नाहींत. ह्या पापांत असें एकही पाप नाहीं, कीं जें ह्या आपल्या देशाला दास्यामध्यें अधिक खोल ढकलीत नाहीं !" हें एकावलीच्या अकरणरूपी सरणीचें उदाहरण होय.

हीं वाङ्मयाच्या क्षेत्रांतील "एकावलीचीं" दोन उदाहरणें झालीं म्हणीं-तही एकावली अलंकार आढळतो. शास्त्रामध्यें ग्राम्यपणाला अवसर नाहीं असें पुन्हा एकदा वाचकांना बजावून आम्ही म्हणींत आढळणाऱ्या "एकावली" अलंकाराचें एक उदाहरण देतो.

" आधीं *** बोट घालूं नये; घातलें तर हुंगूं नये, हुंगलें तर चाटूं नये; चाटलें तर सांगूं नये. "

जेव्हां कोणी मनुष्य एकादी अकरणीय गोष्ट करतो, आणि ती करून न थांबतां तिच्या अकरणीयत्वाच्या पुढच्या पुढच्या पायऱ्या निर्लज्जपणानें चढत जातो, तेव्हां त्याची निर्भर्त्सना करतांना वरील म्हण योजण्यांत येते.

वाङ्मयाच्या क्षेत्रांमध्यें म्हणींची योग्यता काय आहे ह्या विषयाकडे आजपर्यंत कोणाही महाराष्ट्रीय पंडिताचें लक्ष्य गेलेलें नाहीं. तसेंच म्हणींमध्यें अलंकार असतात आणि ह्या अलंकारांच्या योगानें शेंकडों म्हणींमध्यें चारुता उत्पन्न होते, ह्याही गोष्टीची महाराष्ट्रियांना जाणीव नाहीं. ह्या म्हणींच्या प्रांतामध्यें आम्हींच प्रथम संचार करीत आहों, ह्या कारणामुळें आमचा आम्हांला मार्ग शोधून काढावा लागला आहे, आणि कित्येक ठिकाणीं आमच्याकडून चुकाही झालेल्या असतील हेंही असंभवनीय नाहीं. ह्यासाठीं आमच्या विवरणाकडे महाराष्ट्रीयांनीं सदय अंतःकरणानें पहावें, अशी आमची त्यांना विनंति आहे.

म्हणींतील अलंकार ह्या विषयावर आह्मी येथपर्यंत जें विवरण केलें, त्यांत आम्हीं चवदा अलंकार म्हणींत दाखवून दिले. दीपक, तद्गुण, अतद्गुण, परिसंख्या, अप्रस्तुतप्रशंसा, अतिशयोक्ति, उपमा, श्लेष, कारणमाला किंवा हेतुमाला, व्यतिरेक, विषम, विशेषोक्ति, प्रश्न, आणि एकावली, हे ते अलंकार होत. ह्या चौदा अलंकारांशिवाय इतर अलंकारही म्हणींमध्यें आढळतात. ते आम्ही दाखवून दिले नाहींत. आम्हीं केवळ दिशा दाखवून दिली. आम्हीं ज्या दृष्टीनें ह्या विषयाचा विचार केला आहे, त्या दृष्टीनें आमच्या चौकस वाचकांनीं विचार केल्यास त्यांना म्हणींमध्यें दुसरे पुष्कळ अलंकार आढळून येतील अशी आमची खात्री आहे. आमचें हें विवरण त्यांना मार्गदर्शक झालें तर आमच्या श्रमाचें चीज झालें असें आम्हीं समजूं.

म्हणींतील अलंकार शोधून काढतांना आमच्या वाचकांना एक सूचना देऊन ठेवणें जरूर आहे. एखादें वाक्य एखाद्या अलंकाराच्या रूपांत असलें, तर तेवढ्यानें त्यांत तो अलंकार आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. 'खडूप्रमाणें दूध पांढरें आहे', या वाक्यांत उपमेचीं चारी अंगें उपस्थित आहेत, तरी त्यांत उपमा हा अलंकार आहे असें म्हणतां येत नाहीं; कारण, त्यांत कांहीं चारुता नाहीं. 'राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न, ह्यांच्या पत्नी सीता, उर्मिळा, मांडवी आणि श्रुतकीर्ति, ह्या होत्या,' या वाक्याला यथासंख्य अलंकाराचीं सर्व लक्षणें असतात, म्हणून ह्या वाक्यांत यथासंख्य अलंकार आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण, या वाक्यांत कांहीं चारुता

नाहीं. आमच्या म्हणण्याचा सारांश हा, कीं वाचकांनीं केवळ म्हणींच्या रूपावर जाऊं नये, तर त्या म्हणींच्या स्वरूपाकडेही त्यांनीं लक्ष्य पुरविलें पाहिजे. म्हणींतील अलंकार हुडकून काढण्याच्या भरांत म्हणींच्या स्वरूपाकडे दुर्लक्ष्य होऊन केवळ रूपांवरून आपली दिशाभूल होण्याचा संभव आहे, हें वाचकांनीं लक्ष्यांत घेतलें पाहिजे.

आतां म्हणींतील अलंकारांचें हें निरूपण समाप्त करतांना आणखी एक सूचना देणें जरूर आहे. एकाद्या वाक्यांतील चारुतेची प्रतीति सर्वांना सारखीच होऊं शकत नाहीं. एका माणसाला जेथें चारुता वाटेल, तेथें दुसऱ्याला ती मुळींच वाटणार नाहीं किंवा अत्यल्प प्रमाणांत वाटेल. एकाद्या म्हणीमध्यें आपणाला अमुक अलंकार आहे असें वाटलें, आणि दुसऱ्याला त्यांत तो अलंकार वाटला नाहीं, म्हणून तेवढ्यावरून आपण अरसिक आहों अशी आपणांस खंती बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं, किंवा तो दुसरा माणूस अरसिक आहे असा त्याला दोष देण्याचेंही कांहीं कारण नाहीं. हृदयगम्य विषयाला गणितशास्त्राची कसोटी लावणें बरोबर नाहीं.

प्रकरण ४ थें.

म्हणींची उत्पत्ति आणि म्हणींच्या अभ्यासापासून होणारे लाभ.

१.

एथवर आम्ही म्हणींची व्याख्या ठरवून म्हणींच्या ठायीं असणारे आवश्यक आणि अनावश्यक गुण यांचें विवेचन केलें. आतां म्हणी उत्पन्न होतात कशा हें पाहूं.

म्हणींच्या उत्पत्तीविषयीं आपण सूक्ष्म विचार केला म्हणजे आपणांस असें कळून येतें कीं, मनुष्याचा अनुभव जसजसा वाढत गेला, तसतशा म्हणी प्रचारांत येत गेल्या. संसारांतील बाबतींत मनुष्याचा जगाशीं जसजसा व्यवहार वाढत गेला, तसतसा त्याचा विविधविषयक अनुभवही वाढत गेला. अशाप्रकारें हा अनुभव वाढून दृढही झाला, आणि हळूंहळूं त्या अनुभवास स्थायिकपणा प्राप्त होत गेला. हा स्थायिकपणा अर्थात् लहान मजेदार अशा

वचनांनीं व्हावयाचा. कारण, अशा प्रकारचीं वचनें लक्ष्यांत ठेवण्यास सोपीं असतात. प्राचीन काळीं जेव्हां लिहिण्याचीं साधनें इतकीं विपुल नव्हतीं तेव्हां स्मृति, व्याकरण, दर्शनें, वगैरे ग्रंथ लहान लहान सूत्रांच्या रूपानेंच असत. त्याचप्रमाणें हरएक प्रकारच्या व्यवहारांतील घडामोडींसंबंधीं ज्ञान लोक म्हणींत सांठवून ठेवीत असत. हल्लींच्या काळीं सुशिक्षित लोकांस पुस्तकांपासून जो उपयोग होतो, तोच पूर्वी लोकांस म्हणींपासून होत असे. कोणत्याही प्रकारचें ज्ञान त्यांना पाहिजे असल्यास त्यांना ते म्हणींत सांपडे. संसारांतील कोणत्याही प्रसंगीं कसें वागावें, मित्राशीं कसें वागावें, शत्रूशीं कसें वागावें, कोणावर विश्वास ठेवावा, कोणावर ठेऊं नये, प्रामाणिक मनुष्य कसा ओळखावा व लबाड कसा ओळखावा, वगैरे हजारो प्रकारची माहिती लोकांस म्हणींत मिळत असे; आणि इतकें ज्या अर्थी म्हणींचें महत्त्व आहे, त्या अर्थी ह्मणी प्रत्येक देशांत आढळतात यांत आश्चर्य नाहीं.

ह्मणी उत्पन्न होण्याची क्रिया जशी पूर्वीपासून चालत आली आहे, तशीच ती पुढेंही चालत राहील. कारण, जोंपर्यंत एकादी भाषा प्रचलित असते, तोंपर्यंत तिच्यांतील शब्दसमूह जशाचा तसा कायम न राहतां नवीन माहित झालेल्या पदर्थांचे द्योतक असे नवीन शब्द रूढ होत असतात, त्याप्रमाणें एकाद्या देशाला जोंपर्यंत नवीन गोष्टीसंबंधानें नवीन ज्ञान व नवीन अनुभव मिळत आहे, तोंपर्यंत हें नवीन ज्ञान व हा नवीन अनुभव लोकांच्या भाषणांत प्रकट होईल, व त्यास जर ज्ञान-संकोच—चारुता—जनसंमति ह्या चतुष्टयाचें साहाय्य असलें, तर त्यास "ह्मण" ही संज्ञा प्राप्त होईल.

आतां येथें एका प्रसंगोपात्त गोष्टीविषयीं विचार करून मग पुन्हां म्हणीच्या उत्पत्तीचें विवेचन हातांत घेऊं. कोणत्याही देशाच्या चालीरीती कितीही भिन्न असल्या व त्यांचे आचार विचार कितीही वेगळे असले, तरी त्यांच्यांत साधारण अशा पुष्कळ गोष्टी असतात. दोघांसही सारखेच जयापजय प्राप्त झालेले असतात, दोघांसही लबाडांच्या पायीं सारख्याच ठोकरा बसलेल्या असतात; दोघांतही सज्जन व दुर्जन, उद्योगी व आळशी, विद्वान् व मूढ, असे लोक असतात, व तेणेंकरून तद्विषयक मतांचा व अनुभवांचा ज्यांत अंतर्भाव झालेला असतो, अशा म्हणीही समानार्थक असतात. ह्या आमच्या विधानाच्या समर्थनार्थ एक उदाहरण घेऊं. प्रत्येक देशांत असे लोक आढळावया-

चेच कीं, जे स्वतः एकादें काम करण्यास नालायक असतात व तें व्हावें तसें न झालें म्हणजे भलत्याच मनुष्यास किंवा वस्तूस दोष लावितात. तर अशा मनुष्यासंबंधीं उपहासात्मक जी मराठींतील म्हण आहे, ती त्या प्रकारच्या इंग्रजी म्हणीशीं पटते. " नाचतां येईना अंगण वांकडें, रांधतां येईना ओलीं लाकडें " ही मराठी म्हण आणि A bad workman quarrels with his tools ही इंग्रजी म्हण, ह्या दोन म्हणी एकमेकींना जाब देणाऱ्या आहेत.

अशाच चमत्कारिक साम्यांची पुढें दोन तीन उदाहरणें दिलीं आहेत.

(१) मराठी " गरज सरो वैद्य मरो "
व इंग्रजी The river past and God forgotten.

(२) मराठी म्हण " दाम करी काम "
इंग्रजी " Money makes the mare go "
उर्दू "जर चाहियेसो कर"
पारशी "जर बरसरे फौलाद नही नर्म शवद".

(३) मराठी म्हण " चोराचीं पावलें चोराला ठाऊक "
इंग्रजी " Set a thief to catch a thief. "
पारशी हरीफरा हरीफ मीशनासद.

(४) " अंथरूण पाहून पाय पसरावे. "
इंग्रजी "Cut your coat according to your cloth."
पारशी "ब अंदाज ए गिलीम पा दरास कून "

मनुष्यांच्या स्थितींत साम्य असतें म्हणून वेगळाल्या राष्ट्रांच्या म्हणींत साम्य आढळतें, ह्यांत विशेष नवल नाहीं. अशा प्रकारच्या साम्यांचीं उदाहरणें बहुभाषाकोविद अशा वाचकांस पुष्कळ आढळतील.

दोन राष्ट्रांच्या अनुभवाचे साम्यावरून त्यांच्या म्हणींत साम्य असतें इतकेंच नव्हे तर कधीं कधीं असेंही होतें कीं, दोन राष्ट्रांचें व्यापारासंबंधानें किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें जेव्हां एकमेकांशीं दळणवळण होतें, तेव्हां एका भाषेंतील म्हणी पुष्कळ वेळां दुसऱ्या भाषेंत वापरल्या जातात. व पुढें पुढें त्यांचा देशी भाषेंत तर्जुमा होतो, किंवा म्हणी अगदीं सोप्या भाषेंत असल्या तर भाषांतरानें त्यांच्या रूपांत पालट

न होतां त्या जशाच्या तशाच कायम राहतात. उदाहरणार्थ, आपण "मंत्रापेक्षां थुंकी भारी" ही ह्मण घेऊं. जेथें मराठी भाषेचें अत्यंत शुद्ध स्वरूप आढळतें, अशा ठिकाणीं ह्मणजे पुणें वगैरे गांवीं ही म्हण ऐकण्यांत येत नाहीं. परंतु धारवाड, बेळगांव, वगैरे ठिकाणीं तिचा पुष्कळ प्रचार आहे. यावरून असें अनुमान सहज होणार आहे कीं, ही म्हण मूळची कर्नाटकी भाषेतील असून धारवाड, बेळगांव, या प्रदेशांत मराठी लोक व कानडी लोक यांचें एकमेकांशीं वारंवार दळणवळण होत असतें म्हणून कानडी भाषेतील ही म्हण मराठी भाषेत आली असावी; आणि खरोखर वस्तुस्थितीही अशीच आहे.

आपण आतां उदाहरणांसाठीं दुसरी एक म्हण घेऊं "जेनो काम तेनो थाय बिजा करेसो गोता खाय," ही म्हण गुजराथी भाषेतील आहे; ती परकी लोकांची म्हण आहे अशी भावनाही आपण विसरून गेलों आहो.

हिंदी भाषेतील देखील कांहीं कांहीं म्हणी आपण मराठी भाषेत त्यांच्या मूळच्या रूपांतच वापरतों. अशाच प्रकारची "दसकी लकडी एकका बोजा" ही म्हण आहे. ही म्हण अद्यापि आपण तिच्या मूळच्या शब्दांनींच वापरतों, व पुढें तरी आपल्या मराठी भाषेत तिचें भाषांतर होईल किंवा नाहीं याची शंकाच आहे; कारण, ह्या चिमुकल्या ह्मणींतील तत्त्व अशिक्षित लोकांपासून तों सुशिक्षित लोकांपर्यंत सर्वांस समजण्याजोगें आहे, आणि तेणें करून तिला आपलें रूप पालटण्याची फारशी आवश्यकता नाहीं.

आपण हिंदी भाषेतील दुसऱ्या पुष्कळ म्हणी त्यांच्या मूळच्याच रूपानें मराठींत सामील करून घेतल्या आहेत. "अक्कलसे खुदा पछानना," "कहां राजा भोज और कहां गांगी तेलण," "दिलमें चंगा तो कथोटमें गंगा," "मन मिलेसे मेला, चित्त मिलेसो चेला, नहीं तो अकेला भला," इत्यादि हिंदी म्हणी त्यांच्या मूळ रूपांतच मराठींत वापरण्यांत येतात. एक फारच मजेदार हिंदी म्हण आपण मराठींत वापरतों ती ही.—"दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये," ह्या ऊर्दू म्हणीच्या अर्थाची आपल्या मराठी भाषेत म्हण नाहीं ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट होय. आपल्या लोकांचे ठायीं फसण्याचा गुण फार उच्च प्रमाणांत

आहे. आपली कोणी स्तुति केली कीं आपण तेव्हांच भुलून जातों, आणि स्तुति करणाराची हावी ती विनंती मान्य करतों. शुचिर्भूतपणाचें दंभ किंवा वरपांगी प्रेमाचें आविष्करण पाहून, किंवा नाटकी अनुकंपेचे उद्गार ऐकून, आपण अगदीं सहज फसतों. कुणबी माळी, बाया बापड्या, वगैरे अशिक्षित आणि अडाणी माणसांना फसविणारे जसे अनेक भोंदू लोक आहेत, तसे चांगल्या सुशिक्षित आणि अनुभवसंपन्न माणसांनाही फसविणारे लुच्चे लोक जगांत पुष्कळ आहेत. हा सहज फसण्याचा गुण आपल्या अंगीं असून त्या गुणाची द्योतक अशी म्हण आपल्या मराठी भाषेंत नसावी आणि आपण " दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये " ह्या ऊर्दू भाषेंतील म्हणीनें आपली गरज भागवून घ्यावी, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट होय !

नवीन ह्मणी प्रचारांत येण्याचा आणखी एक मार्ग आहे. जेव्हां एकाद्या लक्ष्यांत ठेवण्याजोग्या प्रसंगीं एकादा चमत्कारिक प्रस्ताव घडलेला असतो, तेव्हां त्या प्रस्तावास उद्देशून तेथें किंवा दुसरीकडे कोणी कांहीं वचन बोलून गेलें असलें तर तें वचन सुद्धां ज्याच्या त्याच्या तोंडीं होतें, व अशा रीतीनें तें ह्मणीची योग्यता पावतें. तो प्रस्ताव सर्वांस विदितच असतो, ह्मणून वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारचें वचन उच्चारल्याबरोबर पूर्वी घडून आलेला वृत्तांत श्रोत्यांच्या डोळ्यापुढें मूर्तिमंत उभा राहातो, आणि म्हणून तें कोणास समजून सांगावें लागत नाहीं. अशा रीतीनें मागची सर्व हकीकत निवेदन करण्याची आवश्यकता न पडतां चार पांच शब्दांत आपलें काम होतें, आणि मग ह्मणीप्रमाणें त्यांचा उपयोग वारंवार होतो. उदाहरणार्थ आपण " पुराणांतील वांगीं पुराणांत राहतात, " ही ह्मण घेऊं. एकाद्या मनुष्यानें दुष्टाचारीपणाचा आव घालून असें करावें तसें करावें म्हणून मोठ्या थाटानें उपदेश करून प्रसंग पडल्यास तो उपदेश झुगारून देऊन तद्विरुद्ध आचरण केल्यास 'पुराणांतील वांगीं पुराणांत' ह्या ह्मणीचा उपयोग करतात. ही म्हण रूढ होण्यास पुढील प्रस्ताव कारण झाला.

एकदा एक पुराणिकबुवा चातुर्मासांत कोणकोणते नियम पाळले पाहिजेत याचे विषयीं श्रोतृसमाजास उपदेश करीत असतां म्हणाले, " ह्या चार महिन्यांत वांगीं वर्ज्य आहेत. " पुढें कांहीं दिवसांनीं ही स्वारी वांग्याच्या भाजीवर यथास्थित झोड मारीत असतां एक देवळांतील बाई कांहीं कामाकरितां त्यांचे घरीं आली होती, तिनें हा प्रकार पाहून बोवांस

विचारलें, " बोवा परवां ना तुम्हीं देवळांत म्हणलां कीं, चातुर्मासांत वांगीं खाऊं नयेत म्हणून ? आणि आज हें काय चालविलें आहे ? " त्यावर पुराणिक बोवा उत्तर करितात, " अहो बाई, पुराणांतलीं वांगीं पुराणांत ? "

प्रस्तावावरून प्रचारांत आलेल्या म्हणींची आणखी दोन तीन उदाहरणें देतों.

" बुंदसे गयी सो हौदसे नहीं आती. " एकदा निजामाचा दरबार भरला होता. त्यांत इतर सरदारांत पेशव्यांचे तर्फे हरिपंत पिंगळे म्हणून वकील हजर होते. दरबाराचे काम आटोपल्यावर पानसुपारी, अत्तर, वगैरे होत असतां अत्तराचा एक बिंदु बिछायतीवर पडला. तो अत्तर लावणाऱ्या कारकुनानें टिपून घेतला. हें कृत्य हरिपंतानें पाहिलें असें निझामाच्या नजरेस आलें, आणि क्षुल्लक गोष्टींसंबंधानें सुद्धां निजामाच्या दरबारांत चिक्कूपणा आहे, अशी टीका पेशव्यांच्या दरबारांत होईल ती न व्हावी म्हणून निजामानें त्यावर अशी उत्कृष्ठ शक्कल योजिली कीं, पुन्हां दरबार भरावयाचे दिवशीं एक हौद तयार करवून त्यांत अत्तर भरून ठेविलें. नंतर त्यानें असा हुकूम फर्माविला कीं, दरबारांत यावयाचें आधीं सर्वांनीं आपले पाय त्या अत्तराच्या हौदांत बुडवून यावें. याप्रमाणें सर्व मंडळी आंत येऊन बसल्यावर निजामानें हरिपंतास प्रश्न विचारला, "कैशी क्या अहवाल है!" त्यावर त्या हरिपंतानें उत्तर दिलें, "बुंदसे गयी सो हौदसे नहीं आती," म्हणजे एक थेंब अत्तर टिपून घेतल्यानें जी तुमची बदछान झाली, ती हौदभर अत्तराची नासाडी केल्यानें भरून येणार नाहीं ! असो.

म्हणींच्या उत्पत्तीच्या वर निर्दिष्ट केलेल्या दोन उगमाशिवाय आणखी एक म्हणींचा उगम आहे. तो कोणचा म्हटला तर भाषेंतील लोकप्रिय ग्रंथकारांच्या कृति, मग त्या कृति गद्यात्मक असोत किंवा पद्यात्मक असोत.

म्हणींच्या योग्यतेस पोचलेलीं जीं वचनें तीं गद्य ग्रंथांपेक्षां पद्यग्रंथांतीलच अधिक असतात. याचें कारण असें कीं पद्यामध्यें शब्दांची रचना ठांशीव असते, तेणेंकरून अत्यल्प शब्दांत अतिपुष्कळ अर्थ समाविष्ट झालेला असतो. त्यामुळें हीं वचनें संभाषणादिक व्यवहारांत अधिक सोईस्कर असतात.

प्रथम प्रथम हीं वचनें सुशिक्षित लोकांच्या उपयोगांत सुभाषितें म्हणून उपयोगांत येतात, नंतर तीं कालेंकरून कमी शिक्षित लोकांच्या उपयोगांत येऊं लागतात, आणि पुढें तीं सर्व लोकांत प्रचलित होऊन ह्मणींची योग्यता पावतात. अशा प्रकारें म्हणीच्या संख्येंत उत्तरोत्तर भर पडत जाते. अशा प्रकारें ह्मणींच्या योग्यतेस पोचलेल्या वचनांची संख्या जितकी जास्ती, तितकें लोकशिक्षण जास्ती असें बिनधोक अनुमान करतां येतें, आणि ज्या ग्रंथकाराचीं अशीं ह्मणींच्या योग्यतेस पोचलेलीं वचनें जास्ती, तो ग्रंथकार जास्ती लोकप्रिय, असेंही आपणास निश्चयात्मक रीतीनें ठरवितां येतें. अर्थात् लोकप्रियता ही कालानुरूप बदलणारी असल्याकारणानें एके काळीं जो ग्रंथकार लोकप्रिय असतो, त्याचीं वचनें म्हणींप्रमाणें वापरलीं जातात, मग पुढें त्याची लोकप्रियता जसजशी कमी होत जाते, तसतशा त्या ह्मणी रद्द पडत जातात.

आपल्या मराठी कवींमध्यें लोकप्रियतेच्या दृष्टीनें आज तुकारामास अग्रस्थान दिलें पाहिजे. एके काळीं हा अग्रस्थानाचा मान ज्ञानेश्वराकडे असावा असा आमचा तर्क आहे, परंतु आपल्या दुर्दैवानें हें निश्चयात्मक रीतीनें ठरविण्याचीं साधनें आपल्यापाशीं नाहींत. हल्लीं सर्व कवींमध्यें तुकाराम अत्यंत लोकप्रिय आहे, इतकेंच काय तें आपणास म्हणतां येत आहे. ह्या कवींतील जीं वचनें ह्मणींच्या योग्यतेस पोचलीं आहेत, त्यांची परिगणना करूं गेल्यास ती शेकड्यांनींच करावी लागेल, आणि तीं सारींच उत्कृष्ट असल्याकारणानें उदाहरणांदाखल म्हणून कोणचीं द्यावीं व कोणचीं वगळावीं ह्या संबंधानें आमची मति संभ्रांत होत आहे. तथापि कांहीं तरी उदाहरणें दिलीं पाहिजेत म्हणून पुढील उदाहरणें आह्मीं देतों.

(१) नाहीं संतपण मिळत हें हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ॥
(२) नीचपण बरवें देवा । न चले कोणाचाही हेवा ॥
(३) महापुरें झाडें जातीं । तेथें लोहाळे राहती ॥
(३) निंदा स्तुति करवी पोट । सोंग दाखवी बहुभाट ॥
(४) पाय धरिल्या न चले बळ ॥
(५) मृगजळा काय करावा उतार । पावावया पार पैलथडी ? ॥
(६) दया क्षमा शांति । तेथें देवाची वसती ॥

(७) आशाबद्ध वक्ता । भय श्रोतियांच्या चित्ता ॥
(८) पोट लागले पाठीशीं । हिंडवीतें देशोदेशीं ॥
(९) साखरेच्या गोण्या बैलाचिया पाठी । तयाशीं शेवटीं करबाडें ।
(१०) साधकाची दशा उदास असावी । उपाधी नसावी अंतर्बाह्य ॥
(११) साधु संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ॥
(१२) सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वता एवढें ॥
(१३) ऐरावत रत्न थोर । त्यास अंकुशाचा मार ॥

येणें प्रमाणें उदाहरणें द्यावीं तितकीं थोडींच !

आमच्या वाचकांपैकीं जर कोणी शोधक बुद्धीनें तुकारामाची गाथा वाचली, तर त्यांस संसारातील हरएक प्रसंगीं म्हणींप्रमाणें योजलीं जाणारीं अशीं किती तरी वचनें आढळून येतील !

रामदासाच्या कवितेंतील म्हणीवजा अशीं पुष्कळ वचनें आहेत. उदाहरणादाखल " जगीं सर्वसूखी असा कोण आहे ? " हें वचन घ्या. ही अमृतोपम उक्ति ज्या श्लोकांत ग्रथित आहे तो येणें प्रमाणें:—

जगीं सर्वसुखी असा कोण आहे ?
विचारी मना ! तूंच शोधोनि पाहे ।

मना त्वांचि रे पूर्व संचीत केलें,
तया सारखें भोगणें प्राप्त झालें ॥

वरील श्लोकाच्या पहिल्या चरणानें कोणा विपद्ग्रस्ताचें सांत्वन होत नाहीं ? दारिद्र्यादि अनेक व्याधींनीं ज्यास वैताग आला आहे, असा कोणचा मनुष्य हा चरण ऐकून समाधान पावणार नाहीं ? एकंदरींत मराठी भषेंत ज्या कांहीं लाखाच्या मोलाच्या म्हणी आहेत, त्यांच्यापैकींच ही म्हण होय ! " शितें जंवरतीं भुतें भोंवतीं " हा तुकडा रामजोशाच्या " दोदिवसांची तनु हे साची," ह्या प्रसिद्ध लावणींतला सर्वांस माहीत आहे. "रांडापोरें वंचक चोरें जंवर मिळविता तंवर थवा," "कोण कुणाचा सखा जिवा ?" हे तुकडेही त्याच लावणींतील आहेत." "कोल्ह्या प्रपंचिं सौख्य तुला काय रे ?" " संत थोडे थोडे," " अपक्व जन बहु जगांत दोडे दोडे, " वगैरे दुसरेही रामजोशाच्या कवितेंतील पुष्कळ तुकडे वापरण्यांत येतात.

" आकाश अंत न कळोनिहि अंतरीक्षीं ॥
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ॥

हा वामन पंडिताचा श्लोकार्ध कोणास उत्तेजन द्यावयाचें असतां योजला जातो. "विलंबें पुढें नाश कार्यास होतो," ही अनंत कवीची उक्ति चेंगटपणानें अनर्थ दाखवितांना योजली जाते. " फुटलें मोतीं तुटलें मन सांधूं न शके विधाता, " ही मुक्तेश्वराची उक्ति मैत्री एकदा भग्न झाली म्हणजे पूर्ववत् होऊं शकत नाहीं हें सिद्ध करतांना योजण्यांत येते. " कठिण समय येतां कोण कामास येतो ?" ही रघुनाथ पंडिताची उक्ति ज्याला उच्चारण्याचा प्रसंग आला नाहीं असा आपणांपैकीं कोण भाग्यशाली मनुष्य आहे ? कोणी नाहीं. अडचणीच्या समयीं कोणी कोणाला उपयोगीं पडत नाहीं हा कठोर अनुभव प्रत्येक मनुष्यास पदोपदीं व्यवहारांत येत असतो. "समर्थाचिया घरचें श्वान त्यास सर्वेहि देती मान " ह्या देवीदासाच्या उक्तींत श्रीमंत किंवा अधिकारी लोकांच्या बगलबच्चांना सदैव मिळणाऱ्या मानमान्यतेचें किती सुंदर चित्र रेखाटिलें आहे ! " उडदा माजी काळेगोरे काय निवडावें निवडणारे !" ही त्याच कवीची उक्ति वाईट वस्तूंमध्यें पायऱ्या लावतांना जी तारंबळ होते तिची द्योतक आहे. " बा तुझा चालता काळ । खायाला मिळती सकळ, " ही अमृतरायाची उक्ति श्रीमंतांच्या भोंवतीं गराडा घालून असलेल्या लोकांच्या भाडोत्री प्रेमाची निर्भत्सना करतेवेळीं योजली जाते.

मोरोपंत कवीचा प्रचंड काव्यमहार्णव मनांत आणला असतां आणि प्रत्येक बाबतींत त्याचें अग्रेसरत्व आहे हें लक्ष्यांत घेतलें असतां कोणासही असें वाटणें सहाजिक आहे कीं त्याच्या कवितेंतील पुष्कळ उतारे म्हणींची योग्यता पावलेले असले पाहिजेत; आणि वस्तुस्थिति खरोखरी अशी आहे. " मन हें ओढाळ गुरूं " ही मोरोपंतांची उक्ति वारंवार कानावर येते. सबंध आर्या येणें प्रमाणें:—

मन हें ओढाळ गुरूं परधन परकामिनीकडे धावे ।
यास्तव विवेकपाशें कंठीं वैराग्यकाष्ठ बांधावें ।

कोणी मनुष्य कांहीं दुष्कर्म करून संकटांत पडला असतां " हासत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं " ह्या गीत्यर्धानें त्याच्या स्थितीचें वर्णन

करण्यांत येतें. " ब्राम्हण कणसा खुपतो, " ह्या मोरोपंती म्हणीची सत्यता पटविणारीं उदाहरणें शेकड्यांवारी गोळा करतां येतील. मोरोपंताच्या कवितेंतील पुष्कळ तुकडे म्हणींचा मान पावलेले आहेत, त्यांपैकीं कांहींचा आम्ही येथें निर्देश करतों: —

(१) जरि उकिरड्यांत पडला मळला न हिरा तथापि सामान्य.
(२) युक्तीनें स्वपरविहित हित करितां कपटदोष कंचा या ?
(३) न करील कां पित्याची दुर्गतिची माउली सुरा माती ?
(४) जों मृदु लागे तों तों शिशु दडपी फार ऊन भातातें.
(५) फारचि बरी निरयगति, परवशता शतगुणें करी जाच.
(६) पूजा कैची लोकीं जर दगड शिरीं धरी न शेंदूर ?

मोरोपंत कवि मरण पावल्याला केवळ सवाशेंच वर्षें झालेलीं असल्याकारणानें, आणि त्याची कविता केवळ सुशिक्षितांच्याच वाचनांत येण्याजोगी असल्याकारणानें त्याच्या कवितेंतील म्हणींसारखे योजण्यांत येत असलेले तुकडे त्याच्या ग्रंथविस्ताराच्या मानानें फारच थोडे आहेत हें कबूल केलें पाहिजे. तरी कांहीं पद्यें, कांहीं चरण, कांहीं चरणखंड,—जे आज सुभाषितांप्रमाणें विद्वांनांच्या तोंडीं बसले आहेत ते,--कालेंकरून म्हणींच्या मानास पोहोचतील ह्यांत संशय नाहीं.

अर्वाचीन कवितेंतील चुटके देखील म्हणींचा मान पावलेले असे आपल्याला आढळतात.

कैलासवासी आण्णा किर्लोस्कर यांच्या संगीत शाकुंतलांतील " जातीच्या सुंदराला कांहींही चालतें, " " परवशता तिखट सुरी, " वगैरे चुटक्यांचा म्हणीच्या मंदिरांत प्रवेश झाला आहे.

मराठी भाषेंत गद्य ग्रंथ अगदींच थोडे व जे झाले आहेत ते आलीकडच्या काळींच झालेले आहेत, तेणेंकरून त्यांतून म्हणींच्या योग्यतेस पावलेले असे चुटके प्रायः नाहींत म्हटलें तरी चालेल. परंतु पद्यात्मक ग्रंथांचा भरणा पुष्कळ असल्यामुळें काव्यांतील वचनें म्हणींची योग्यता पावलेलीं अशीं शेंकडों सांपडतील. आणि सर्व कवींपेक्षां तुकारामाच्या काव्यांत अधिक सांपडतील. आमच्या वाचकांपैकीं जे कोणी शोधक असतील त्यांनीं जर ह्या कवीची गाथा वाचली तर संसारांत हरएक प्रसंगीं

म्हणींप्रमाणें वापरलीं जाणारीं वचनें किती आढळतात हें पाहून त्यांना आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

२

ज्या अर्थी म्हणी एव्हर्वीच्या घडामोडींत उपयोगीं पडतील अशा असतात, ज्या अर्थी त्या जनास मान्य असतात, आणि ज्या अर्थी सुशिक्षित व अशिक्षित, तरुण व वृद्ध, पुरुष व स्त्रिया, वगैरे सर्व जनतेच्या तोंडीं त्या असतात, त्या अर्थी आपणांस असें अनुमान करितां येईल कीं, त्या लोकांसंबंधीं हरएक प्रकारची माहिती आपणांस म्हणींत सांपडली पाहिजे. म्हणजे त्यांच्या चालीरीती, त्यांचे रीतिरिवाज, त्यांची नीति, तशींच त्यांचीं मतें, त्यांचे खरेखोटे समज, त्यांची मानलेली या संसारासंबंधीं कर्तव्यता, वगैरे संबंधाची माहिती इत्यादि त्या देशच्या म्हणींत सांपडली पाहिजे असें अनुमान केलें तर तें चुकीचें होणार नाहीं. म्हणींमध्यें देशाचें समग्र स्वरूप प्रतिबिंबित झालेलें असतें. आपण जर अनेक देशांच्या म्हणी घेतल्या, तर त्यांवरून वरील सिद्धांताची सत्यता कळून येईल. प्रसिद्ध इंग्रजी तत्त्ववेत्ता बेकन यानें म्हटलें आहे, "The genius, wit and the spirit of a nation are discovered in its proverbs."

आर्चबिशप ट्रेंचनें आपल्या म्हणींवरील ग्रंथांत अनेक देशांच्या म्हणी घेऊन त्यांवरून तेथील लोकांसंबंधीं जें ज्ञान मिळतें तें इतिहास व प्रत्यक्ष प्रमाणें ह्यांवरून खरें आहे असें दाखविलें आहे.

ट्रेंच म्हणतो:— "I am convinced that we may learn from proverbs current among a people what is nearest and dearest to their hearts, the aspects under which they contemplate life, in what ways honour and dishonour are distributed among them, what is of good and what of evil report in their eyes, with very much more which it can never be unprofitable to learn.".

प्राचीन ग्रीक लोकांच्या म्हणींवरून त्यांचें मोठमोठ्या कवींच्या ग्रंथांशीं परिशीलन, स्वदेशाच्या इतिहासांत प्रवीणता, तसेंच देवादिकांच्या कथांची

आहिती, सारांश, वरिष्ठ प्रतीच्या शिक्षणाचा सार्वत्रिक फैलाव, हीं त्यांच्यांत होतीं असें अनुमान ऐतिहासिक वगैरे प्रमाणांवरून यथार्थ आहे, हें उघड आहे. रोमन लोकांच्या म्हणींवरून त्यांची शेतकीची आवड वगैरे गुण व्यक्त होतात. स्पानिश भाषेंतील म्हणींवरून त्या लोकांचा पोक्तपणा, सत्यप्रीति, स्वतंत्रतेची चाड, अभिमान, वगैरे गुण व्यक्त होतात, आणि अवांतर प्रमाणांवरून आपणास विदितच आहे कीं हे सर्व गुण स्पानिश लोकांत भरलेले आहेत. इतालियन लोकांची सूड घेण्याची अनिवार इच्छा, आपलपोटेपणा, वगैरे गुण त्यांच्या म्हणींवरून प्रकट होतात, आणि ते इतर प्रमाणांवरून सिद्ध करून दाखवितां येतात. परंतु आपणांस ग्रीक, ल्याटिन, स्पानिश, इटालियन, ह्या भाषा अवगत नाहींत त्या अर्थी त्या भाषेंतील म्हणींवरून प्रकट झालेले गुण त्या त्या लोकांच्या इतिहासादिकांवरून सिद्ध झालेल्या गुणांशीं कितपत पटतात हें समजण्यास मार्ग नाहीं, व एकाद्या देशाच्या म्हणींवरून तेथील लोकांचें समग्र स्वरूप प्रकट होतें हें सिद्ध करण्याचें साधन नाहीं, यास उपाय नाहीं; पण आपणांस इंग्रजी भाषा अवगत आहे. त्या देशाच्या लोकांचे गुण, त्यांचा स्वभाव, त्यांच्या चालीरीति, त्यांची नीति, त्यांची परराष्ट्रांशीं वागण्याची तऱ्हा, वगैरे त्यांचे हरएक चांगले वाईट गुण आपणांस ईश्वरी नियमानें जाणण्याचा प्रसंग आला आहे. तर हे गुण त्यांच्या म्हणींवरून कितपत प्रकट होतात हें पाहण्याचें साधन आपणांपाशीं आहे; परंतु त्या साधनाचा उपयोग करूं गेल्यास आपली निराशा होईल. इंग्रजी म्हणींचीं पानें चाळूं गेल्यास आपणांस त्यांच्या अंगीं असलेल्या एकाही गुणाचा प्रादुर्भाव दिसत नाहीं. ट्रेंचनें वर निर्दिष्ट केलेल्या पुस्तकांत म्हटलें आहे.—

"English proverbs in like manaer [i. e. like German proverbs] have so many excellencies without having any one excellence which is greatly predominent, that in their case also it is difficult to seize upon any features which more than any other are peculiarly their own."

असो. तर एकंदरींत इंग्रजी म्हणींसंबंधानें आपली निराशा होते; परंतु यावरून वर जो आम्हीं नियम सांगितला कीं, म्हणींवरून राष्ट्राच्या अंत:स्व-

रूपाचे ज्ञान होतें, त्या नियमास कांहीं बाध येत नाहीं. इंग्रजी म्हणी केवळ अपवादरूप समजल्या पाहिजेत.

येथवर परभाषेंतील म्हणींसंबंधानें विस्तार झाला. आतां आपण खुद्द आपल्या मराठी म्हणींकडे वळूं. पण आधीं आम्हीं प्रांजलपणें वाचकांस सांगून ठेवितों कीं, मराठी म्हणींकडे आजपर्यंत कोणीही लक्ष्य दिलें नाहीं, आणि कोणत्याही पुस्तकांत त्या संबंधानें उहापोह झालेला नाहीं. तेणेंकरून आम्हीं पुढें जें विवेचन करणार आहों, त्यामध्यें अनेक दोष व अनेक न्यूनें असण्याचा संभव आहे. आम्हीं जीं अनुमानें काढूं, तीं कदाचित् चुकीचीं असतील, किंवा अपुरतीं असतील, अगर ज्यांच्यापासून महत्त्वाचे शोध,—निदान शोधांचा मार्ग,—दाखविणारी विचारसरणी, हीं काढतां येतील, अशा म्हणी कदाचित् नजर चुकीनें अथवा आमच्या अकुशलतेनें राहून गेल्या असतील तर त्याजबद्दल आमचे वाचक आम्हांला फारसा दोष देणार नाहींत, अशी आशा आहे. पण अशा प्रकारच्या चुका किंवा कमतरता जर त्यांस आढळल्या, तर त्यांनीं आपलें मत कोणत्या तरी रीतीनें आम्हांला कळविण्याची मेहरबानगी केली तर त्याचा आम्हांकडून अवश्य विचार केला जाईल.

म्हणींच्या संख्येच्याच संबंधानें जर पाहिलें तर आपणांस हें कबूल केलें पाहिजे कीं, आपली पायरी पुष्कळ खालीं येईल.* कारण, आपल्या म्हणी फार थोड्या आहे, आणि ह्याचीं आम्हांस तीन कारणें वाटतात, आणि ह्या तिन्ही कारणांचा उगम हा कीं आपल्या जुन्या शास्त्री व पंडित लोकांचें गीर्वाणवाणीवरचें प्रेम होय. ह्या प्रेमाच्या योगानें आपल्या जुन्या विद्वानांचें मराठी भाषेकडे जितकें लक्ष्य लागावें तितकें लागत नसे. ह्या लोकांचें अध्ययन सदासर्वदा संस्कृतग्रंथविषयक असे. सारें ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचें तें संस्कृतभाषेच्याच द्वारानें केलें जात असे, व देशी भाषेंत नानाविध ग्रंथ तयार करून साधारण लोकांस सुलभ रीतीनें ज्ञान देण्याची खटपट हीं त्यांनीं

*स्पानिश भाषेंत सुमारें ३०,००० म्हणी आहेत. जर्मन भाषेंत सुमारें एक लक्ष आहेत. ह्या संख्येपुढें मराठी म्हणींची संख्या कांहींच नाहीं असें म्हणावें लागतें. कारण मराठी म्हणींची संख्या आमच्या अ|जमासें सुमारें ५०००च्या आंतच असावी !

केली नाहीं, तेणेंकरून मराठी वाङ्मयाची अगदीं अनास्था झाली. तेव्हां साधारण लोक अज्ञानावस्थेंत असल्यामुळें अर्थातच त्या दशेला पुरण्याइतकाच म्हणींचा सांठा त्यांच्याजवळ होता, अधिक नव्हता.

संस्कृत भाषेविषयीं आपल्या जुन्या शास्त्री लोकांची जी आवड तिच्यापासून आणखी एक परिणाम घडला, त्यामुळें तर मराठी म्हणींच्या उत्पत्तीचें जें बीज त्यालाच कोठें थारा नाहींसा झाला. तेव्हां अर्थातच मराठी म्हणींची उत्पत्ति खुंटली; आणि आम्हांला तर असें वाटतें कीं, उत्पन्न झालेल्या पुष्कळ म्हणींस प्रचारोदक न मिळून त्या मरून गेल्या असाव्या. आतां हें इतकें म्हणींस घातक कारण कोणचें ह्मटलें, तर संस्कृत भाषेंतील सुभाषित श्लोक होत. आम्हांस तर असें वाटतें कीं, आपल्या संस्कृत भाषेंतील सुभाषितसंग्रह जितका पूर्ण, जितका प्रगल्भ, जितका संपन्न व अमोलिक ज्ञानानें जणों काय उचंबळणारा असून पुन्हां स्वल्प शब्दात्मक आहे, तितका साऱ्या जगांतील कोणत्याही भाषेंत नसेल. त्यास हजारों वर्षांपूर्वीच्या दण्डकारण्याची उपमा दिली तर चांगली साजेल. असो. कोणत्याही विषयावर संभाषण चाललें असलें व कोणतीही अडचण आली असली तरी त्या त्या प्रसंगास अनुरूप अशा शेकडों सुभाषितरूप चुटक्यांचा उपयोग करतां येण्याजोगा असतो. असें जर संस्कृतभाषेंतील सुभाषित श्लोकांचें अरण्य आहे, तर त्यांच्या सावटास मराठी म्हणींचीं रोपडीं रुजलीं नाहींत किंवा रुजलीं तरी पिकुटलेलीं झालीं ह्यांत आश्चर्य काय ?

जुन्या लोकांचें संस्कृत भाषेवर अतिशय प्रेम असल्यामुळें त्याचा परिणाम म्हणींस आणखी एका प्रकारानें घातक झाला. विद्वान लोकांत संस्कृत न्यायांचें बरेंच माहात्म्य असे. येथवर आम्हीं संस्कृत न्यायांविषयीं कांहींच उल्लेख केला नाहीं हें पाहून आमच्या कित्येक गीर्वाणवाणीभक्तांस आश्चर्य वाटलें असेल. परंतु हा मराठी ह्मणींवर निबंध असल्यामुळें न्यायांसंबंधानें लिहिण्यास फारसा अवकाश नव्हता. असो. आमच्या निवळ मराठी वाचकांस न्याय म्हणजे काय हें सांगितलें पाहिजे. न्याय हे संस्कृतांतील म्हणी किंवा सांप्रदायिक वाक्यें होत. ह्या न्यायांची घटना अशी असते कीं, त्यांच्या मध्यें बहुधा महत्वाच्या शब्दांचाच समावेश झालेला असतो. उदाहरणार्थ ' सूचीकटाहन्याय, ' ' काकतालीय न्याय ' ' प्रधानमल्लनिबर्हण

न्याय, ' घुणाक्षर न्याय, ' कुम्भीपाकनरकन्याय इ० इ०, ह्यांपैकीं चार पांच न्यायांचा संस्कृतानभिज्ञ लोकांसाठीं उलगडा करितों.

पहिल्यानें "सूचीकटाहन्याय" घेऊं. ' सूची ' म्हणजे सूई व ' कटाह ' म्हणजे कढई. लोहाराकडे कोणी कढई करून घेण्यासाठीं जरी आधीं आलेला असला आणि त्याच्या मागून एखादा कोणी सूई करून घेण्यासाठीं आलेला असला, तरी कढईवाल्याचा प्राथमिकत्वाचा हक्क बुडवून आधीं सूईवाल्याचें तें लहानसें काम करून देऊन त्याला वाटेला लावून नंतर कढईवाल्याचें मोठें काम करावयास घेणें हें अधिक प्रशस्त आहे. इतका विपुल अर्थ दोन मुख्य शब्द सूची व कटाह हे घेऊन सूचीकटाहन्याय ह्या द्विशब्दात्मक न्यायांत आणला आहे. आतां हें येथें सांगावयास नकोच कीं, ' सूची ' व 'कटाह' हे उपजातिवाचक शब्द जातिवाचक शब्दांच्या ऐवजीं घातले आहेत; आणि त्यांचा अर्थ लहान काम व मोठें काम असा घ्यावयाचा. वरील उपपादनावरून ह्या न्यायाचा उपयोग कसा करावयाचा हें आमच्या वाचकांच्या ध्यानांत येईलच.

दंडापूपन्याय—दंड ह्म० दिंडें आणि अपूप म्ह० करंज्या. हीं दोन्ही खाद्यें एकेठिकाणींच ठेविलेलीं असलीं, आणि जर कोणी माणूस मांजरानें दिंडें खाल्लीं असें म्हणाला, तर त्या मांजरानें करंज्या खाल्ल्या किंवा नाहीं हें विचारण्याची आवश्यकता नसते. कारण, जें मांजर दिंडें खाईल तें करंज्या खाणारच. जेव्हां दोन वस्तूंचें सातातिक साहचर्य असतें, तेव्हां एकाला जी स्थिति प्राप्त झाली, ती दुसऱ्यालाही प्राप्त झाली असलीच पाहिजे असें अनुमान सहज निघतें. काशा आणि गोंद्या हे राममाळ्याच्या बागेंत आंबे चोरण्यासाठीं गेले होते. राममाळ्यानें काशाला पाहून तंबी भरली असें कोणी एकाद्या माणसास सांगितलें, तर गोंद्यालाही तंबी भरली असलीच पाहिजे अशी ऐकणारा दंडापूपन्यायानें अटकळ करतो.

तुषकंडन न्याय—तुष म्हणजे तूस, धान्याचें कवच, कंडण म्ह० कांडणें, सडणें. धान्याचें तूस किं० कोंडा सडणें हें निष्फळ आणि निरुपयोगी काम होय. एकाद्या निरुपयोगी विषयाची वाटाघाट करण्याची थट्टा उडवावयाची असतां तुषकंडन न्यायाचा उपयोग करतात. उ० हे दोघेही लुच्चे; यांत खरी बाजू कोणाची आणि खोटी कोणाची ह्याचा निर्णय करीत बसणें हें

तुषकंडनन्यायानें निष्फळ होय. ह्या न्यायाला जाब देणारा मराठी संप्रदाय काथ्याकूट करणें हा आहे.

कदंबकोरक न्याय—कदंबाच्या झाडावर फुलांच्या कळ्यांचा एकदम उद्भव होतो, म्हणजे अमुक कळी अगोदर उद्भवली व अमुक तिच्या मागून उद्भवली असें ठरवितां येत नाहीं. त्याप्रमाणें अनेक भिन्न भिन्न माणसांनीं स्वयंप्रेरणेनें कांहीं एक काम एकसमयावच्छेदेंकरून केलें असलें, तर तें करण्याचें श्रेय कोणत्याही विशिष्ट व्यक्तीकडे देतां येत नाहीं. त्या प्रसंगीं कदंबकोरक न्यायानें श्रेय सर्वांकडे सारखें आहे असें म्हणतात.

काकतालीयन्याय—अगदीं अकल्पित रीतीनें किंवा यदृच्छेनें घडून आलेल्या गोष्टीसंबंधानें हा न्याय योजला जातो. जेव्हां एकादी शुभ किंवा अशुभ गोष्ट, इष्ट किंवा अनिष्ट गोष्ट, आपल्या किंवा दुसऱ्या कोणाच्या प्रयत्नाशिवाय अकस्मात् घडून येते, तेव्हां ती गोष्ट काकतालीयन्यायानें घडली असें म्हणतात. जर एकाद्या ताडाच्या झाडाच्या फांदीवर कोणी कावळा बसावयास आला, आणि जर त्याच समयीं ती फांदी मोडली, किंवा एकादा ताडगोळा कावळ्याच्या डोक्यावर पडला, तर तें फांदीचें मोडणें किंवा ताडगोळ्याचें पडणें ह्या क्रियेचा कावळ्याच्या बसण्याच्या क्रियेशीं कार्यकारणभावादिक कोणत्याही प्रकारचा संबंध नसतो. मोडणें किंवा पडणें आणि बसणें, ह्या क्रिया एका समयीं घडल्या इतकेंच काय तें आपणांस म्हणतां येईल. परंतु त्यांच्यांत कोणत्याही प्रकारें संबंध जोडून देतां यावयाचा नाहीं. येथें " काक " म्हणजे कावळा आणि "तालीय" म्हणजे ताडाची फांदी किंवा ताडाचें फळ, ह्या दोन प्रधान शब्दांनीं हा न्याय झाला आहे. त्याचा उपयोग आपण पुढील सारख्या प्रसंगीं करतों.

" अहो, तो रोगी बरा झाला तो तुमच्या औषधानें नाहीं कांहीं! त्याच्या रोगाला आधींपासूनच उतार पडत चालला होता. इतक्यांत तुम्हीं औषध देऊं लागला, तों " काकातालीय " न्यायानें गुण आला इतकेंच; तुमच्या औषधामुळें थोडकाच गुण आला! " अशा रीतीनें या न्यायाचा उपयोग होतो. येथें सुद्धां " काक " व " तालीय " हे उपजातिवाचक शब्द जातिवाचक शब्दांबद्दल योजलेले आहेत.

ह्या वरील ऊहापोहावरून संस्कृत न्यायांचें स्वरूप आमच्या वाचकांस

कळलेंच असेल. मराठीमध्यें म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें किंवा वाक्यखंड वगैरेंचा जसा उपयोग होतो, तसा संस्कृतांत या न्यायांचा होतो. ह्या न्यायांची संस्कृतांत रेलचेल आहे. ह्यामुळें हे आयते न्याय सोडून नवीन म्हणी तयार करण्याची कल्पना कोणाच्या मनांत येणार? सुभाषित श्लोक जसे म्हणींस विघातक झाले, तसेच हे न्याय सुद्धां झाले असें आम्हास वाटतें.

ह्या न्यायांच्या संबंधानें दुसरा एक विचार मनांत योण्याजोगा आहे तो आमच्या वाचकांस मान्य होईल किंवा नाहीं ह्याविषयीं आह्मांस शंका आहे. संस्कृत न्यायांमुळें म्हणींची खरोखर कांहीं हानि झाली आहे काय ? ज्याप्रमाणें आपण संस्कृत शब्द ते सारे आपलेच असें समजून संस्कृत शब्दांचा मराठींत पाहिजे तेथें उपयोग करितों, त्याप्रमाणें जे संस्कृत न्याय, तेही आपलेच असें समजून आपण संभाषणांत व ग्रंथांत वेळाशक त्यांचा उपयोग करितो; असें जर आहे तर संस्कृत न्याय,—निदान जे हरघडीस भाषणांत व ग्रंथांत येतात,—त्यांस मराठी ह्मणींच्या वर्गांत ओढल्यास फारसा बाध येईल असें आम्हांस वाटत नाहीं. आतां हें तर उघडच आहे कीं, मराठी ह्मणींचें जे सामान्यतः रूप आढळतें, त्यापेक्षां न्यायांचें रूप पुष्कळ भिन्न असतें. "शितावरून भाताची परिक्षा होते" व "स्थालीपुलाक न्याक" ह्या दोन्हींचें रूप भिन्न आहे, तथापि तीं दोन्ही एकाच मातेची आणि पित्याची लेंकरें असल्यामुळें त्यांच्यांत सख्या भावंडांचें नातें स्पष्टच आहे. तर संस्कृत न्यायांचा मराठी ह्मणींमध्यें समावेश करणें फारसें अप्रशस्त होईल असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि ह्याचा निकाल करणें आह्मी वाचकांवरच सोंपवितों.

संस्कृतांतील सुभाषित श्लोक आणि न्याय, ह्या दोहोंच्या योगानें मराठी म्हणींच्या वाढीला कसा अडथळा झाला हें येथवर सांगण्यांत थोडेंसें विषयान्तर झालें. असो. आतां मराठी म्हणींवरून आपणा मराठ्यांच्या चालींरीती वगैरेसंबंधानें काय माहिती मिळते हें पाहूं.

मराठी ह्मणींवरून आपल्या लोकांचा एक विशेष आहे तो कोणाच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं. तो कोणता ह्मटला तर आपला शांत स्वभाव. शांततेचा अगदीं कनिष्ठ प्रकार आलस्य होय, व अगदीं वरिष्ठ प्रकार

म्हटला म्हणजे प्राप्तसहिष्णुता.* ह्या दोन स्थितींच्या मधील सर्व प्रकारची शांतता मराठी म्हणींत दृष्टीस पडते, असें आम्हांस वाटतें.

आहे त्यांत संतुष्ट रहावें, धोक्याचें काम करूं नये, अशाश्वताचे साठीं शाश्वत गमावून घेऊं नये, पारिपत्य करण्यापेक्षां क्षमा करणें अधिक श्रेयस्कर होय, नीच्याच्या निग्रहणापेक्षां त्याची संगतच न करणें हें अधिक इष्ट, प्रसंग पडला असतां चरफडून उपयोग नाहीं, दैवाच्या पुढें कोणाचा उपाय नाहीं, वगैरे शेंकडों प्रकारें करून साक्षात् किंवा परंपरेनें शांततेची प्रशंसा ज्यांत केली आहे, अशा म्हणी मराठींत पुष्कळ आहेत. त्या इतक्या कीं, कोणत्याही सरसकट दहा पंधरा म्हणी जर आपण घेतल्या, तर त्यांत एक दोन तरी अशा अर्थाच्या म्हणी सांपडतील असें आम्हीं खात्रीपूर्वक म्हणतों. "क्षमेसारखें भूषण नाहीं," "साप्या पुढें जाववतें पण दैवापुढें कोण जाणार?" "सुखाचा जीव दुःखांत घालूं नयें," "सदा मरे त्यास कोण रडे?" वगैरे शांतता उपदेशिणाऱ्या म्हणी पाहिजे तितक्या देतां येतील. ही शांति एका प्रकारानें जरी इष्ट असली, तरी ती असावी त्याचेपेक्षां आपणांत अधिक आहे, आणि आजपर्यंत आपणांवर जीं अगणित संकटें आलीं आहेत, त्यांपैकीं बहुतेक या गुणामुळें आलीं आहेत, असें आम्हांस वाटतें. ही शांतवृत्ति आपल्या धर्मामुळें आपणांत आलेली असो, किंवा आपल्या आहारामुळें आलेली असो, किंवा देशाच्या हवेमुळें आलेली असो, कोणत्याही कारणानें आलेली असो, त्याचा विचार येथें कर्तव्य नाहीं. पण जोंपर्यंत ही शांतता आपणांत आहे, तोंपर्यंत हल्लीं ज्या अर्थाची उन्नति पाश्चात्य राष्ट्रांचें ठायीं आहे असें आपण म्हणतों व ज्या अर्थाची उन्नति आज आपणांस इष्ट आहे, त्या अर्थाची उन्नति आपणास कधींही प्राप्त व्हावयाची नाहीं. जर आपली उन्नति सकस व वर्धिष्णु अशी असावी अशी आपली इच्छा आहे, तर ही शांतता उर्फ आळस, उत्साहशून्यता, सुखिंमन्यता, क्षमाशीलता, वगैरे, यांची आपण रजा घेतली पाहिजे, आणि जोंपर्यंत आपण असें करणार नाहीं, तोंपर्यंत आपलें नष्टचर्य जाण्याची कांहीं आशा नाहीं. जरी आपल्या लोकांनीं शांत-

---

*हा नवा शब्द आम्ही तयार करुन इंग्रजी "Resignation" ह्या अर्थीं योजला आहे. कोणास आमच्या शब्दापेक्षां अधिक चांगला शब्द सुचला तर मेहेरबानीनें ते तो कळवितील अशी आशा आहे.

तावृत्ति टाकून देऊन प्रखरवृत्ति धारण केल्याचीं शेंकडों उदाहरणें आहेत, तरी तीं केवळ तत्कालीन विवक्षित उपाधींचीं कार्यें होत; नैसर्गिक नव्हत. हें उघडच आहे कीं,

> उष्णत्वमग्न्याहितसंप्रयोगात्
> शैत्यं हि यत्सा प्रकृतिर्जलस्य ।

परंतु आपणांस निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. पृथ्वीच्या गर्भांत गंधक वगैरे जे उष्ण पदार्थ असतात, त्याच्या संयोगानें पाण्याचे निरंतर वाहणारे उष्ण झरे नसतात काय? असो.

येथवर बरेंच विषयांतर झालें. आतां मुख्य विषयाकडे वळूं. वर आम्हीं म्हटलें कीं, पुष्कळ म्हणी अशा आहेत त्यांवरून आपल्या लोकांची शांतवृत्ति दिसून येते. पण याचेवर एक आक्षेप येण्याजोगा आहे. तो हा, कीं कांहीं म्हणी जशा शांतताप्रतिपादक आहेत, तशा कांहीं म्हणी उलट गुण म्हणजे उत्साह, साहस, प्रयत्न, वगैरे यांचा उपदेश करणाऱ्या नाहींत काय? आणि जर आहेत तर हिंदु लोक शांतवृत्तिचेच होत, व तापटवृत्तीचे नव्हत, असें कसें म्हणतां येईल? असा जर कोणी आक्षेप काढला तर तो गैरवाजवी आहे असें म्हणतां येणार नाहीं. बहुतेक सर्व म्हणींच्या संबंधानें उलट अर्थाच्या म्हणींच्या संबंधाचा आक्षेप येण्याजोगा आहे. म्हणून या गोष्टीविषयीं सामान्यत्वानेंच प्रथम विचार करूं. ज्या अर्थीं मनुष्याच्या मनोव्यापारांत व विचारसरणींत वैचित्र्य दृष्टीस पडतें, त्या अर्थीं म्हणींमध्यें सुद्धां वैचित्र्य असणारच. जगाच्या कोणत्याही भाषेंतील म्हणी घेतल्या, तरी एका अर्थाच्या म्हणींच्या उलट अर्थाच्या म्हणी सांपडणार नाहींत असें प्रायः व्हावयाचें नाहीं. शांततेच्या उलट मराठींतही पुष्कळ म्हणी आहेत. कांहीं कांहीं तर फारच उत्तम आहेत. उदाहरण "उद्योगाच्या घरीं ऋद्धि सिद्धि पाणी भरी," "यत्न जोडी, आळस मोडी," "अरे तर कां रे, अहो तर कांहो," "जशास तसें," "शठं प्रति शाठ्यं आणि लठं प्रति लाठ्यं," इ०. तर अशा प्रसंगीं निर्णय करितांना आपणांस कोणत्या बाजूकडे म्हणींचें प्राधान्य आहे, याचा विचार केला पाहिजे, आणि ज्या बाजूस अधिक म्हणी असतील त्या बाजूच्या तर्फे निकाल केला पाहिजे. प्रस्तुत गुणाच्या संबंधानें आपण निर्णय करूं गेलों तर शांततेच्या बाजूचाच करावा लागेल.

मराठी म्हणींचा संग्रह जर आपण एकाद्या परकीयाच्या,--म्हणजे ज्यास आपल्या चालीरीती वगैरे कांहीं माहित नाहींत,--त्याच्या हातीं दिला, तर तो हें बिनधोक अनुमान काढील, कीं आपल्या लोकांची शेतकीवर आवड फार आहे, आणि हें अनुमान यथार्थ होईल हें आमच्या वाचकांस सांगावयास नकोच. कारण, एक तर शेतकीची योग्यता इतर सर्व धंद्यांपेक्षां आपण अधिक मानतों, ह्याचा पुरावा प्रत्यक्ष एका म्हणींत सांपडतों. ती म्हण "उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ चाकरी." येथें इतर धंद्यांत शेतकीची पायरी सर्वांत वरची लागली आहे; आणि दुसरें असें कीं, शेतीसंबंधीं जितक्या म्हणी मराठींत भाषेंत आहेत तितक्या दुसऱ्या कोणत्याही धंद्या-संबंधीं नाहींत. त्यांपैकीं कांहीं पुढें नमूद करतों. "पेरलेलें उगवतें," "चिखचळें शेतचें, थोटें पांगुळ पोटचें," "खपेल त्याचें शेत, मारील त्याची तरवार" इ०.

जर कोणी मनुष्य शेतीसंबंधीं म्हणी शोधील तर त्यास पुष्कळच सांपडतील अशी आमची खात्री आहे. वर उपन्यस्त सिद्धांताच्या प्रत्यय-नार्थ आणखीं कांहीं म्हणी देतों:--"पडतील चित्रा, तर भात न खाय कुत्रा," "मृगाची लावणी, हस्ताची उगवणी," "पडतील स्वाती तर पिक-तील माणीक मोतीं," "पडेल हस्त, तर पिकेल मस्त," "कोसळेल हत्ती तर पडतील भिंती," इ० इ० इ० (परिशिष्ट पहा).

ह्या शिवाय मराठी म्हणींवरून दुसरीं पुष्कळ बारीकसारीक अनुमानें काढितां येतील. तीं वर निर्दिष्ट केलेल्या पद्धतीनें वाचकांनीं काढावीं.

प्रकरण ५ वें.

म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें.

म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें ह्या दोहोंचीं स्वरूपें कशीं असतात, आणि त्या दोहोंत फरक काय आहे, ह्या विषयाकडे आजपर्यंत कोणाही

पाश्चात्य अथवा पौरस्त्य पण्डितांचें लक्ष्य गेलेलें नाहीं, ही मोठी आश्चर्याची गोष्ट होय असें आम्हाला वाटतें.

आमच्या मतें म्हणी हीं भिन्न जातीचीं वाक्यें होत, आणि सांप्रदायिक वाक्यें हीं त्यांचेहून भिन्न जातीचीं वाक्यें होत. परंतु म्हणींचे संग्रह जे इंग्रज ग्रंथकारांनीं केलेले आहेत, त्या संग्रहांत त्यांनीं म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें ह्यांची गल्लत केली आहे, इतकेंच नव्हे, तर त्या संग्रहांत त्यांनीं सांप्रदायिक वाक्यखंडांचाही समावेश केलेला आहे. ते आणखीही एक पाऊल पुढें गेलेले आहेत; कारण, त्या संग्रहांच्या पुस्तकांत त्यांनीं सांप्रदायिक शब्दही घुसडून दिले आहेत. ह्या इंग्रज ग्रंथकारांपैकीं कांहींनीं म्हणींची व्याख्या करण्याचें काम टाळलें आहे, कांहींनीं कशीबशी व्याख्या दिलेली असली, तरी त्यांनीं म्हणींचीं म्हणून जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांपैकीं कांहींना त्यांनीं केलेली व्याख्या लागू पडत नाहीं, आणि कांहीं उदाहरणें हीं शुद्ध सांप्रदायिक वाक्यें आहेत, आणि कांहीं उदाहरणें तर केवळ सांप्रदायिक शब्द किंवा सामासिक शब्द किंवा केवळ समस्तकल्प शब्द आहेत! ह्या इंग्रज ग्रंथकारांनीं ह्या विषयाची एक चमत्कारिक खिचडी करून टाकली आहे!

जी गोष्ट इंग्रजींतील ह्या विषयावर लिहणारांना लागू आहे, तीच गोष्ट ह्या विषयावर लिहिणाऱ्या मराठी ग्रंथकारांना, अथवा म्हणींचे संग्रह करणाऱ्या लोकांनाही लागू आहे. ह्या विषयाची ज्याला शुद्ध आणि शास्त्रसंमत कल्पना आलेली आहे, असा कोणी इंग्रजी किंवा मराठी ग्रंथकार आमच्या पाहण्यांत आलेला नाहीं.

आम्ही ह्या इंग्रजी आणि मराठी ग्रंथकारांसंबंधानें जें म्हटलें आहे, तें उदाहरणांनीं स्थापित करण्याच्या खटाटोपाला न लागतां आम्ही एकदम म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें ह्यांच्या संबंधानें आमचें स्वताचें जें म्हणणें आहे तें वांचकांना सादर करतों.

म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें दिसण्यांत अगदीं सारखीं असतात. त्यांच्याशीं सांप्रदायिक वाक्यखंड, किंवा सांप्रदायिक किंवा समस्तकल्प शब्द, ह्यांचा कांहीं घोटाळा होण्याची शक्यता नसते. परंतु म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें हीं दिसण्यांत आणि घटनेंत सारखीं असल्याकारणानें त्यांच्यांत

मात्र घोटाळा होण्याचा संभव असतो, आणि कांहीं वाक्यें तर अशीं असतात कीं त्यांना म्हण म्हणावें कीं सांप्रदायिक वाक्य म्हणावें हें ठरविणें भारी कठिण असतें. ज्या वाक्याला एक माणूस म्हण ही संज्ञा लावील, त्याला दुसरा माणूस सांप्रदायिक वाक्य म्हणेल. तसेंच म्हण ह्या वाक्यांत थोडासा फेरफार करून त्याला सांप्रदायिक वाक्य बनवितां येतें, आणि सांप्रदायिक वाक्यांत थोडासा फेरबदल करून त्याचा म्हणीप्रमाणें उपयोग करून घेतां येतो.

म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें हीं पूर्ण वाक्यांच्या रूपांत असतात. सांप्रदायिक वाक्यखंड, किंवा सांप्रदायिक शब्द, किंवा समस्तकल्प शब्द, हे वाक्यांच्या रूपांत नसतात. त्यामुळें म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें ह्यांचा ह्या दुसऱ्या प्रकारच्या वस्तूंशीं कांहीं घोटाळा होण्याचें कांहीं कारण नाहीं. घोटाळा जो होणें शक्य आहे, तो म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें, ह्यांच्यांतच होणें शक्य आहे; कारण, तीं दोन्हीं वाक्यरूप असतात.

म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें, हीं व्याकरणदृष्ट्या पूर्ण वाक्यें असतात; म्हणजे असें कीं कर्ता, कर्म, क्रियापद, वगैरे जीं वाक्याचीं अंगें म्हणून ह्मटलेलीं असतात, त्या अंगांनीं म्हणी उपलक्षित असाव्या लागतात, तशींच सांप्रदायिक वाक्यें त्या अंगांनीं उपलक्षित असावीं लागतात. व्याकरणकारांनीं जीं अंगें अध्याहृत घेतां येतात असें मानलें आहे, तीं अंगें अध्याहृत घेतां येतात. अर्थात् हे अध्याहृत म्हणून घ्यावयाचे जे शब्द ते यथास्थानीं भरले असतां म्हण किंवा सांप्रदायिक वाक्य सर्व अंगांनीं युक्त असें वाक्य झालें पाहिजे. ह्या व्याख्येप्रमाणें अकलेचा खंदक, उंटावरचा शाहाणा, अक्काबाईचा फेरा, अडणीवरचा शंख, आकाशाची कुऱ्हाड, अठरा धान्याचें कडबोळें, एरंडाचें गुऱ्हाळ, कपिलाषष्ठीचा योग, करनकरीचा वसा, कळसूत्री बाहुलें, कुऱ्हाडीचा दांडा, इत्यादिकांना म्हण किंवा सांप्रदायिक वाक्य ही संज्ञा देतां यावयाची नाहीं.

त्याच कारणांसाठीं चावून चिकट आणि ओढून बळकट, कागदी घोडे नाचविणें, खायाला काळ आणि धरणीला भार, गव्हाची कणीक करणें, डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच, साळ्याची गाय आणि माळ्याचें वासरूं, समुद्रांत जाऊन कोरडा, वगैरेंना म्हण किंवा सांप्रदायिक वाक्य ही संज्ञा

लावतां यावयाची नाहीं. कारण, त्यांत वाक्याचीं सर्व अंगें उपस्थित नाहींत.

ह्मणी आणि सांप्रदायिक वाक्यें ह्यांचा समस्तकल्प शब्द वगैरेंशीं जो फरक आहे तो वर निर्दिष्ट केला आहे. आतां ह्मणी आणि सांप्रदायिक वाक्यें ह्यांचा परस्परांपासून फरक काय तो दाखवितों.

ह्मण या वाक्यांत कांहींतरी बोध किंवा उपदेश भरलेला असतो, किंवा कांहीं सार्वलौकिक सत्य सांगितलेलें असतें; किंवा एकाद्या विशिष्ट प्रसंगीं जो अनुभव येणें संभवनीय असतें तो अनुभव सांगितलेला असतो; किंवा कांहीं माहिती दिलेली असते.

अर्थात् ह्मणींत जो बोध किंवा अनुभव किंवा सत्य किंवा माहिती वगैरे जें कांहीं कथित असतें, तें सर्वांना सारखेंच मान्य किंवा कबूल होईल असें नसतें. 'ऋण काढून सण करूं नये,' असें आपली ह्मण आपणाला सांगते. पण ह्या म्हणीच्या उलट वर्तन करणारे पुष्कळ लोक आहेत. 'पुढच्यास ठेंच तर मागचा शाहाणा,' असें ह्मणींत सांगितलेलें आहे. पण पुढच्याला लागलेली ठेंच पाहून शाहाणीं न होणारीं माणसें जगांत पुष्कळ आहेत. 'सुंभ जळेल पण पीळ जळणार नाहीं,' अशी आपली म्हण आहे. पण द्वाड माणसाचें पारिपत्य केल्यावर त्यानें आपला द्वाडपणा सोडल्याचीं उदाहरणें जगांत आढळतात. 'सरड्याची धाव कुंपणापर्यंत' अशी आपली म्हण आहे;पण अल्प सामर्थ्याच्या माणसानें पराक्रम केल्याचीं उदाहरणें जगांत नाहींत असें नाहीं.

म्हणींमध्यें केलेलीं विधानें किती प्रमाणांत ग्राह्य म्हणून घ्यावयाचीं हें आम्ही येथवर सांगितलें. म्हणींत केलेल्या बोधाला, किंवा सांगितलेल्या सत्याला, किंवा दिलेल्या माहितीला, कांहीं अपवाद नसतात, असें नाहीं. परंतु ह्या अपवादांनीं म्हणींचें जें स्वरूप आम्ही निरूपिलें, त्याला कांहीं कमीपणा येऊं शकत नाहीं.

म्हणींमध्यें जीं विधानें केलेलीं असतात त्यांत काय कथित असतें, हें आम्ही येथवर सांगितलें. सांप्रदायिक वाक्यांतील विधानांत जें कथित असतें तें याहून भिन्न असतें. सांप्रदायिक वाक्यांत बोध भरलेला नसतो; त्यांत कांहीं सार्वलौकिक सत्य सांतिलेलें नसतें; किंवा कांहीं माहिती किंवा अनुभव हीं कथित नसतात.

म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें ह्या दोहोंत जो एक फरक आहे, तो आम्ही सांगितला. आतां त्या दोहोंत जो दुसरा एक फरक आहे तो सांगतों.

म्हणींना स्वतःची स्वतंत्र अशी अवस्थिति असते, तशी सांप्रदायिक वाक्यांना नसते. म्हणींनीं उक्त जें विधान त्याला स्वतःच्या पायांवर उभें राहतां येतें. त्या विधानाची सत्यता लोकांच्या प्रतीतीस आणून द्यावयाची जरूरी नसते. ती प्रतीति सर्व लोकांना आलेली असते; म्हणून म्हणींनीं दुसऱ्या विधानांचें समर्थन करतां येतें. म्हणींचें स्वतःचें समर्थन अगोदरच झालेलें असतें, आणि तें सर्वांनीं कबूल केलेलेंच असतें. म्हणी हीं वाक्यें सिद्धांतरूप असतात. " पांचामुखीं परमेश्वर, " किंवा " गरजवंताला अक्कल नसते, " " आडला नारायण गाढवाचे पाय धरी, " " अति शाहाणा त्याचा बैल रिकामा, " " असतील शिते तर जुळतील भुतें, " " उधारीचें पोतें सवा हात रितें, " "करील तो भरील, " इत्यादि वाक्यें हीं म्हणी होत. ती वाक्यें सत्य म्हणून सर्वांना पटलेलीं आहेत. ह्या वाक्यांना स्वःची स्वतंत्र अवस्थिति आहे, ह्या कारणामुळें हीं वाक्यें योग्य प्रसंगीं दुसऱ्या विधानांचें समर्थन करावयाला किंवा वक्त्याचें म्हणणें श्रोत्याला कबूल करावयाला लावावयाला पूर्णपणें समर्थ असतात.

सांप्रदायिक वाक्यांना स्वतःची स्वतंत्र अशी अवस्थिति नसते. सांप्रदायिक वाक्यें कशाचेंही समर्थन करूं शकत नाहींत. त्यांना स्वतःच्या पायांवर उभें राहण्याची ताकद नसतें. ज्या माणसाचा एक पाय तुटलेला आहे, त्याला जसें काठीशिवाय उभें राहतां येत नाहीं, तसें सांप्रदायिक वाक्याला दुसऱ्या वाक्याची जोड दिल्याशिवाय कांहीं कार्य करतां येत नाहीं.

ज्याचा एक पाय तोकडा आहे अशा माणसाला ताठ सरळ उभें राहातां येत नाहीं. ज्याला आपला स्वताचा तोल संभाळतां येत नाहीं, तो दुसऱ्या माणसाचा तोल संभाळूं शकत नाहीं. त्या प्रमाणें सांप्रदायिक वाक्य जरी व्याकरणाच्या बाजूनें स्वयंपूर्ण असलें, तरी अर्थाच्या बाजूनें स्वयंपूर्ण नसल्याकारणानें तें दुसऱ्या वाक्याचें समर्थन करूं शकत नाहीं. लंगड्या माणसाला जशी काठी पाहिजे लागते, तसें सांप्रदायिक वाक्याला दुसऱ्या वाक्याची मदत घ्यावी लागते. या कारणामुळें सांप्रदायिक

वाक्यांचा उपयोग करावयाच्या वेळीं तीं दुसऱ्या वाक्यांच्या पोटांत खुपसून द्यावीं लागतात; किंवा दुसऱ्या वाक्यांशीं तीं बांधावीं लागतात; आणि कधीं कधीं तर त्या वाक्यांतील मुख्य शब्द कायम ठेवून त्यांच्यांत थोडेसे फेरफारही करून घ्यावे लागतात.

'रात्रीं खाई तूप आणि सकाळीं पाही रूप,' 'डोळ्यांत केर आणि कानांत फुंकर,' 'खाकेंत कळसा आणि गांवात वळसा,' 'हा सूर्य आणि हा जयद्रथ,' 'घोडे मैदान जवळच आहे,' 'तुम्ही आम्ही एक आणि कंठाळिला मेख,' 'तेल गेलें तूप गेलें हातीं आलें धुपाटणें,' 'समुद्रांत जाऊन कोरडा,' 'लाथ मारील तेथें पाणी काढील,' इ० इ० इ० हीं वाक्यें सांप्रदायिक वाक्यें होत, ह्मणी नव्हेत. कारण, त्यांत कांहीं बोध नाहीं, उपदेश नाहीं, सार्वत्रिक सत्य नाहीं, अनुभव नाहीं किंवा कांहीं माहिती नाहीं. ह्या वाक्यांचा उपयोग करावयाचा असतां त्यांना दुसऱ्या वाक्यांशीं निगडित करावें लागतें.

सांप्रदायिक वाक्यें दुसऱ्या वाक्यांशीं जोडावीं लागतात, आणि तीं अशा रीतीनें जोडलीं असतां त्यांना नामें किंवा विशेषणें, किंवा क्रियाविशेषणें, ह्यांच्या पेक्षां अधिक किंमत नसते. सांप्रदायिक वाक्यांचा स्वतंत्रपणें कांहींच उपयोग करतां येत नाहीं. ह्या सांप्रदायिक वाक्यांचा दुसऱ्या वाक्यांशीं जुळवून उपयोग करण्याचे वेळीं त्यांत रचनादिकासंबंधानेंही कधीं कधीं कांहीं अल्पस्वल्प फेरफार करावें लागतात. तथापि हे फेरफार करतांना त्यांच्यांतील मुख्य शब्द कायम ठेवावे लागतात, हें नीट लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

म्हणींना स्वतंत्र अवस्थिति असते आणि सांप्रदायिक वाक्यांना नसते, हें कसें तें उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखवितों.

'पांचामुखीं परमेश्वर', ह्या म्हणींत क्रियापद अध्याहृत घ्यावें लागतें, पण तिच्यांतील विचार पूर्ण आहे. त्याला स्वताची अवस्थिति आहे. पांच माणसें (पुष्कळ माणसें) जें कांहीं बोलतात, तें परमेश्वरांचें उक्त म्हणून ग्राह्य करावयाला हरकत नाहीं, असा सिद्धांत ह्या म्हणींत कथित आहे, तो मूल्यवान् आहे आणि तो सर्वांना पटण्याजोगा आहे. 'पांचांमुखी परमेश्वर' इतकें वाक्य आपण उच्चारलें म्हणजे आपलें काम भागतें. तें वाक्य आहे त्याच रूपांत प्रकृत विषयाला लागूं पडतें. त्याला दुसऱ्या वाक्याची जोड द्यावी लागत नाहीं.

परंतु सांप्रदायिक वाक्यांची तशी गोष्ट नाहीं. उदाहरणार्थ आपण "पी हळद आणि हो गोरी," हें सांप्रदायिक वाक्य घेऊं. हें वाक्य जरी व्याकरणदृष्ट्या सर्वांगांनीं पूर्ण असलें, तरी तें प्रकृत विषयाशीं लागूं कर- ण्यासाठीं तें पुढील प्रकारच्या रूपांत घालावें लागतें.

१ हळद पिऊन कोणी गोरें होत नसतें, त्याप्रमाणें इ०.

२ हळद प्याल्यानें जर गोरेंपणा येत असता, तर इ०.

३ हळद प्याल्यानें मनुष्य गोरें होतें ही कल्पना जशी वेडगळ आहे, तसें तुझें हें म्हणणें वेडगळपणाचें आहे.

आतां ' लंकेंत सोन्याच्या विटा, ' हें दुसरें एक सांप्रदायिक वाक्य उदाहरणादाखल आपण घेऊं, आणि त्याचा प्रकृत विषयाशीं संबंध जुळ- विण्यासाठीं त्याला काय काय जोड द्यावी लागते, किंवा त्यांत काय काय फेरफार करावे लागतात, हें पाहूं.

१ अरे ! लंकेंत खूब सोन्याच्या विटा असतील, पण त्यांचा तुला (किंवा मला किंवा दुसऱ्या कोणाला) काय उपयोग ? कांहीं नाहीं.

२ लंकेंत सोन्याच्या विटा असतील, पण येथें मी (किंवा दुसरा कोणी माणूस) भिकारीच ना ?

इ० इ० इ०

वर घेतलेल्या दोन उदाहरणांपैकीं पहिल्या उदाहरणांत हळद पिणें आणि गोरें होणें हे शब्द कायम ठेवावे लागतात, आणि दुसऱ्या उदाहरणांत लंका आणि सोन्याच्या विटा हे शब्द कायम ठेवावे लागतात.

दोन वाक्यें रचनेंत आणि दिसण्यांत अगदीं सारखीं सारखीं असून एक वाक्य म्हण असतें, आणि दुसरें सांप्रदायिक वाक्य असतें, ह्याचें एक गमती- दार उदाहरण घेतों.

१ आठ पुरभय्ये आणि नऊ चौके.

२ आठ हात लाकुड आणि नऊ हात बलपी.

हीं दोन वाक्यें इतकीं सदृश आहेत, कीं एकाला म्हण हा शब्द लाविला, तर दुसऱ्यालाही म्हण शब्द लाविला पाहिजे, किंवा एकाला सांप्रदायिक वाक्य हा शब्द लाविला, तर दुसऱ्यालाही सांप्रदायिक वाक्य हा शब्द

५

लाविला पाहिजे, असें आपणांस वाटण्याचा संभव आहे. परंतु आमच्या मतें पहिलें वाक्य म्हण आहे आणि दुसरें सांप्रदायिक वाक्य आहे.

पुरभय्ये लोक आपला स्वयंपाक करावयासाठीं एक चौका आंखून घेतात. त्या चौक्यांत दुसरा कोणीही इसम,—मग तो तज्जातीय कां असेना,—प्रविष्ट झाला तरी तो चौका विटाळतो आणि तो स्वयंपाक त्याज्य होतो. पुरभय्ये लोकांच्या एकलकोंडेपणाची किंवा विलक्षण सोंवळेपणाची टवाळकी ह्या म्हणींत केलेली आहे. आठ पुरभय्ये एके ठिकाणीं जुळले असतां त्या आठांपैकीं प्रत्येकाला एक एक स्वतंत्र चौका पाकसिद्धीसाठीं जरूर असतो असें विधान करावयाचें असतें; परंतु अतिशयोक्तीचा थोडासा क्षम्य अवलंब करून नऊ चौके असतात असें ह्या म्हणींत विधान केलेलें आहे.

आतां 'आठ हात लाकूड आणि नऊ हात धलपी,' हें वाक्य आपण घेऊं.

कोणी मनुष्य एकाद्या वस्तूचें किंवा प्रसंगाचें मूर्खपणाच्या अतिशयोक्तीनें वर्णन करीत असला म्हणजे त्याच्या उपहासार्थ हें सांप्रदायिक वाक्य बोललें जातें. "अरे वाः रे वा:! तो वक्ता इतका कां मूर्ख आहे? तूं सांगतोस तसें कां तो बोलला? छेः! अगदीं अशक्य गोष्ट! तूं कांहींतरी सांगतो आहेस, झालें! आठ हात लांकूड आणि नऊ हात धलपी अशा सारखें तुझें वर्णन आहे!"

दोन वाक्यें अगदीं सदृश असून तीं भिन्न जातींचीं कशीं असूं शकतात, हें ह्या विवरणावरून वाचकांना कळून येईल.

म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें हीं दिसण्यांत सारखींच दिसतात; आणि कित्येक वाक्यें तर अशीं आहेत कीं त्यांना कोणत्या सदरांत ढकलावें यासंबंधानें बरेच प्रसंगीं मन साशंक होतें.

ह्या अडचणींत भर घालावयाला आणखीही एक कारण उपस्थित होतें, तें हें कीं म्हणींतील मुख्य शब्द घेऊन त्यांचा सांप्रदायिक वाक्यखंडाप्रमाणेंही उपयोग अनेक वेळां केला जातो, किंवा म्हणीचें रूप पालटून तिला सांप्रदायिक वाक्याच्या दर्जालाही उतरवितां येतें. उदाहरणार्थ आपण एक म्हण घेऊं. 'एका म्यानांत दोन तरवारी राहात नाहींत,' ह्या म्हणींत एक म्यान आणि दोन तरवारी हे शब्द मुख्य आहेत. हे शब्द त्या म्हणींतून

वेगळे काढून घेऊन त्यांचा सांप्रदायिक वाक्यखंडाप्रमाणें उपयोग करतां येईल.

रामभाऊला वाटतें मी हुषार, गोविंदपंताला वाटतें मी हुशार. एका कचेरींत त्या दोघांनाही कसें ठेवितां येईल? त्या एका म्यानांत दोन तरवारी होतील ना?

आतां आपण आणखीही एक म्हण घेऊं. ऊन्ह पाण्यानें घरें जळत नसतात. ही मूल्यवान् म्हण आहे. म्हणींतील ऊन्ह पाणी आणि घर जळणें हे मुख्य शब्द घेऊन त्यांचा सांप्रदायिक रूपाच्या वाक्यांत पुढें दिल्याप्रमाणें उपयोग करतां येईल.

वाहवा रे वाहवा! मी भाच्याचे पैसे खाल्ले असें ज्याला त्याला सांगून तूं माझें नांव बद्दू करूं पाहात आहेस काय? अशीं ऊन्ह पाण्यानें घरें जळत असतीं तर माणसांना राहावयाला घरेंच उरलीं नसतीं?

म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें किंवा वाक्यांच्या रूपांत घातलेले सांप्रदायिक वाक्यखंड ह्यांची आम्ही येथवर लक्षणें दिलीं आणि उदाहरणेंही दिलीं. त्यावरून वाचकांना त्यांचीं विशिष्ट स्वरूपें कशीं असतात हें दिसून येईल. तीं थोड्याशा फेरफारानें एकमेकांसारखीं कशीं होतात हेंही दाखवून दिलें. तसेंच एकाद्या विशिष्ट प्रसंगीं एखादें वाक्य या सदरांत घालावें की त्या सदरांत घालावें ह्या संबंधानें मन भ्रांत होण्याचा कसा संभव असतो हेंही उदाहरणांनीं स्पष्ट करून दाखविलें आहे.

म्हणी आणि सांप्रदायिक वाक्यें ह्यांच्या संबंधानें आमचीं मतें अद्यापि थोडींशीं अनिश्चित आहेत. तथापि आम्हीं तीं धाडसानें सांगितलीं आहेत. कारण, कोणी पूर्वपक्ष न केल्यास उत्तर पक्ष होत नाही, उत्तर पक्ष न झाल्यास वाद होत नाहीं, आणि वाद न झाल्यास तत्त्वबोध होत नाहीं. म्हणून आम्ही हें जें निरूपण केलें आहे त्याचेकडे पूर्वपक्ष ह्या नात्यानें लोकांनीं पहावें. आमच्या मतासंबंधानें आमचा कांहीं अभिनिवेश नाहीं. मराठी भाषेच्या शास्त्राचें पाऊल पुढें पडावें एवढीच आमची इच्छा आहे.

प्रकरण ६ वें.

म्हणींची उन्नति आणि अवनति.

शब्दांचे अर्थ जसे प्रचलित भाषेच्या व्यापारांना अनुसरून उन्नत किंवा अवनत होऊं शकतात, तसेंच म्हणींचेही अर्थ उन्नत किंवा अवनत होऊं शकतात. आम्हांला अशा उन्नत म्हणींची उदाहरणें आढळलीं नाहींत. अवनत म्हणींचीं मात्र तीन उदाहरणें जीं आह्मांला आठवतात तीं देतों.

पहिली ह्मण जी आम्ही घेतों ती "मनःपूतं समाचरेत्," ही होय. आपल्या मनानें पवित्र असेल तें आचाण करावें. ह्या म्हणींत केलेला उपदेश किती मूल्यवान् आहे? ह्या ह्मणींत उपदेशिलेला वर्तनक्रम जर लोकांनीं पाळला तर जगांतील दुःखाचा भाग कितीतरी अंशानें कमी होईल आणि सुखाचा भाग कितीतरी अंशानें वाढेल?

"मनःपूतं समाचरेत्" हें वाक्य ज्या श्लोकाचा एक पाद आहे, तो येणेंप्रमाणें:—

दृष्टिपूतं न्यसेत्पादं, वस्त्रपूतं पिबेज्जलम् ।
मंत्रपूतं वदेद्वाक्यं, मनःपूतं समाचरेत् ॥

दृष्टीनें पवित्र अशा ठिकाणीं म्हणजे घाण नसेल त्या जागीं पाऊल टाकावें, वस्त्रानें पवित्र असें पाणी ह्मणजे वस्त्रांतून गाळून घेतलेलें पाणी प्यावें, मंत्रानें पवित्र म्हणजे शास्त्राला संमत असें भाषण करावें, आणि मनानें पवित्र म्हणजे मनाला योग्य वाटेल तें आचरण करावें. चालतांना जपून पुढें पाहून चालावें, वस्त्रानें गाळून पाणी प्यावें, शास्त्राला पटण्याजोगें असेल तें भाषण करावें, आणि आपली मनोदेवता आपणाला जें योग्य आहे अशी ग्वाही देईल तें करावें.

ह्या उपर्युक्त श्लोकांतील चतुर्थ चरणाचा मूळचा अर्थ किती साधा आणि सरळ आहे? त्यांत केलेला उपदेश किती मूल्यवान् आहे? परंतु लोकांना त्याचा अर्थ आणि त्यांतील उपदेश न कळून ते त्याचा कांहीं विलक्षण प्रकारचा उपयोग करतात! 'त्याचा बाप मेल्यापासून त्यानें जें आरंभिलें आहे, तें कांहीं पुसूंच नये! नाच, तमाशे, रांड, यांत तो अगदीं

गर्क असतो! कोणी बोलणारा नाहीं, सवरणारा नाहीं! मग काय विचा-रतां? मनःपूतं समाचरेत्!'

अशा सारखा वरील म्हणीचा उपयोग केला जातो! ह्या म्हणींतील मूळच्या बहुमोल उपदेशाची आपण किती दुर्दशा करून सोडली आहे! जें वाक्य मूल्यवान् उपदेशामुळें म्हणीच्या दर्जाला चढलेलें होतें, त्याला आपण तेथून खेचून आणि त्यांतील उपदेश झुगारून देऊन त्याला केवळ सांप्रदा-यिक वाक्याच्या हीन दर्जाला आणून बसविलें आहे!

म्हणींच्या अवनतीचें हें एक उदाहरण झालें. दुसरें एक उदाहरण "बाबा-वाक्यं प्रमाणम्," हें आपण घेऊं.

"बाबावाक्यं प्रमाणं" म्हणजे बाबा सांगतील तें प्रमाण होय, म्हणजे बाबा सांगतील तेंच ग्राह्य, बाकीचें सर्व त्याज्य होय!

ह्या वाक्याची आपण इतकी दुर्दशा करून सोडली आहे कीं त्याचे ठायीं म्हणीच्या स्वरूपाची लवमात्र प्रतीति आपणाला होईनाशी झाली आहे. पण आम्ही वाचकांना असें ठासून सांगतों कीं तें वाक्य एके काळीं म्हणीच्या दर्जाला चढलेलें होतें, आणि मानवी स्वभावांतील जो वात्रटप-णाचा अंश आहे, त्याचे योगानें तें उतरत उतरत आज केवळ सांप्रदायिक वाक्याच्या दर्जाला येऊन पोंचलेलें आहे. ही अवनति कशी झाली हें पहा-ण्यासाठीं आपणाला त्या वाक्याची उत्पत्ति कशी झाली हें प्रथम पहाणें आवश्यक आहे.

प्राचीन काळीं सावंतवाडी येथें बाबा ह्या नांवांचा एक गृहस्थ राहत असे. तो पवित्र आचरणामुळें, आणि सत्यप्रियतेमुळें सर्व लोकांच्या आदराला पात्र झालेला होता. तो कोणाचीही भीड न बाळगतां समतोल मनानें विचार करून त्याला जें योग्य वाटत असे तें तो बोलत असे. दोन माणसांत कांहीं तंटा उपस्थित झाला असतां, आणि तीं माणसें ह्या बाबाचा विचार घ्यावयाला आलीं असतां निःपक्षपात बुद्धीनें तो आपला निर्णय सांगत असे, आणि तो निर्णय त्या दोन्हीं माणसांना मान्य होत असे. बाबांच्या समतोल वृत्तीची सर्व लोकांना इतकी खातरी पटलेली होती, कीं वादाच्या प्रश्नावर बाबांचा निकाल सर्वांस मान्य करावा लागे. तेव्हां "आप्तवाक्यं प्रमाणं" ह्या पुरातन आणि भारतवर्षाला सिद्धान्तरूप असलेल्या वाक्याचें रूपान्तर "बाबावाक्यं प्रमाणं" असें त्या

प्रान्तांत रूढ झालें. "बाबावाक्यं प्रमाणं" ह्या वाक्याला त्या प्रान्तांत म्हणीचा दर्जा प्राप्त झाला, आणि नंतर सर्व मराठी भाषेच्या प्रान्तांत त्याचा फैलाव झाला. परंतु "बाबावाक्यं प्रमाणं" ह्या वाक्यांतील बाबा कोणाला माहीत नसल्याकारणानें, किंवा त्या बाबाची माहिती कालें करून लुप्त झाल्याकारणें, त्या वाक्याच्या जीवनाला आधारभूत जें सत्य त्याचा लोप झाला, आणि त्या वाक्याचा वात्रटपणानें उपयोग करण्याकडे लोकांची प्रवृत्ति झाली. हल्लीं त्या वाक्याचा अत्यंत विचित्र प्रकारानें उपयोग केला जातो. स्वतः विचार न करतां कोणातरी मूर्ख माणसाच्या मताला अनुसरून आपलें मत बनविणें किंवा वर्तन ठेवणें, ह्या प्रकाराचा उपहास करावयाचा असतां "बाबावाक्यं प्रमाणं" हें वाक्य आपण उच्चारतों. 'अरे नाऱ्या, ते गोविंदराव तसें म्हणतात म्हणून तूंही तसेंच म्हणतोस काय? तूं स्वतःच्या बुद्धीनें आपलें मत ठरवून बोल! उगीच आपला "बाबा वाक्यं प्रमाणं" असें करूं नको!' अशा रीतीनें ह्या वरील वाक्याचा उपयोग केला जातो!

"आप्तवाक्यं प्रमाणं" ह्या संस्कृत वाक्यांत बाबा हा शब्द आला, पुढें "बाबावाक्यं प्रमाणं" ही म्हण झाली, आणि पुढें ती म्हण अवनत होऊन तिला सांप्रदायिक वाक्याचा दर्जा प्राप्त झाला!

आतां म्हणींच्या अवनतीचें आणखी एक उदाहरण घेतों!

"चांभाराच्या देवाला खेटराची पूजा," ही म्हण देखील अवनत झाली आहे. आदर दाखविण्याचे अनेक प्रकार आहेत. जो तो मनुष्य आपआपल्या परीनें आदर दाखवितो, आणि अशा रीतीनें आदर दाखविण्याच्या प्रकारांत निंद्य असें कांहीं नाहीं, हा मूल्यवान् सिद्धांत ह्या म्हणींत सांगितलेला आहे. श्रीमंत लोक देवाला संतुष्ट करावयासाठीं द्रव्य देतात. जंगबहाद्दर जे आहेत ते देवाच्या कारणीं आपल्या समशेरीचा उपयोग करतात, कारागीर लोक चित्रें, मूर्ति, वगैरेंनीं देवाला संतुष्ट करतात, कवि देवांचीं स्तोत्रें रचतात, गवई आपल्या देवांपुढें गायन करतात, त्या प्रमाणें चर्मकार लोक देवाला संतुष्ट करावयासाठीं उपानद्युगलाचें दान करतात. "चांभाराच्या देवाला खेटराची पूजा," ह्या म्हणींत कांहीं अपसिद्धांत नाहीं, किंवा कांहीं अयोग्य गोष्टीचें कथन नाहीं. ह्या म्हणींत जें कांहीं सांगितलें आहे, तें प्रत्यहीं आपल्या निदर्शनाला येत आहे. ती खरी

म्हण आहे. म्हणीचें स्वरूप तिचे ठायीं पूर्णत्वानें प्रतीत होत आहे. परंतु आपण त्या म्हणीच्या अर्थाचा विचित्र विपर्यास केला आहे. ती म्हण आपण वेगळ्या अर्थानें योजतों. द्वाड माणसाचें पारिपत्य कठोरपणानें करणें जरूर असतें, दुष्ट माणसाशीं निर्दयपणानें वागलें पाहिजे, अशा अर्थानें ती म्हण योजली जाते. याचें एक उदाहरण देतों. "अहो! तीं मात्रागमनी पोरें! तीं कांहीं सुध्या मार्गानें कां ताळ्यावर येणार? त्यांना जेव्हां चवदावें रत्न दाखवावें तेव्हांच कांहीं तरी वठणीस येतील! चांभाराच्या देवाला खेटराची पूजा!"

म्हणींची अवनति कशी होते हें दाखविण्यासाठीं आम्ही तीन म्हणी घेतल्या.

१ मत:पूतं समाचरेत्.

२ बाबावाक्यं प्रमाणम्.

३ चांभाराच्या देवाला खेटराची पूजा.

ह्या तीन म्हणींपैकीं पहिल्या दोन म्हणींत अर्थाचा विपर्यास होऊन त्या अवनत होऊन त्यांना सांप्रदायिक वाक्यांचा हीन दर्जा प्राप्त झाला आहे. तिसऱ्या म्हणींत योजनेचा विपर्यास होऊन ती अवनत झाली आहे, तथापि ती म्हण या संज्ञेला पूर्णपणें पात्र आहे.

येथवर आम्ही जें विवरण केलें आहे त्यावरून म्हणींच्या अर्थांत आणि योजनेंत किंवा दोहोंतही कसे विपर्यास होतात आणि कशी अवनति होते हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

प्रकरण ७ वें.

कांहीं चमत्कारिक म्हणी.

म्हणींच्या अभ्यासापासून सामान्य वाचकांची करमणूक होते, भाषाशास्त्रज्ञांना शब्दांचीं व वाक्यांचीं रूपान्तरें कशीं होतात ह्यांचीं उदाहरणें

सांपडतात, आणि इतिहाससंशोधकांस उपयुक्त माहिती मिळते, ह्या विधानाच्या समर्थनार्थ आम्ही एक म्हण घेऊन तिचा उलगडा करतों.

"कहां राजा भोज, और कहां गंगा तेलण" ही ती म्हण होय.

जेव्हां दोन वस्तु अत्यंत भिन्नधर्मीय असतात, आणि ह्या भिन्नधर्मीयत्वामुळें त्यांचें साहचर्य किंवा सहवास किंवा संयोग घडणें अशक्य आहे, किंवा घडवून आणणें हास्यपद आहे, असें आपणास म्हणावयाचें असतें, तेव्हां ही म्हण योजली जाते. तसेंच भिन्नधर्मीय वस्तूंमध्यें साम्य दाखवावयाला प्रवृत्त होणें हें मूर्खपणाचें आहे, असें वक्त्याला म्हणावयाचें असतें, तेथेंही ही म्हण योजतात.

"कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी?" ही म्हणही वरच्या सारख्या प्रसंगीं योजली जाते.

"कहां राजा भोज और कहां गंगा तेलण ?" ही म्हण प्रथम हिंदी भाषेंत असून ती महाराष्ट्रांत आली तेव्हां तिचें रूप पालटलें आणि " कोठें राजा भोज आणि कोठें गंगा तेलीण ", असें तिचें रूप झालें.

परंतु ही म्हण हिंदी रूपांत असो किंवा मराठी रूपांत असो, ती एकाच अर्थानें योजली जाते इतकी गोष्ट खरी. तथापि विचारी माणसाला भोज राजाची आणि गंगा तेलिणीची सांगड कशी घालण्यांत आली, आणि हा भोज कोण आणि ही तेलीण कोण, हें कोडें पडल्याशिवाय राहणार नाहीं. ह्या कोड्याचा उलगडा आपणास एका ऐतिहासिक प्रसंगांत सांपडतो, तो येणें प्रमाणें.

धारा नगरी ही माळव्यांत असून तेथें प्राचीन काळीं परमार आडनांवाचे राजे राज्य करीत असत. ह्या परमारवंशीय राजांचीं आसपासच्या प्रदेशच्या राजांशीं अनेक वेळां युद्धें होत असत. अशा ह्या शत्रुराजांपैकीं त्रिपुरीचा चेदीवंशीय राजा गांगेय, आणि तैलंगणांतील कल्याणपुरचा राजा, ह्यांचा परमारवंशीय भोजराजानें पराभव केला, आणि ह्या विजयाच्या स्मरणार्थ त्यानें आपल्या नगरीमध्यें एक जयस्तंभ उभारला.

गांगेय आणि तैलंग ह्या राजांवर भोजराजानें जय मिळविला, ह्या ऐतिहासिक गोष्टीवरून भोजराजाच्या पराक्रमाची प्रशंसा सर्वतोमुखीं झाली, आणि " कहां राजा भोज और कहां गांगेय तैलंग " हे किंवा ह्या अर्थाचे शब्द

कार मोठी तफावत दाखविण्याच्या प्रसंगीं योजले जाऊं लागले. आणि कालें करून त्या शब्दांना म्हणीची योग्यता प्राप्त झाली.

ह्यानंतर पुष्कळ काळ लोटला. परदेशाहून आलेल्या परधर्मी मुसलमान लोकांनीं धारा नगरीचें राज्य काबीज केलें. परमार वंशाचा अस्त झाला. ज्या परमारवंशीय भोजानें एवढा मोठा जय मिळविला, त्याचें नांव बुडालें, आणि त्यानें ज्या गांगेय राजावर आणि तैलंग राजावर हा जय मिळविला, त्यांचींही नांवें बुडालीं. म्हणींतील राजा भोज कोण, गांगेय कोण, आणि तैलंग कोण, ह्या संबंधाचा इतिहास लुप्त झाला, ऐतिहासिक सत्य लुप्त झालें, परंतु त्या ऐतिहासिक सत्यावर आधारलेली म्हण मात्र लोकांच्या तोंडीं कायम राहिली ! ज्या ऐतिहासिक गोष्टीवरून ती म्हण उत्पन्न झाली होती, त्या गोष्टीचें ज्ञानच लुप्त झाल्यामुळें ती म्हण शुद्ध रूपांत टिकूं शकली नाहीं. तिच्याबद्दल "कहां राजा भोज, और कहां गांगी तेलण" अशी म्हण अपभ्रष्ट रूपानें योजण्यांत येऊं लागली, आणि तिचा अर्थ कोठें भोजराजा आणि कोठें गांगी ह्या नांवाची तेलीण ? असा समजण्यांत येऊं लागला!

समाजांत एकादी कल्पना उत्पन्न झाली म्हणजे तिला अनुरूप अशी दंतकथा आपोआप उत्पन्न होते, आणि नंतर त्या दंतकथेची सांगोपांग उभारणी व्हावयाला ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता असते, त्या त्या गोष्टी लोकांच्या नजरेस येऊं लागतात, आणि ती कल्पना सर्व अंगांनीं आणि सर्व उपांगांनीं उपलक्षित होऊन समाजांत रूढ होऊन बद्धमूल होऊन जाते!

आकाशांतील एकाद्या विशिष्ट ढगाकडे आपण नजर करून पाहूं लागलों आणि तो उंट आहे अशी आपण कल्पना केली, म्हणजे लगेच त्या उंटाची वाकडी मान, सपाट जबडा, पाठीवरची मदार, शेपूट, वगैरे शरीराचे सर्व भाग आपणाला त्या ढगांत दिसूं लागतात, आणि अशा रीतीनें एक सर्वांग-संपूर्ण उंट निर्माण होतो !

ह्या दाखल्याप्रमाणें वरील म्हणींतील काल्पनिक गोष्टीचीं अंगें आणि उपांगें उत्पन्न झालीं. भोजराजानें उभारलेला जयस्तंभ हा गांगी तेलिणीच्या तराजूची दांडी म्हणून मानण्यांत येऊं लागला, त्या जयस्तंभाच्या चहु-बाजूच्या निखळलेले जे धोंडे, ते तिचे तेल वजन करण्याचे धोंडे, वगैरे

पुरावे उद्भवूं लागले; आणि असला प्रचंड दांडा, आणि असले प्रचंड वजनी धोंडे, ह्या उपकरणांनीं तेलिणींचा धंदा करणारी जी गांगी तेलीण तीही ज्या भोजराजापुढें कसपटाप्रमाणें होती, तो भोजराजा फार पराक्रमी असला पाहिजे, असें समजण्यांत येऊं लागलें ! आणि काळाच्या विचित्र परिवर्तनामध्यें भोज, गांगेय, आणि तैलंग, ह्या राजांचीं राज्यें बुडालीं, त्यांचीं नांवें बुडालीं, परंतु त्या तीन राजांच्या शत्रुत्वापासून उत्पन्न झालेली म्हण मात्र टिकून राहिली !

गारोडी तीन पांढऱ्या गोट्यांवर करवंटी उपडी घालतो, नंतर कांहीं मंत्र म्हणून ती करवंटी उचलतो, तों एकच पांढरी गोटी राहून तिच्या शेजारीं एक तांबडी गोटी येते, हा भुलभुलावणीचा देखावा जसा गारोडी दाखवितो, तसा प्रकार काळरूपी गारोडी अनेक वेळां दाखवितो ! भोज, गांगेय, आणि तैलंग, हे तीन राजे काळानें आपल्या पदरांत घेतले, भोज राजा राहविला, गांगेय आणि तैलंग हे राजे गडप केले, आणि ह्या दोहोंच्या जागीं एक गंगा ह्या नांवाची तेलीण उत्पन्न केली ! ही गोष्ट सामान्य मनुष्यास जशी अद्भुत म्हणून मनोरंजक आहे, तशीच ती भाषाशास्त्राचा आणि इतिहासाचा अभ्यास करणारांस सिद्धान्तस्थापक म्हणून मूल्यवान् होय !*

शब्दांची उत्पत्ति जशी अनेक प्रसंगीं छांदिष्टपणाची व याहच्छिक असते, तशीच कांहीं प्रसंगीं म्हणींची उत्पत्तीही असते.

ज्यानें गुंतागुंतीचें गणित करून, असंख्य देहकष्ट सोसून, अनेक राजे रजवाडे यांची पैशासाठीं विनवणी करून, आणि कधीं कधीं तर खावयाच्या अन्नासाठींही भीक मागून, अचाट साहसानें, अमेरिका खंड शोधून

---

*इ० स० १९०९ सालच्या आक्टोबर महिन्यांत बडोदा येथें जी मराठी ग्रंथकारांची परिषद भरली होती, तींत रा. रा. काशीनाथ कृष्ण लेले, ह्यांनीं ऐतिहासिक पुराव्यांची जोपासना करण्याचें महत्व स्थापित करण्यासाठीं जें भाषण केलें, त्यांत ह्या म्हणरूपी कोड्याचा उलगडा केला, तो आम्ही संक्षेपानें वर दिला आहे. सदरहू संमेलनाचा रिपोर्ट पानें ४४, ४५ आणि ४६ वाचकांनीं पहावीं.

काढलें, त्या कोलंबसाचें नांव त्या खंडाला न मिळतां, एका यःकश्चित् यूरोपी पाद्याचें नांव मिळालें. हा पाद्री कधीं अमेरिकेला गेलेला नसून केवळ ऐकीव माहिती गोळा करून त्यानें त्या खंडावर एक पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें होतें इतकेंच, आणि एवढ्यावरून त्याच्या नांवानें तें खंड आज ओळखिलें जात आहे. ही विचित्र दैवगति होय! अमेरिका हें नांव रूढ झालें, आणि कोलंबसाचें नांव नष्ट झालें!

जो प्रकार शब्दांच्या उत्पत्तीसंबंधानें बरेच वेळां घडतो, तोच प्रकार म्हणींच्याही उत्पत्तीसंबंधानेंही घडतो.

सर्व आबालवृद्धांना बिल्वाचें त्रिदळ ठाऊक असतें, आणि पळसाचें झाड शहरांत तर राहूंद्याच, परंतु खेड्यांतही तें आढळत नाहीं. तें रानांत किंवा डोंगरावर असतें. पळसाचें त्रिदळ क्वचित् पहाण्यांत येतें, आणि त्याचीं पानें कोणी पाहिलीं तर तीं पत्रावळीच्या रूपांत पहाण्यांत येतात. अशी जर वस्तुस्थिती आहे, तर "बेलाला पानें तीन" ही म्हण रूढ होणें अधिक साहाजिक होतें. परंतु रूढ जी म्हण झाली, ती "पळसाला पानें तीन," ही झाली. तीन पानांचीं इतर झाडेंझुडपें,—जीं सर्वांच्या पहाण्यांत येतात,—तीं वगळलीं गेलीं, आणि पळसाला महत्त्व प्राप्त झालें. हा छांदिष्ट-पणाचा किंवा यदृच्छेचा परिणाम नव्हे काय?

"गची गांठ खालीं," ह्या म्हणीसारखी मजेदार व चटकदार अशी दुसरी ह्मण साऱ्या मराठी भाषेंत असेल किंवा नसेल याची आम्हांस शंका वाटते. पहा ही ह्मण किती दैवशाली आहे ती? कर्मधर्मसंयोगानें असें झालें आहे कीं, मराठी भाषेच्या लिपींत जीं गांठींचीं अक्षरें आहेत, त्यांत "ग" हें अक्षर आहे, परंतु त्याची गांठ "भ" किंवा "थ" प्रमाणें वर आहे काय? नाहीं. ती गांठ खालीं आहे. इतकेंच नव्हे तर ती खालीं असून मागच्या बाजूस आहे. गर्विष्ठ लोक इतकी बढाई मिरवितात; परंतु विद्वानांच्या पुढें त्यांचें तोंड बंद होते; तसेंच ज्ञानानें अथवा बळानें व सत्तेनें वरिष्ठ अशा लोकांचें ज्ञान अथवा बळ कुचकामाचें असें म्हणणारे लोक या व्यर्थतिरस्कृत लोकांच्या पुढें कसें मुकाट्यानें असतात, इत्यादि प्रकार मनांत आणिले असतां "गची गांठ खालीं," ह्या म्हणीची खुबी आणि मजेदारपणा कोणाच्याही लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं!

" दोरी जळाली तरी पीळ जळत नाहीं, " ही म्हण भारी गमतीची आहे. अनेक तंतु एकत्र करून त्यांना पीळ भरावे लागतात, नंतर अनेक पदरांना पुन्हां पीळ भरून ते एकत्र केले म्हणजे दोरी तयार होते. ही तयार झालेली दोरी एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जळत गेली, तरी तिच्या पोटीं असलेले पीळ भरलेले तंतु व पीळ भरलेले पदर जसेचे तसेच कायम राहिलेले असतात ! दोरी जळून जरी ती रक्षारूप झाली, तरी ह्या रक्षारूप दोरीच्या पोटांतील जे तंतु आणि पदर त्यांचा पीळ आपला शाबूदच ! निसर्गांतील जड पदार्थांच्या ठायीं असलेल्या धर्मापासून ज्या म्हणीची उत्पत्ति झाली आहे, ती ज्ञानसंपन्न अशा सजीव प्राण्यांच्या मानसिक व्यापारांस किती तंतोतंत रीतीनें लागू पडते बरें ? ह्या म्हणीचें हें वैभव पाहून कोणाला कौतुक वाटणार नाहीं ? आणि ह्या म्हणींतील सिद्धान्त कोणाला मूल्यवान् वाटणार नाहीं ? हट्टी मनुष्याचें हट्टाच्या पायीं कितीही नुकसान झालें, त्याचें सर्वस्व जरी गमावलें, तरी तो आपला हट्ट सोडीत नाहीं, ह्यांचीं प्रत्यंतरें संसारांत शेंकडो वेळां पहाण्यांत येतात !

" दिव्याखालीं अंधेर, " ही म्हण तरी वरच्या म्हणीहून कमी भाग्यशाली आहे काय? दिवा आसमंताच्या प्रदेशांतील अंधेर नाहींसा करितो, पण त्याच्या स्वतःच्या अंगाखालीं पाहूं जावें तों तेथें अंधेर ! जो लोकांना प्रकाश देतो त्याच्या स्वतःच्या ठायीं अंधेर ! मनुष्य जो दुसऱ्यांना दुराचारीपणाच्या डौलानें मार्ग दाखवीत असतो, किंवा आपली प्रतिष्ठा मिरवित असतो, त्याचें स्वतःचें वर्तन किती सदोष असतें ह्याची त्याला दादही नसते, ही संसारांत हरहमेशा आढळणारी वस्तुस्थिति वर्णावयाची असतां "दिव्याखालीं अंधेर, " ह्या म्हणीची योजना करण्यांत येते !

" वस्त्राआड जन नागवें " ह्या विनोदी (ग्राम्य नव्हे) म्हणींत समाजाच्या वास्तव स्वरूपांत आणि बाह्य देखाव्यांत कशी भिन्नता असते हें भारी चटकदार रीतीनें कथिलें आहे !

" वळचणीचें पाणी आढ्याला जात नाहीं, " ह्या निसर्गांतील सिद्धान्ताच्या दाखल्यावर समाजांतील भिन्न भिन्न दर्जाच्या पायऱ्या कशा रचलेल्या असतात हें विशद केलेलें आहे.

"पांचीं बोटें सारखीं नसतात, " ही म्हण समान परिस्थिति असतां वस्तूंत कशा तफावती असूं शकतात हें तत्त्व अगदीं आपल्या स्वतःच्या देहापर्यंत आणून भिडविते !

" ऊन पाण्यानें घरें जळत नसतात, " ह्या म्हणींतही निसर्गाची रचना आणि मनुष्याच्या कृत्रिम समाजाची रचना, ह्या दोहोंत कसें एकच तत्त्व दृग्गोचर होतें हें पहावयाला सांपडतें.

"एका हातानें टाळी वाजत नाहीं," "म्हशीनें म्हैस फळत नाहीं," ह्या म्हणींतही निसर्ग आणि मानवी समाजाची घटना, ह्यांचें तादात्म्य मोठ्या चमत्कारिक रीतीनें कथिलें आहे !

" डोळे आणि कान ह्यांच्यांत चार बोटांचें अंतर, " " पाठीला डोळे नसतात, " इत्यादि म्हणींतही निसर्गाची मांडणी आणि मानवी समाजाच्या घडामोडी, ह्या एकरूप असतात असें प्रतिपादिलें आहे.

अशा चमत्कारिक, किंवा विनोदी, किंवा भाग्यशाली, म्हणींची उदाहरणें द्यावीं तितकी थोडींच, म्हणून आम्ही आतां जास्ती पाल्हाळ करीत बसत नाहीं.

प्रकरण ८ वें.

उपसंहार.

येथवर आम्ही म्हणींच्या संबंधानें जे चार विचार आम्हांस सुचले, ते वाचकांस सादर केले आहेत. वरील विवेचनावरून आमच्या वाचकांस म्हणींचा उपयोग, त्यांचें महत्त्व, त्यांची योग्यता, हीं कळून आलींच असतील. ह्या विषयाचा उहापोह मराठींत अझून कोणीही केलेला नाहीं. ह्यामुळें आमच्या निबंधांत अनेक दोषस्थळें व न्यूनें असण्याचा संभव आहे हें आम्हीं जाणून आहों.

आम्हीं आमच्या निबंधरूपी तारवांत वाचकांस घालून मराठी म्हणींच्या अफाट आणि अपरिचित दर्यावर त्यास नवीन सृष्टिसौंदर्य

दाखविण्यासाठीं घेऊन गेलों. वाटेंत कित्येक खडक लागले ते फोडण्याची फारशी खटपट न करितां ते टाळवतील तितके टाळले आहेत. अशा रीतीनें पर्यटन करून आम्हीं आपलें तारूं सुरक्षितपणें आणून ह्या शेवटच्या बंदरीं नांगरिलें; तर आतां आमच्या उतारूंस किनाऱ्यावर सोडून त्यांस सलाम करतों, व तारवास खडक लागून न जाणतां कळपे उडाले असल्यास ते शोधून काढण्याची कामगिरी पाणबुड्यांस देऊन, मार्गातील खडकांचा समूळ उच्छेद करणें आमच्या मागून येणाऱ्या दर्यावर्दी नाखवांवर सोंपवितों !

समाप्त.

परिशिष्ट.

सहदेव ह्या नांवाचा एक शूद्र शेतकरी होता. त्यानें अनेक वर्षांच्या सूक्ष्म निरीक्षणावरून शेतकीच्या धंद्यासंबंधानें अनेक ठोकताळे बसविलेले होते. ढगांचे रंग, आकार, गति, वाऱ्यांच्या गति, पशुपक्ष्यांच्या हालचाली आणि शब्द, इत्यादींवरून शेतकऱ्यांच्या उपयोगी पडतील असे त्यानें आडाखे काढलेले होते. हे सर्व ठोकताळे आणि आडाखे त्यानें आपली बायको भाडळी हिला म्हणींच्या रूपानें सांगितले होते. ही भाडळी देखील आपल्या पतीप्रमाणेंच हुशार होती. ह्या ह्मणींपैकीं पुष्कळ म्हणी आम्ही आमचे श्वशुर कै. मोरो बल्लाळ धारप ह्यांच्या तोंडून ऐकिलेल्या होत्या, परंतु त्यांपैकीं एकही आम्हांला आज आठवत नाहीं. ह्या सहदेवाच्या शेतकी ह्मणी शेकडों आहेत, असें आमच्या ऐकिवांत आहे. कोणी चौकस आणि उत्साही तरुणानें सहदेव आणि भाडळी यांच्या संबंधाची माहिती मिळवून त्यांनीं रूढ केलेल्या ह्मणी शेतकऱ्यांच्या तोंडून गोळा करून छापविल्यास महाराष्ट्रीयांवर उपकार होतील. सहदेवाच्या ह्मणींसंबंधानें आह्मांला निश्चयात्मक असें कांहींच सांगतां येत नसल्याकारणानें त्याच्या नांवाचा उल्लेख आम्ही ऐन ग्रंथांत न करतां ह्या पारीशिष्टांत केला आहे.

हें पुस्तक प्राथमिक शाळांकरितां सरकारनें मंजूर केलें आहे

वाक्प्रचार म्हणी इ०

(वि० वा० भिडेकृत)

(आवृत्ति तिसरी)

ह्या तिसऱ्या आवृत्तीचें काम खुद्द ग्रंथकर्त्यांचे हातून झालें आहे; आणि हें पुस्तक मराठी भाषेचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला अत्यंत उपयुक्त असें आहे इतकेंच नव्हे तर मराठी भाषा शिकविणाऱ्या प्रत्येक शिक्षकालाही तें अत्यन्त मूल्यवान् असें आहे. कारण, ह्या पुस्तकांत मराठी वाक्प्रचारांचें सरळ आणि सोप्या सरणीनें वर्गीकरण केलेलें असून सर्व वाक्प्रचारांचे सुबोध स्पष्टीकरण केलेलें आहे, आणि ह्या स्पष्टीकरणाचा अधिक उलगडा होईल अशा तऱ्हेची उदाहरणें दिलीं आहेत. ह्या पुस्तकांत म्हणी, संप्रदाय, समस्तकल्पशब्द, तुल्यकल्पशब्द ज्योतिषांतील पारिभाषिक शब्द, सांप्रदायिक उपमा, रूपकें, वगैरे अनेक उपयुक्त आणि मनोरंजक विषयही समाविष्ट करण्यांत आलेले आहेत. ह्या कारणांमुळें हें पुस्तक विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग ह्यांनाच हें केवळ वापरतां येईल असें नव्हे तर सामान्य वाचकांनाही तें मनोरंजक वाटेल.

प्रत्येक प्रकरणांत थोडथोडी भर घालून ही आवृत्ति अधिक उपयुक्त अशी केलेली आहे. ह्या पुस्तकाला तपशीलवार सूची जोडलेली असल्याकारणानें हाव्या त्या शब्दांचे स्पष्टीकरण नक्की कोठें सांपडेल हें पाहणें सोयीचें झालें आहे. ह्या तिसऱ्या आवृत्तींत सुमारें २५।३० पानांची भर घातलेली आहे, तथापि किंमत पूर्वीइतकीच म्हणजे १८१२ ठेविली आहे. टपाल हशील ८४.

रीतीनें समास झाल्यावर चार परिशिष्टें दिलीं आहेत, त्यांत आणखी कांहीं शब्दालंकार, कोटी, इंग्रजी अलंकार, वगैरेंची त्रोटक माहिती दिली आहे. नंतर सुमारें १५० पद्यें विद्यार्थ्यांनें स्वतः अलंकार ठरविण्यासाठीं दिलीं आहेत, आणि शेवटीं सर्व पद्यांची एक वर्णानुक्रमानें सूचि दिली आहे.

ह्या पुस्तकाचा उपयोग इंग्रजी आणि मराठी शाळा आणि कॉलेजें यांतील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना होण्याजोगा असून शिवाय जे कोणी स्वताच्या परिश्रमानें ज्ञानार्जन करूं इच्छिणारे लोक असतील, त्यांनाही हें पुस्तक उपयोगी पडेल. किंमत एक रुपया.

७ **A Concise Sanskrit English Dictionary.** Pages over 1250 of Demi 8 size. Price Rs. 4

८ **म्हणींविषयीं चार शब्द**—ह्या निबंधाची ही सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति असून तींत म्हणींच्या अभ्यासापासून उपयुक्त ज्ञान मिळून शिवाय मनोरंजन कसें होतें हें मोठ्या मार्मिकपणानें दाखविलें आहे. किं. चार आणे.

९ **कंजळगडाचा कबजा**—ही कादंबरी दोनशें पृष्ठांची असून रहस्यपूर्ण आहे. किंमत १ रुपाया.

१० **पण तिसरा कोण ?**—ही कादंबरी रहस्यपूर्ण आणि मनोरंजक आहे. किंमत २ रु.

११ **कोरलईचा किल्लेदार** —ही मनोरंजक आणि रहस्यपरिप्लुत कादंबरी ७५० पानांची असून ती वाचावयाला हातीं घेतली असतां समाप्त झाल्याशिवाय सोडवत नाहीं. किंमत चार रुपये.

१२ **गणवंतगडाचा गडकरी**—ही कादंबरी २७८ पानांची असून ती रहस्यपूर्ण आहे. ती शिवाजीच्या उदयकाळावरची असून तींत शिवाजीनें गणवंतगड कसा हस्तगत करून घेतला, हा विषय आहे. किंमत आडीच रुपये.

१३ **मराठी शब्दांचें उद्घाटन**—यांत शब्दांच्या अभ्यासापासून कशी उपयुक्त आणि मनोरंजक माहिती मिळते हें दाखविलें आहे. किं. ८ आणे.

टीप—१, २, ३, ४, आणि ५ हीं पुस्तकें ग्रंथकर्त्याकडे* मिळतील.

टीप—९, १० आणि ११ हीं पुस्तकें भारतगौरवग्रंथमाला, मुंबई, येथें मिळतील. १२ हें पुस्तक तात्या नेमिनाथ पांगळ, आदित्यवार पेठ पुणें, यांचेकडे मिळेल. ६, ७ आणि ८ हीं पुस्तकें चित्रशाळा प्रेस, पुणें येथें मिळतील.

* विद्याधर वामन भिडे, ७३५ सदाशिव पेठ, पुणें सिटी.